CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, १४ मे २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १६५ । पाने १२ । किंमत रु. ८/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या हस्ते आज तीन हजार कोटींच्या कामांचा शुभारंभ

## सोलापूर, धाराशिव जिल्ह्यातील महामार्गाचा घेणार आढावा

## जिल्ह्यातील विविध महामार्ग प्रकल्पांचे होणार भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा गुरूवार, दि. १४ मे रोजी होणारा सोलापूर दौरा हा केवळ राजकीय कार्यक्रम नसून जिल्ह्याच्या विकासाला रोडमॅप ठरणार आहे. राज्यातील महत्त्वाच्या महामार्ग प्रकल्पांचे 'शिल्पकार' म्हणून ओळख असलेल्या ना. गडकरी यांच्या हस्ते सोलापुरातील हजारो कोटी रुपयांच्या विविध रस्ते प्रकल्पांचे



भूमिपूजन होणार असल्याने सोलापूर जिल्ह्याला विकासाची नवी दिशा मिळणार आहे. दरम्यान, याच दौऱ्यात सोलापूरसह धाराशिव जिल्ह्यातील महामार्ग, सोलापुरातील उड्डाणपुलांचाही आढावा ते घेणार असून, दोन्ही जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, काही लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

### पंतप्रधानांच्या आवाहनामुळे दौऱ्यातील वाहनताफा कमी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत करण्यासाठी तमाम जनतेला आणि लोकप्रतिनिधींना आवाहन केल्यामुळे याची दखल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही घेतली असून, त्यांच्या सोलापूर दौऱ्यात ५० टक्के वाहने कमी करण्याच्या सुचना जिल्हा प्रशासनास एका पत्राद्वारे दिल्या आहेत. याचबरोबर त्यांच्या वाहन ताफ्यासोबत राहणारी (ॲम्बुलन्स वगळून) जिल्हा प्रशासनातीलही काही वाहने कमी करण्यात येणार आहेत.

**- कार्तिकेयन एस. जिल्हाधिकारी, सोलापूर**

### अक्कलकोट-वागदरी रस्त्यासाठी ३५३ कोटी

अक्कलकोट तालुक्यासह सोलापूर जिल्ह्याच्या दळणवळण आणि औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या २,७८४ कोटींच्या चार महामार्ग प्रकल्पांचे भूमिपूजन येत्या १४ मे रोजी अक्कलकोट येथे होणार आहे. अक्कलकोट ते वागदरी या मार्गाच्या दुपदरीकरणासाठी ३५३ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी देण्यात आली आहे. सीमाभागातील हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. रुंदीकरणामुळे अपघातांचे प्रमाण कमी होऊन वाहतुकीची अधिक गतीने होणार आहे. ग्रीनफिल्ड महामार्गामुळे जिल्ह्याच्या विकासाला वेग येणार असल्याचे चित्र असून गडकरी यांच्या दौऱ्यामुळे सोलापूर जिल्हा राज्यातील महत्त्वाचे लॉजिस्टिक आणि औद्योगिक केंद्र म्हणून पुढे येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### रखडलेल्या विकासकामांना येणार चालना

ना. नितीन गडकरी हे सोलापूर, धाराशिव जिल्ह्यातील नवीन रस्ते कामांची घोषणा करताना सोलापुरातील २ उड्डाणपुल आणि सोलापूर हैदराबाद या अनेक वर्षांपासून रखडलेल्या प्रकल्पांचाही आढावा घेणार आहेत. ही कामे का रखडली आहेत. याची माहिती घेवून त्या कामांना गती देण्यासाठी ते निर्देश देतील आणि ही दोन्ही कामे गतीने मार्गी लागतील, अशी आशा सोलापूरकरांना सध्या लागली आहे. यासाठी धाराशिव, सोलापूरचे जिल्हाधिकारी, महामार्ग अधिकाऱ्यांची ते शुक्रवारी सकाळी ९ वाजता स्वतंत्र बैठक घेणार आहेत.






CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### एमपीएससी परीक्षांमधील ‘ऑप्टिंग आऊट’ , ‘संमती’ पर्याय रद्द

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) भरती प्रक्रियेत महत्त्वाचा बदल करत उमेदवारांना उपलब्ध असलेले ‘ऑप्टिंग आऊट’ आणि ‘संमती’ हे पर्याय रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात आयोगाने प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे.

आयोगाने भरती प्रक्रियेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने यापूर्वी ‘ऑप्टिंग आऊट’ ही संकल्पना लागू केली होती. त्यानुसार निवड यादीतील उमेदवारांना भरती प्रक्रियेतून स्वेच्छेने बाहेर पडण्याचा पर्याय देण्यात आला होता. मात्र, या पर्यायासंदर्भात आयोगाच्या बैठकीत चर्चा झाल्यानंतर आता हा पर्याय रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापुढे आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षांसाठी भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे तसेच संमती देणे हे पर्याय उपलब्ध राहणार नाहीत. ■

### अमेरिकी महापौराने राबवला चीनचा अजेंडा

**लॉस एंजेलिस :** कॅलिफोर्नियातील आर्केडिया शहराच्या महापौर आयलीन वांग या चिनी सरकारच्या ‘बेकायदेशीर एजंट’ म्हणून काम करीत असल्याचे एफबीआयच्या तपासात निष्पन्न झाले. यानंतर अमेरिकन प्रशासनासह संपूर्ण जगात खळबळ उडाली असून, वांग यांनी पदाचा तातडीने राजीनामा दिला. आयलीन वांग यांनी २०२० ते २०२२ या काळात चिनी सरकारी अधिकाऱ्यांच्या थेट संपर्कात राहून त्यांच्या इशाऱ्यावरून अमेरिकेत चीनचा अजेंडा राबवला, अशी माहिती एफबीआयने दिली. वांग यांनी ‘यूएस न्यूज सेंटर’ नावाच्या एका संकेतस्थळाचा वापर करून स्थानिक चिनी-अमेरिकन समुदायामध्ये चीन समर्थक प्रचार केला. विशेष म्हणजे, चीनमधील अधिकारी त्यांना ‘वीचॅट’ ॲपद्वारे बातम्यांचे लेख पाठवत असत, ते अमेरिकेत प्रसिद्ध करून लोकांची मते कलुषित करण्याचा प्रयत्न केला जात होता. चिनी सरकारच्या या मोहिमेत त्यांना याओनिंग माइक सन नावाच्या व्यक्तीची साथ मिळाली होती. नोव्हेंबर २०२२ मध्ये आर्केडिया सिटी कौन्सिलवर निवडून आलेल्या वांग यांनी महापौर पदापर्यंत मजल मारली होती.

# बहुमत चाचणीत थलपतींचा ‘विजय’

● टीव्हीकेला १४४ आमदारांचा पाठिंबा ● भाजपा-पीएमकेचा सभात्याग

◆ **चेन्नई, १३ मे**

मुख्यमंत्री जोसेफ विजय थलपती यांच्या नेतृत्वाखालील टीव्हीके सरकारने बुधवारी तामिळनाडू विधानसभेत विश्वासदर्शक ठराव जिंकला. २३४ सदस्यीय विधानसभेत १४४ आमदारांनी सरकारच्या बाजूने मतदान केले तर, २२ जणांनी विश्वासदर्शक ठरावाच्या विरोधात मतदान केले. पाच सदस्य तटस्थ राहिले.

तामिळनाडूतील टीव्हीके सरकारने विधानसभेत आपले बहुमत सिद्ध केले आहे. बुधवारी झालेल्या विश्वासदर्शक ठरावात, मुख्यमंत्री विजय यांच्या नेतृत्वाखालील सरकारला १४४ आमदारांचा पाठिंबा मिळाला.

**अण्णाद्रमुकमध्ये दोन गट**

टीव्हीकेच्या सत्तास्थापनेवरून अण्णाद्रमुकमध्ये दोन गट पडले. एका गटाने सरकारला पाठिंबा दिला, तर दुसऱ्या गटाने विरोध केला. इतकेच नाही, तर अण्णाद्रमुकचे ज्येष्ठ नेते एस. पी. वेलुमणी आणि शिव षण्मुगम् यांच्या नेतृत्वाखालील आमदारांच्या गटाने एडप्पाडी के. पलानीस्वामी यांचा विरोध डावलून सरकारला पाठिंबा जाहीर केला. तर पलानीस्वामींशी एकनिष्ठ असलेल्या अण्णाद्रमुकच्या आमदारांनी विरोधात मतदान केले. तसेच पक्षादेशाचे उल्लंघन करणाऱ्या आमदारांना पक्षांतरबंदी कायदा लागू होईल, असा इशारा दिला. ■

विश्वासदर्शक ठरावादरम्यान, अनेक विरोधी आणि मित्रपक्षांनी टीव्हीके सरकारला आपला पाठिंबा जाहीर केला. विधानसभेतील विश्वासदर्शक ठरावादरम्यान काँग्रेस, सीपीआय(एम), सीपीआयसह व्हीसीकेनेही टीव्हीके सरकारला पाठिंबा जाहीर केला. दरम्यान, व्हीसीकेने सरकारकडे महाराष्ट्र आणि कर्नाटकप्रमाणे तामिळनाडूमध्येही अंधश्रद्धेविरोधात कायदा करण्याची मागणी केली.

व्हीसीकेचे आमदार वन्नी अरसू यांनी सांगितले की, धर्मनिरपेक्ष पक्षांनी सरकारला बिनशर्त पाठिंबा दिला आहे. टीव्हीके सरकार आपला पाच वर्षांचा कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण करेल, असा विश्वासही व्यक्त केला. सभा कामकाजादरम्यान, आययूएमएलनेही टीव्हीके सरकारला पाठिंबा जाहीर केला. सभागृहात बोलताना, आययूएमएलच्या नेत्यांनी सांगितले की, विजय सरकारची सुरुवातीची कामगिरी सकारात्मक संकेत देत आहे.

**भाजपाची तटस्थ भूमिका**

भाजपाने विश्वासदर्शक ठरावावर आपली तटस्थ भूमिका घेतली. पीएमकेच्या चार आमदारांपैकी, सौम्या अंबुमणी यांनी सांगितले की, त्यांचा पक्ष विश्वासदर्शक ठरावावर मतदान करणार नाही. अण्णाद्रमुकचे आमदार एडप्पाडी के. पलानीस्वामी यांनी सांगितले की, ते टीव्हीके सरकारच्या विरोधात मतदान करतील. ■

**द्रमुकचा सभात्याग**

द्रमुकने ७१७ दारूची दुकाने बंद केल्याबद्दल टीव्हीके सरकारचे कौतुक केले.

द्रमुकने ‘सौदेबाजी’ केल्याचा आरोप करत विशेष कर्तव्य अधिकाऱ्याच्या नियुक्तीला आक्षेप घेतला. तथापि, प्रस्तावावर मतदान होण्यापूर्वीच द्रमुकच्या आमदारांनी सभात्याग केला.

(वृत्तसंस्था)

# भोंदू खरात प्रकरणात नामकर्ण आवारेला अटक

◆ **नाशिक, १३ मे**

महिला लैंगिक प्रकरणातील आरोपी भोंदू अशोक खरात प्रकरणात एसआयटीकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. गत आठवड्यात एसआयटीने महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रूपाली चाकणकर यांची सहा तास चौकशी केली होती. त्यानंतर आता सिन्नर पोलिसांनी शिवनिका संस्थानचे माजी सचिव आणि जगदंबा माता पतसंस्था संचालक नामकर्ण आवारेला अटक केली आहे. आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात ही अटक झाल्याची माहिती आहे.

सिन्नरच्या जगदंबा माता पतसंस्थेत खरातने उघडलेल्या ३२ खात्यांना आवारे याची सहमती असल्याचे तपासात निष्पन्न झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. खरातच्या कबुलीनंतर सिन्नर पोलिसांनी नामकर्ण आवारेला अटक केली. अशोक खरातला मंगळवारी सिन्नर पोलिसांनी अटक करून बुधवारी कोर्टात हजर केले होते. खरातच्या चौकशीत नामकर्ण आवारेचे नाव पुढे आल्यानंतर त्यालाही अटक करण्यात आली.

**आवारे सिन्नर तालुका औद्योगिक वसाहतीचा अध्यक्ष**

नामकर्ण आवारे सिन्नर तालुका औद्योगिक वसाहतीचा अध्यक्ष आणि जगदंबा माता पतसंस्था कुंदेवाडीचा संस्थापक आहे. त्याने ‘असा मी नामकर्ण’ या पुस्तकात अशोक खरातची स्तुती करणारे लेख लिहिल्याने आवारे चर्चेत आला होता.

(वृत्तसंस्था)

# सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी सरकारची तिजोरी खुली

### प्रत्येक आखाड्याला मिळणार पाच कोटींचा निधी!

◆ **मुंबई, १३ मे**

आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा हा केवळ धार्मिक सोहळा नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सेवाभावी परंपरेचा आदर्श जगासमोर ठेवण्याची संधी आहे. या पृष्ठभूमीवर, आखाड्यांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रति आखाडा पाच कोटी रुपयांचा निधी आणि छोट्या संस्थानांना १५ लाख रुपयांचा निधी देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केली. सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कुंभमेळा आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मंत्री छगन भुजबळ, गिरीश महाजन, दादाजी भुसे, उदय सामंत, शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्यासह १३ आखाड्यांचे साधू-महंत उपस्थित होते.

**सुरक्षेबाबत तडजोड नाही : उपमुख्यमंत्री शिंदे**

कुंभमेळ्याच्या सुरक्षेबाबत प्रशासन कोणतीही तडजोड करणार नाही. ३७७ एकर जमीन आरक्षित केली असून आखाड्यांच्या मागणीनुसार अतिरिक्त जमीन देण्याबाबत शासन सकारात्मक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या खंबीर पाठबळामुळे आपण मंदिरांचे पुनरुज्जीवन आणि धार्मिक स्थळांचा विकास याला प्राधान्य देत आहोत, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. ■

**काय आहेत मुख्यमंत्र्यांच्या मोठ्या घोषणा?**

**आखाड्यांना बळ :** आखाड्यांची वीज देयके आता प्राधिकरणाकडून भरली जाणार.

**जमीन अधिग्रहणाचा मोबदला :** शासकीय कामासाठी आखाड्यांची जमीन घेतल्यास त्यांना योग्य मोबदला किंवा पर्यायी जमीन दिली जाईल.

कायमस्वरूपी विकास : हा कुंभमेळा केवळ यंदाचा विचार करून नव्हे, तर पुढील १२ वर्षांच्या गरजा लक्षात घेऊन नियोजित केला आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये स्थायी स्वरूपाची विकासकामे होतील.

**आरोग्य कवच :** भाविक आणि साधू-महंतांसाठी विशेष आरोग्य बृहत आराखडा तयार, वैद्यकीय मदतीसाठी चोख व्यवस्था.

**त्र्यंबकेश्वरमध्ये साकारणार भव्य दर्शन पथ**

भाविकांच्या सुलभ दर्शनासाठी ६६५ कोटी रुपयांचा त्र्यंबकेश्वर दर्शन पथ प्रकल्प राबवण्यात येणार आहे. याचे ई-भूमिपूजन आज पार पडले. काळ्या पाषाणात, पारंपारिक मराठा शैलीत बांधल्या जाणाऱ्या या प्रकल्पामुळे शहरातील वाहतूक कोंडी ८० टक्क्यांनी कमी होईल. यात ९,००० भाविकांची क्षमता असलेले शिव दर्शन संकुल आणि एआय आधारित गर्दी व्यवस्थापन तंत्रज्ञान असेल.

**असा असेल दर्शन पथ प्रकल्प:**

**एकूण खर्च:** ६६५ कोटी (दोन टप्प्यात).

**सुविधा:** वातानुकूलित हॉल, एलईडी स्क्रीन आणि अखंड दर्शन रांग.

**सुरक्षा:** ५ मिनिटांत आपत्कालीन निर्गमन ( ) करण्याची क्षमता.

**नूतनीकरण:** नाशिकमधील रामकुंड, रामकाल पथ आणि प्राचीन गुंफांचा जीर्णोद्धार केला जाणार. या बैठकीत कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी सादरीकरण केले. साधू-महंतांनी सरकारच्या नियोजनाबद्दल समाधान व्यक्त करत काही महत्त्वाच्या सूचनाही मांडल्या, ज्यांचा सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

(तभा वृत्तसेवा)

# पंतप्रधान मोदींच्या ताफ्यातील वाहनांत कपात

### इंधन बचतीसाठी निर्णय

### इतर केंद्रीय मंत्र्यांच्या गाड्यांची संख्या ५० टक्क्यांनी घटवली



◆ **नवी दिल्ली, १३ मे**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पृष्ठभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना पेट्रोलियम उत्पादनांचा वापर संयमाने करण्याचे आवाहन केले. पंतप्रधानांनी स्वतः इंधन बचतीवर भर दिला असून, स्वतःच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या ५० टक्क्यांनी कमी करण्याचा आदेश दिला. इलेक्ट्रिक वाहनांचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत.

पंतप्रधानांच्या ताफ्यात कपात केल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथसिंह, केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांनी त्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या ५० टक्क्यांनी घटवली आहे. पंतप्रधानांच्या सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी असलेल्या विशेष सुरक्षा दलाला ताफ्यातील गाड्या कमी करण्याचा निर्देश देण्यात आला आहे. ही कपात करताना कोणत्याही प्रकारे सुरक्षा नियमावलीशी तडजोड केली जाणार नाही, याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले आहे. एसपीजीने या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली असून, नवीन गाड्यांची खरेदी न करता उपलब्ध संसाधनांतूनच इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवण्यावर भर दिला जाणार आहे.

**इंधन बचतीचे मार्ग शोधण्यास सुरुवात**

पंतप्रधानांच्या आवाहनानंतर केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयांनीही इंधन बचतीचे मार्ग शोधण्यास सुरुवात केली आहे. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा आणि मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्यासह इतर नेत्यांनीही त्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. ■

(वृत्तसंस्था)



उत्तराखंडातील चंपावत येथे बुधवारी पहाटे भीषण आग लागून टनकपूर येथील अनेक दुकाने जळून खाक झाली. यावेळी आग विझवताना अग्निशमन दलाचे कर्मचारी

# संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा यंदाचा मुक्काम भवानी पेठेतच

### प्रशासनाकडून १० कोटींची तरतूद

### जागेच्या विस्ताराचे लेखी आश्वासन

◆ **पिंपरी, १३ मे**

श्री संत ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पुणे येथील मुक्कामाबाबत गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चेवर अखेर पडदा पडला आहे. यंदाचा पालखी सोहळ्याचा पुण्यातील दोन दिवसांचा मुक्काम परंपरेनुसार भवानी पेठेतील श्री पालखी विठोबा मंदिर येथेच होईल अशी अधिकृत घोषणा श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीने बुधवारी केली आहे.

कमिटीने घेतलेल्या पत्रकार परिषदेत प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप, चैतन्य महाराज लोंढे, रोहिणी पवार, हैबतबाबा यांचे वंशज राजेंद्र महाराज आरफळकर आदी यावेळी उपस्थित होते.

**पालखी सोहळ्याचे वेळापत्रक**

संस्थानचे विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप यांनी दिलेल्या माहितीनुसार, या वर्षीचा सोहळा ८ जुलै ते ९ ऑगस्ट या कालावधीत संपन्न होईल.

पुण्यनगरीत पालखीचे आगमन ९ जुलैला होणार आहे. ९ व १० जुलै या दोन दिवसांत पालखीचा मुक्काम पुण्यात होणार आहे. या पालखी सोहळ्यासाठी नियोजनाची बैठक मार्च महिन्यात पार पडली होती. त्यानंतर एप्रिल महिन्यात पुणे येथील मुक्कामाच्या जागेबाबत प्रशासनाच्या वतीने विविध बैठका घेण्यात आल्या. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ आणि आमदार हेमंत रासने यांनी भवानी पेठेतच मुक्काम ठेवण्याबाबत आणि सुविधा पुरवण्याबाबत सकारात्मक चर्चा केली होती. ■

भवानी पेठेतील जागा अपुरी पडत असल्याने संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा मुक्काम बदलण्याबाबत वारकरी संप्रदायाकडून २०१० पासून मागणी होत होती. मात्र, जिल्हाधिकारी, महापालिका प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या पुढाकारामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी १३ मे ला सोयी-सुविधांबाबत लेखी हमीपत्र संस्थानला दिले आहे. हे हमीपत्र प्राप्त झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

पुणे महानगरपालिकेने भवानी पेठ मुक्कामासाठी आणि सुविधांसाठी १० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. मंदिर परिसरातील गर्दीचे नियोजन करण्यासाठी शेजारील ३ खाजगी मिळकती ताब्यात घेण्याची प्रक्रिया पुणे महापालिकेकडून सुरू करण्यात आली असून याबाबत खाजगी मालकांसोबत सकारात्मक चर्चा झाली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया प्रगतिपथावर आहे. मंदिर परिसरातील समोरील अतिक्रमणे हटवून तो भाग मोकळा करण्यात आला आहे. महापालिका ३१ मे पर्यंत लगतच्या जागा ताब्यात घेऊन मंदिराच्या जागेचा विस्तार करणार आहे.

(वृत्तसंस्था)

# अखिलेश यादव यांचे बंधू प्रतीकचा मृत्यू

### हृदय आणि श्वसन प्रणाली झाली निकामी

◆ **लखनौ, १३ मे**

समाजवादी पार्टीचे प्रमुख अखिलेश यादव यांचे बंधू आणि भाजपा नेत्या अपर्णा यादव यांचे पती प्रतीक यादव यांचा बुधवारी सकाळी मृत्यू झाला. सकाळी ६ वाजता अस्वस्थ वाटत असल्यामुळे त्यांना लखनौ सिव्हिल हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

श्यामा प्रसाद मुखर्जी हॉस्पिटलचे सीएमएस डॉ. देवेश चंद्र यांनी सांगितले की, रुग्णालयात आणण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. पंचनाम्यानंतर प्रतीक यांचा मृतदेह केजीएमयूमध्ये नेण्यात आला, जिथे शवविच्छेदन करण्यात आले. शवविच्छेदन अहवालानुसार, त्यांचा मृत्यू हृदय आणि श्वसन प्रणाली अचानक निकामी झाल्यामुळे झाला.

काही काळापूर्वी त्यांना गंभीर अवस्थेत लखनौमधील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्रतीक यांना पल्मोनरी एम्बोलिझम नावाचा जीवघेणा आजार झाला होता. या आजारामुळे फुफ्फुसांवर गंभीर परिणाम होतो आणि तो अत्यंत धोकादायक मानला जातो. या स्थितीत फुफ्फुसांच्या रक्तवाहिन्यांमध्ये रक्ताची गुठळी अडकते, ज्यामुळे शरीरातील रक्ताभिसरणात गंभीर अडथळा निर्माण होतो. या स्थितीमुळे अचानक श्वास घेण्यास त्रास होणे, छातीत तीव्र वेदना, खोकला आणि ऑक्सिजनची पातळी कमी होणे अशी लक्षणे दिसतात.

**हा गंभीर आजार जीवघेणा मानला जातो**

प्रतीक यादवला त्याचे आवश्यक उपचार पूर्ण होण्यापूर्वीच रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला होता. त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते. फुफ्फुसीय एम्बोलिझम ही एक गंभीर वैद्यकीय आपत्कालीन स्थिती आहे, ज्यासाठी त्वरित आणि तज्ज्ञ वैद्यकीय मदतीची आवश्यकता असते.

(वृत्तसंस्था)

### भारताकडे ६० दिवसांचा खनिज तेलसाठा

**नवी दिल्ली :** भारताकडे ६० दिवसांचा क एफबीआयने दिलेल्या माहितीनुसार, कच्च्या तेलाचा आणि ४५ दिवसांचा एलपीजीचा साठा आहे. पुरवठ्याच्या बाबतीत कोणतीही अडचण नाही, असे पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी सांगितले.

हरदीप पुरी यांनी दिल्लीत आयोजित सीआयआय वार्षिक व्यवसाय परिषदेत पंतप्रधानांच्या बचतीच्या आवाहनाचाही उल्लेख केला. पंतप्रधानांनी दोन दिवसांपूर्वी जे काही सांगितले आहे, त्यावरून गोंधळ घालणे व्यर्थ आहे. पंतप्रधानांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐका. त्याचा मनमानी अर्थ काढू नका, असे पुरी म्हणाले. सरकारने पश्चिम आशियातील संकटामुळे ऊर्जा पुरवठ्यात आलेल्या अडथळ्यांचा भार सामान्य जनतेवर पडू दिला नाही. तेल कंपन्यांना दररोज एक हजार कोटी रुपयांचे नुकसान होत आहे, तर तोटा १,९८,००० कोटी रुपयांपर्यंत पोहोचणार आहे. जर तुम्ही तिमाही आकडेवारी पाहिली तर एकूण नुकसान एक लाख कोटी रुपयांचे आहे. अशा परिस्थितीत, तुम्ही हे कधीपर्यंत असेच चालू ठेवू शकता. ■

# शेगावच्या वैभवात भर पडणार!

- तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी १९.४२ कोटींचा निधी मंजूर
- भूसंपादनाचा मार्ग मोकळा; उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्य सरकारचा मोठा निर्णय

◆ **मुंबई, १३ मे**

गण गण गणात बोतेच्या जयघोषाने दुमदुमणाऱ्या शेगाव नगरीच्या विकासासाठी राज्य सरकारने आज पुन्हा एकदा तिजोरी उघडली आहे. श्री शेगाव तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत प्रलंबित कामांसाठी आणि भूसंपादनासाठी १९ कोटी ४२ लाख ३९ हजार १४९ रुपयांचा निधी वितरित करण्यास नियोजन विभागाने मंजुरी दिली आहे.

शेगाव नगर परिषदेने भूसंपादनाच्या मोबदल्याबाबत नागपूर खंडपीठात याचिका दाखल केल्या होत्या. यावर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने ५० टक्के रक्कम जमा करण्याचा आदेश दिला होता. न्यायालयाच्या या आदेशाचा आदर राखत आणि विकासकामांत खंड पडू नये, यासाठी राज्य सरकारने हा निधी तातडीने उपलब्ध करून दिला आहे.

**आराखड्याची वैशिष्ट्ये**

**निधीचे वितरण :** हा निधी अमरावती विभागीय आयुक्तांकडे



सोपवण्यात आला असून, ते या कामाचे मुख्य संनियंत्रण अधिकारी असतील.

**विकासकामांचा वेग :** या निधीमुळे शेगाव परिसरातील मोठी बांधकामे आणि पायाभूत सुविधांच्या कामांना मोठी गती मिळणार आहे.

**एकूण आराखडा :** शेगावचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आतापर्यंत ४२९.५५ कोटी रुपयांच्या सुधारित आराखड्याला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

(तभा वृत्तसेवा)

**भक्तांना मिळणार अधिक सुविधा**

शेगाव हे विदर्भातील सर्वांत मोठे तीर्थक्षेत्र असल्याने तिथे दररोज हजारो भक्त दर्शनासाठी येतात. या विकास आराखड्यामुळे रस्ते, पाणी आणि भाविकांच्या निवासासह अन्य सोयीसुविधांचे जाळे अधिक मजबूत होणार आहे. बुलढाण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या मागणीनुसार हा निधी २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर करण्यात आला आहे. ■

# विकोने केले ग्राहक सहभाग उपक्रमाचे आयोजन

◆ **नागपूर, १३ मे**

विकोने ८ मे रोजी नागपूरमधील कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा माता मंदिरात दिवसभराच्या ग्राहक सहभाग कार्यक्रमाचे यशस्वीपणे आयोजन केले. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, विकोने आपली नव्याने सादर केलेली बाथिंग बारची श्रेणी प्रदर्शित केली.

यामध्ये हळद चंदन, कापूर, हळद ग्लिसरीन, हळद मिल्क प्रोटिन आणि नारळ कोरफड यांसारख्या अद्वितीय प्रकारांचा समावेश होता. यामुळे परंपरा आणि नावीन्य यांचा संगम साधला गेला. दिवसभर विविध प्रत्यक्ष उपक्रमांच्या माध्यमातून भक्तांशी संवाद साधण्यात आला. या कार्यक्रमात प्रसाद वितरणाचाही समावेश होता. यामुळे अभ्यागतांना एक आध्यात्मिकदृष्ट्या समृद्ध अनुभव मिळाला. या सोहळ्यात आणखी भर घालण्यासाठी, आरतीनंतर ग्राहक आणि भक्तांसोबत १०८ दिवे प्रज्वलित करण्यात आले. ते सकारात्मकता आणि एकतेचे प्रतीक होते. एक विशेष फोटो बूथ देखील उभारण्यात आला होता. यामुळे अभ्यागतांना कार्यक्रमातील अविस्मरणीय क्षण टिपून सोबत घेऊन जाण्याची संधी मिळाली.




भारतीय आध्यात्मिक अर्पणांमधील कापूर हा एक महत्त्वाचा घटक असल्याने, विकोच्या कापूर बाथिंग बारसोबतचे नाते खऱ्या अर्थाने प्रस्थापित झाले. या उपक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि सांस्कृतिकदृष्ट्या रुजलेल्या व ग्राहकांना खिळवून ठेवणाऱ्या ब्रँड अनुभवाच्या माध्यमातून विकोचे ग्राहकांशी असलेले नाते अधिक दृढ झाले. (वा.वा.)

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित



### विनम्र अभिवादन



धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची आज (तारखेप्रमाणे) जयंती

### विचारपुष्प



मी संघाचा कार्यकर्ता आहे. मी एक आहे पण माझ्यातून अनेकांना एकत्रित पाहायचे आहे. माझ्यासारखेच घडवायचे आहे. अशा मानसिकतेने अनेकांना प्रेरणा देण्याचे कार्य, कार्यकर्ता म्हणून माझ्या हातून घडावे, अनेकांना जोडले जावे, विकसित करावे असाच विचार सदैव मनात असावा.

**- स्व. सुरेशराव केतकर**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

### महत्त्वाचे

#### शेअर बाजाराच्या तीन दिवसांच्या घसरणीला ब्रेक

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारातील गेल्या सलग तीन दिवसांच्या पडझडीला बुधवारी अखेर पूर्णविराम मिळाला. दिवसभराच्या चढ-उतारानंतर बाजाराने पुन्हा उभारी घेतली. बीएसई सेन्सेक्स ४९ अंकांच्या किरकोळ वाढीसह ७४,६०८ च्या पातळीवर स्थिरावला. त्याचप्रमाणे निफ्टी ५० मध्येही ३३ अंकांची सुधारणा झाली असून तो २३,४१२ अंकांवर बंद झाला. बाजारातील ही वाढ जरी मर्यादित असली, तरी मागील काही सत्रांतील मोठ्या नुकसानीनंतर गुंतवणूकदारांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले. धातू क्षेत्रातील शेअर्सनी बाजाराला सावरण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. निफ्टी मेटल निर्देशांकात ३ टक्क्यांहून अधिक मोठी तेजी नोंदवण्यात आली. जागतिक स्तरावर तांब्याच्या दरात झालेल्या वाढीचा थेट फायदा भारतीय मेटल कंपन्यांना मिळाला. विशेषतः आफ्रिकेतील पुरवठा साखळीतील अडथळे आणि चीनकडून असलेली तांब्याची वाढती मागणी यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात धातूंचे दर वधारले. या सकारात्मक जागतिक संकेतांमुळे देशांतर्गत गुंतवणूकदारांनी धातू कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी खरेदी केली.

# एटीएसचे ४० ठिकाणी छापे

● विदर्भासह पुणे, मुंबई, नाशिकमध्ये झाडाझडती ● ५३ जणांची चौकशी
● आयएसआयशी संबंधित राज्यातील गुन्हेगारी टोळीविरुद्ध कारवाई

**मुंबई, १३ मे**

पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयसाठी काम करणारा कथित गुंड शहजाद भट्टी आणि डोग्रा टोळीशी संबंधित कथित सदस्यांच्या घरावर महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) राज्यातील ४० पेक्षा जास्त ठिकाणी बुधवारी छापेमारी केली. मुंबई, पुणे, नागपूर, नांदेड, जळगाव, अकोला, चंद्रपूर आणि नाशिकसह अनेक शहरांमध्ये केलेल्या कारवाईत भट्टीच्या संपर्कातील ५३ जणांची चौकशी करण्यात आली.

पाकिस्तानमधून कार्यरत असलेल्या कथित गुन्हेगारी टोळ्यांविरुद्ध ही मोहीम राबवण्यात आल्याची माहिती एटीएसच्या एका अधिकाऱ्याने दिली. एटीएसच्या ४८ पथकांनी विविध भागांमध्ये एकाचवेळी छापेमारी केली. मुंबईतील नालासोपारा, मीरा रोड या भागात, तर पुण्यातील तीन परिसरांत, नांदेड, जळगाव, नाशिक जिल्ह्यात प्रत्येकी दोन ठिकाणी कारवाई झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. राज्यात कार्यरत असलेल्या कथित गुन्हेगारी टोळ्या उद्ध्वस्त करण्यासाठी आणि भट्टी व डोग्रा या टोळ्यांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असल्याचा संशय असलेल्या व्यक्तींना ओळखण्यासाठी ही कारवाई करण्यात आली.

छापेमारी करण्यात आलेले संशयित गुन्हेगार समाज माध्यमाद्वारे आयएसआयच्या इशाऱ्यावर काम करणाऱ्या भट्टीचे समर्थक आहे. पाकिस्तानमधून कार्यरत असलेल्या गुन्हेगारी टोळ्या महाराष्ट्रातील तरुणांची दहशतवादी मॉड्युलमध्ये भरती करण्यासाठी समाज माध्यमांचा वापर करत होते.

#### देशविरोधी कारवायांचा डाव

**परदेशातून गुन्हेगारी टोळी चालवणारा भट्टी समाज माध्यमातून भारतातील तरुणांना देशविरोधी कारवायांसाठी प्रोत्साहित करत आहे. यासाठी त्याने देशभरात जाळे विणले. त्याचे सदस्य दहशतवादी मॉड्युलसाठी तरुणांची भरती करण्यात सक्रिय आहे. या नेटवर्कचे लागेबांधे तपासणे आणि त्यांच्या निधी पुरवठा मार्गांची चौकशी करण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. एटीएसच्या छाप्यात लॅपटॉप, मोबाईल फोन, पेन ड्राइव्ह आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त केली. डिजिटल उपकरणांचे न्यायवैद्यक विश्लेषण केले जाणार असल्याचे एटीएस अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले.**





#### चाकण, शिरूर, वारजे परिसरात छापेमारी

**राज्यभरातील विविध भागांत बुधवारी सकाळी आठ वाजतापासून ही कारवाई सुरू आहे. राज्यभरात अशा ५७ संशयित व्यक्तींची एटीएसकडून चौकशी सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. पुण्यातील चाकण, शिरूर आणि वारजे परिसरातही एटीएसने छापेमारी केली.**

#### दिल्ली पोलिसांकडून माहिती

आयएसआयने शहजाद भट्टी मॉड्युलशी संबंधित सदस्यांच्या मदतीने दिल्लीतील एका मंदिरावर आणि हरयाणातील एका लष्करी छावणीवर हल्ल्याची योजना आखली होती. दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने दिल्लीसह चार राज्यांत टाकलेल्या छाप्यात भट्टीशी संबंधित नऊ जणांसह ४८२ कथित गुन्हेगारांना अटक केली. *(वृत्तसंस्था)*

# १४ खरीप पिकांच्या किमान हमी भावात वाढ

**केंद्र सरकारचा शेतकऱ्यांना मोठा दिलासा**



**केंद्रीय मंत्रिमंडळाचा धोरणात्मक निर्णय**

**नवी दिल्ली, १३ मे**

देशातील शेतकऱ्यांना दिलासा देताना केंद्र सरकारने खरीप पिकांच्या किमान हमी भावात मोठी वाढ केली आहे. यामुळे शेतकऱ्यांना २०२६-२७ या आर्थिक वर्षात २ लाख ६० हजार कोटी रुपयांचा फायदा होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा आणि अन्य महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नंतर एका पत्रपरिषदेत या निर्णयांची माहिती दिली.

निसर्गाचा मार आणि जागतिक तणाव यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले, त्याची भरपाई करण्यासाठी केंद्र सरकारने १४ खरीप पिकांच्या किमान हमी भावात वाढ करण्याचा निर्णय घेतला. उत्पादन खर्च आणि कृषी मूल्य आयोगाने केलेल्या शिफारसींच्या आधारावर खरीप पिकांच्या किमान हमी भावात वाढ करण्यात आली आहे. चालू आर्थिक वर्षात खरीप पिकांची किमान हमी भावानुसार ८२४. ४१ लाख मेट्रिक टन खरेदी केली जाणार आहे.

धानाच्या किमान हमी भावात प्रतिक्विंटल ७२ रुपयांने वाढ करत तो २४४१ रुपये करण्यात आला. आधी हा भाव २३६९ रुपये होता. ए ग्रेडच्या धानाचा हमी भाव प्रतिक्विंटल ७२ रुपयांची वाढ करीत २३८९ रुपयांवरून २४६१ रुपये करण्यात आला आहे.

हायब्रीड ज्वारीच्या हमी भावात प्रतिक्विंटल ३२४ रुपयांने वाढ करत ४०२३ रुपये करण्यात आला, आधी हा भाव ३६९९ रुपये होते. ज्वारी मलदंडीच्या भावात प्रतिक्विंटल ३२४ रुपयांनी वाढ करीत तो ४०७३ रुपये करण्यात आला, आतापर्यंत हा भाव ३७४९ रुपये होता. बाजऱ्याच्या भावात १२५ रुपयाने वाढ करीत तो, २७७५ वरून २९०० रुपये करण्यात आला आहे. रागीच्या भावात ३१९ रुपयांची वाढ करत तो ४८८६ वरून ५२०५ रुपये करण्यात आला. तूर डाळीच्या भावात प्रतिक्विंटल ४५० रुपयांने वाढ करत तो ८००० रुपयांवरून ८४५० रुपये करण्यात आला.

मूग डाळीच्या भावात सर्वांत कमी म्हणजे फक्त १२ रुपयांची वाढ करण्यात आली, त्यामुळे त्याचा भाव ८७६८ वरून ८७८० रुपये झाला आहे. मक्याच्या भावातही प्रतिक्विंटल फक्त १० रुपयांची वाढ करण्यात आली. त्यामुळे त्याचा भाव २४०० रुपयांवरून २४१० रुपये झाला आहे. उडद डाळीच्या भावात प्रतिक्विंटल ४०० रुपयांची वाढ करत ७८०० रुपयांवरून ८२०० रुपये झाला आहे. *(तभा वृत्तसेवा)*

# ‘नीट’ घोटाळ्याचे पुणे कनेक्शन उघड!

**पुणे, १३ मे**

देशभरात गाजत असलेल्या ‘नीट’ पेपरफूट प्रकरणाचे धागेदोरे आता पुण्यापर्यंत पोहोचले असून, या घोटाळ्यातील ‘पुणे कनेक्शन’ समोर आले आहे. सीबीआयने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथून मुख्य संशयित धनंजय लोखंडे याला ताब्यात घेतले. त्यानंतर लोखंडेच्या संपर्कात असलेल्या बिबवेवाडीतील मनीषा वाघमारे आणि इंजिनीअरिंग करणाऱ्या विद्यार्थ्याला पुणे पोलिसांनी ताब्यात घेत चौकशी केली. विद्यार्थी शोधणे, त्यांच्याकडून पैसे गोळा करणे आणि संशयितांपर्यंत पोहोचवणे, अशी भूमिका या दोघांची असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. सीबीआयने नीट पेपरफूट प्रकरणाचा तपास हाती घेतल्यानंतर महाराष्ट्रातही हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. तपासादरम्यान धनंजय निवृत्ती लोखंडे हा महत्त्वाचा संशयित असल्याचे समोर आले. गेली चारपाच वर्षे तो पुण्यातील वाघोली परिसरात राहत होता. मंगळवारी पुणे पोलिसांना वाघोली परिसरात लोखंडेचे लोकेशन मिळाले होते. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच तो तेथून पसार झाला. त्यानंतर मध्यरात्रीनंतर राहुरी परिसरातून सीबीआयने त्याला ताब्यात घेतले.

## सोने, चांदीवरील आयात शुल्क १५ टक्क्यांनी वाढले

**नवी दिल्ली, १३ मे**

केंद्र सरकारने सोने आणि चांदीवरील आयात शुल्क १५ टक्क्यांनी वाढवल्यामुळे बुधवारी स्थानिक बाजारात सोने आणि चांदीच्या दरात मोठी वाढ झाली.

सोन्याचा भाव ८,५५० रुपयांनी वाढून प्रति १० ग्रॅ १.६५ लाखांच्या वर गेला. तर चांदीच्या दरातही प्रति किलोग्राम २०,५०० ची वाढ झाली. ही वाढ सरकारच्या अनावश्यक आयात कमी करण्याच्या निर्णयाचा थेट परिणाम आहे. बुधवारी सरकारने सोने आणि चांदीवरील आयात शुल्क ६ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत वाढवले. प्लॅटिनमवरील आयात शुल्कही ६.४ टक्क्यांवरून १५.४ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आले. हे नवीन दर बुधवारपासून लागू झाले आहे. पश्चिम आशियातील संकटाच्या पृष्ठभू ीवर वाढत्या आयातीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि अनावश्यक खरेदीला परावृत्त करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही सोन्याची खरेदी कमी करण्याचे आवाहन केले होते.

# जमिनीच्या व्यवहारात २० लाखांची फसवणूक; पाच महिलांसह १० जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ मे-**

जमिनीच्या व्यवहारातून एका तरुणाला तब्बल १९ लाख ३८ हजार ८०० रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार शहरातील कोर्टाच्या गेटसमोर उघडकीस आला आहे. हा फसवणुकीचा प्रकार २३ सप्टेंबर २०२३ पासून ते आजतागायत सुरू होता. याप्रकरणी १० जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(२), ३१८(४), ३५१(२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





नजरुद्दीन मौला शेख, मासुमबी मजरुद्दीन शेख, तुराब शेख, नामजीन शेख, खाजाभाई शेख, शबाना शेख, सलीमा शेख, दौलतबी पठाण, अब्दुल सत्तार शेख आणि किशोर सरवदे (सर्व रा. सोलापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे असून याबाबत युवराज अशोक जानकर (वय ३३, रा. वज्रेश्वरी नगरी, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे.

यातील फिर्यादी जानकर यांनी मौजे कुंभारी येथील जमीन गट क्र. ६४७/१/ब मधील ४१ आर क्षेत्रापैकी आरोपी नजरुद्दीन मौला शेख याच्या वाट्याला आलेली ४८४७ चौ. फ ूट जागा खरेदी करण्यासाठी व्यवहार केला होता. या जागेबाबत नोटरी दस्तऐवजही करण्यात आले होते. मात्र, मुख्य आरोपी नजरुद्दीन शेख याने अन्य आरोपींशी संगनमत करून हीच जागा पुन्हा विकण्याचा कट रचला. आरोपींनी फिर्यादीची दिशाभूल करत त्याच जागेचा व्यवहार अन्य व्यक्तींशी केला. यामध्ये इसारा पावती, साठेखत करारपत्र आणि रजिस्टर कुलमुखत्यारपत्राचा वापर करून वरील आरोपींनी आपली १९.३८ लाखांची आर्थिक फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक चानकोटी हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहे.





**सोलापूर जिल्ह्यातील प्रकल्पांचे भूमिपूजन**

हसापूर ते बडदाल एन.एच. १५० सी चे ग्रीनफिल्ड अलाईनमेंटचे सहापदरीकरण करणे (पॅकेज-१४ अक्कलकोट-कुर्नूल)
(लांबी 36 कि.मी. । प्रकल्प खर्च 1552 कोटी)

वागदरी - अक्कलकोट-तोळणूर एन.एच. ५४८ बी चे पेव्हड् शोल्डरसहीत दुपदरीकरण करणे
(लांबी 48 कि.मी. । प्रकल्प खर्च 353 कोटी)

मोहोळ - बसवनगर - वळसंग एन.एच. ४६५ चे पेव्हड् शोल्डरसहीत दुपदरीकरण करणे
(लांबी 82 । प्रकल्प खर्च 756 कोटी)

दुधनी येथे रेल्वे उड्डाण पुल बांधणे व 4.122 किमी उर्वरित लांबी एन.एच. 150 ई चे उन्नतीकरण व दर्जोन्नतीकरण करणे.
(लांबी 4 कि.मी. । प्रकल्प खर्च 97 कोटी)

एन.एच. 150 ई - बोरी उमरगे येथे बोरी नदीवर मोठे पुल बांधणे
(लांबी 1 कि.मी. । प्रकल्प खर्च 26 कोटी)

**प्रकल्पांचे फायदे**

प्रस्तुत पॅकेज सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड कॉरिडॉरचा एक भाग आहे; यामुळे ३९० किमी आणि ६ तासांच्या प्रवासाच्या वेळेची बचत होते.
वन्यजीव संरक्षण उपाययोजनांमुळे प्राण्यांच्या सुरक्षित प्रवासाची खात्री होते.
अक्कलकोट आणि गाणगापूर या तीर्थक्षेत्रांपर्यंत पोहोचणे सुलभ होते.
राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४६५ चा हा भाग सोलापूरसाठी अतिरिक्त रिंग रोड म्हणून काम करेल.
वाहतूक कोंडी, प्रवासाचा वेळ आणि इंधनाचा वापर कमी होतो.
कृषी, पर्यटन, उद्योग आणि रोजगार निर्मितीला चालना मिळते.

दिनांक : गुरुवार, 14 मे 2026 । वेळ : संध्याकाळी 5.00 वाजता । स्थळ : नविन अक्कलकोट बस स्टँड, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

शुभहस्ते
**नितिन गडकरी**
केंद्रीय मंत्री, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, भारत सरकार

प्रमुख उपस्थिती

जयकुमार गोरे — माननीय मंत्री, ग्रामविकास आणि पंचायत राज, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री सोलापूर
प्रियांक खर्गे — माननीय ग्रामविकास व पंचायत राज, माहिती तंत्रज्ञान (IT), जैवतंत्रज्ञान (BT) मंत्री आणि कलबुर्गी जिल्ह्याचे प्रभारी मंत्री, कर्नाटक शासन
बी. आर. पाटील — माननीय उपाध्यक्ष, कर्नाटक राज्य धोरण व नियोजन आयोग (KSPPC) आणि आमदार, आळंद विधानसभा मतदारसंघ
दिपक वैद्य — अध्यक्ष, सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर
डॉ. ज्योती वाघमारे — राज्यसभा सदस्य, सोलापूर
ओमप्रकाश राजेनिंबाळकर — लोकसभा सदस्य, धाराशिव
धैर्यशिल मोहिते-पाटील — लोकसभा सदस्य, माढा
प्रणिती शिंदे — लोकसभा सदस्य, सोलापूर
सागर खंड्रे — लोकसभा सदस्य, बिदर
अरुण लाड — विधानपरिषद सदस्य
जयंत आसगांवकर — विधानपरिषद सदस्य
सुभाष देशमुख — आमदार, दक्षिण सोलापूर
दिलीप सोपल — आमदार, बार्शी
विजय देशमुख — आमदार, सोलापूर शहर उत्तर
नारायण पाटील — आमदार, करमाळा
समाधान अवताडे — आमदार, पंढरपूर-मंगळवेढा
सचिन कल्याणशेट्टी — आमदार, अक्कलकोट
उत्तमराव जानकर — आमदार, माळशिरस
राजु खरे — आमदार, मोहोळ
अभिजीत पाटील — आमदार, माढा
डॉ. बाबासाहेब देशमुख — आमदार, सांगोला
देवेंद्र कोठे — आमदार, सोलापूर शहर मध्य
बी. जी. पाटील — विधानपरिषद सदस्य
सुनील वल्ल्यापूर — विधानपरिषद सदस्य
जगदेव गुत्तेदार — विधानपरिषद सदस्य
तिप्पणाप्पा कमकनूर — विधानपरिषद सदस्य
शशिल नमोशी — विधानपरिषद सदस्य
श्री. चंद्रशेखर बी. पाटील — विधानपरिषद सदस्य
डॉ. तलवार सबन्ना — विधानपरिषद सदस्य

फक्त रस्तेच नव्हे, तर देश बांधणी
www.morth.nic.in www.nhai.gov.in | www.facebook.com/MoRTHIndia www.facebook.com/NHAISocialmedia | www.twitter.com/MoRTHIndia www.twitter.com/NHAISocialmedia | FASTag

CBC 37107/13/0005/2627

# बारामतीत पुन्हा कोसळले विमान

## सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही

**पुणे, १३ मे**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताने हादरलेल्या बारामतीत पुन्हा एकदा शिकाऊ विमान कोसळल्याची घटना घडली आहे. ज्या परिसरात अजित पवारांचा अपघात झाला त्याच गोजुबावी गावात रेडबर्ड कंपनीचे प्रशिक्षणार्थी विमान कोसळले. सुदैवाने वैमानिकाने वेळीच विमानातून उडी मारल्याने अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

सकाळी साडे आठच्या सुमारास एका झाडाला आणि खांबाला धडक देऊन हे विमान गोजुबावी गावातील सरक यांच्या शेतात पडले. अपघात पाहणाऱ्या एका प्रत्यक्षदर्शी महिलेने सांगितले की, विमान ज्यावेळी कोसळले त्यावेळी विमानाचा कोणताही आवाज झाला नाही. त्यामुळेच विमान कोसळण्यापूर्वी इंजिन बंद पडले असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.



गेल्या चार महिन्यांपूर्वीच गोजुबावी गावात अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाला होता. या अपघातात अजित पवार यांच्यासह इतर चार जणांचा मृत्यू झाला होता. दरम्यान, अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत घटनेची माहिती पोलिस आणि प्रशासनाला दिली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्यासह पोलिस पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. बारामती एमआयडीसीच्या अग्निशामक दलाच्या गाड्यांनीही घटनास्थळी धाव घेतली. अपघातानंतर रेडबर्ड कंपनीच्या प्रशासनाकडून लगेचच हिरवे कापड टाकून विमान झाकण्यात आले. दरम्यान प्रशासनाने विमान कोसळण्यामागील नेके कारण शोधण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले असून, अधिकृत अहवालानंतरच संपूर्ण माहिती दिली जाणार आहे.

#### रेडबर्ड कंपनीच्या विमानांवर संशय

बारामतीमध्ये शिकाऊ वैमानिकांना प्रशिक्षण देण्यासाठी रेडबर्ड आणि कार्वर एव्हिएशन या दोन प्रमुख संस्था कार्यरत आहेत. परंतु, रेडबर्ड कंपनीचे विमान यापूर्वी देखील बारामती तालुक्यात अनेक वेळा पडले आहे. या कंपनीच्या विमानांचे सप्टेंबर २०२१ मध्ये, ऑक्टोबर २०२३ मध्ये चार दिवसांच्या अंतराने दोन अपघात आणि पुन्हा ऑगस्ट २०२५ मध्येही अपघाताची नोंद आहे. या कंपनीच्या विमानांवर जवळपास चार अपघातांची नोंद असून डीजीसीए यांनी या कंपनीवर या पूर्वीही उड्डाण करण्यास बंदी घातलेली होती.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# एकदाचं सगळं 'नीट' करा हो...!

देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य ज्या परीक्षेवर अवलंबून असते, ती 'नीट' परीक्षा अजिबातच नीट राहिली नाही. आता ती पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. ही परीक्षा घेणाऱ्या 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'च्या (एनटीए) विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना दुसऱ्यांदा घडली आहे. ३ मे २०२६ रोजी झालेली ही परीक्षा रद्द करून सरकारने सीबीआयला चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना, पालकांना मानसिक धक्का बसला आहे. अनावश्यक ताण निर्माण झालेला आहे. सकृद्दर्शनी परीक्षा रद्द होणे धक्कादायक असले, तरी पेपरफुटीची पृष्ठभूमी पाहता अशा निर्णयाची गरज एकदम नाकारता येण्याजोगी नाही हेही खरेच. मात्र, दोन वर्षांचे परिश्रम कामाला येतील, अशी अपेक्षा असतानाच तीच परीक्षा पुन्हा द्यावी लागेल, हा विचारच विद्यार्थ्यांसाठी खूप वेदनादायी आहे, हेही मान्य केले पाहिजे. विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणाऱ्या अशा परीक्षेत वारंवार पेपरफुटीचे आणि गैरव्यवहाराचे प्रकार घडत असतील, तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्या विश्वासाने पुढे तयारी करावी, हा फार गंभीर प्रश्न आहे. हे खरे की, विद्यार्थ्यांना पुन्हा अर्ज करावा लागणार नाही, परीक्षा शुल्क भरावे लागणार नाही. पण त्यांना बसलेल्या मानसिक धक्क्याचे आणि त्यांच्या वाट्याला आलेल्या ताणाचे काय? पेपर फोडणाऱ्यांना ही गोष्ट कळणार नाही. तब्बल २३ लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य अशा प्रश्नपत्रिकांच्या लिलावावर अवलंबून असते, तेव्हा ते व्यवस्थेचे नैतिक पतन असते. त्यामुळेच नीट परीक्षा रद्द झाली खरी; सोबतच लाखो मध्यमवर्गीय, गरीब, होतकरू विद्यार्थ्यांचा विश्वासही ढळला, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

पेपरफुटीचे धागेदोरे लातूर, नाशिक, पुणे आणि थेट राजस्थानपर्यंत पोहोचले आहेत. नाशिकमधील 'गेस पेपर' आणि मूळ प्रश्नपत्रिका यांतील कमालीचे साधर्म्य थक्क करणारे आहे. अगदी स्वल्प विराम आणि पूर्ण विरामासह प्रश्न जसेच्या तसे येणे हा केवळ योगायोग असू शकत नाही. तो सुनियोजित हेराफेरीचा भागच असावा. राजस्थान पोलिसांनी जप्त केलेल्या ४१० प्रश्नांच्या 'गेस पेपर'मधील तब्बल ५७५ गुणांचे प्रश्न जसेच्या तसे परीक्षेला आले, हे धक्कादायकच. २०१९ मध्ये 'एनटीए'कडे या परीक्षेची धुरा आली तेव्हापासूनच अशा लहान-मोठ्या गोंधळाची मालिका सुरू आहे. २०२४ मध्ये पाटण्यात ३० ते ५० लाख रुपयांमध्ये नीट परीक्षेचे पेपर विकले गेले. गुजरातमध्ये शिक्षकांनीच पैसे घेऊन 'ओएमआर' शीट भरून देण्याचे काम केले तर सवाई माधोपूरमध्ये चुकीच्या प्रश्नपत्रिकांचे वाटप झाले होते. २०२४ च्या निकालात ६७ विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० गुण मिळाले होते. गणितीयदृष्ट्या अशक्य असलेले ७१८ आणि ७१९ गुणही विद्यार्थ्यांना बहाल केले गेले; जे सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर मागे घ्यावे लागले. मात्र, २०२४ च्या या कटू अनुभवातून 'एनटीए'ने काहीच धडा घेतला नाही, हे यंदाच्या पेपरफुटीने सिद्ध केले आहे. पुन्हा एकदा तीच 'मोडस ऑपरेंडी' तसेच 'रॅकेट' आणि विद्यार्थ्यांचा तोच संताप समोर आला आहे. १० ते २५ लाख रुपयांत प्रश्नपत्रिकेची एक प्रत विकली जाते, हे ऐकून प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या पायाखालची जमीन सरकते आणि डोक्याचा भुगा होतो.

ज्या देशात डॉक्टर बनण्याची पात्रता ज्ञानावर नाही तर पैशाच्या जोरावर ठरवली जाते, त्या देशाचे आरोग्य धोक्यात असते, हे समजून घेतले पाहिजे. आपल्या देशात वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबातील विद्यार्थीही बघतात. मोजक्या भाग्यवंतांना शासकीय महाविद्यालयांत संधीही मिळते. एरवी वैद्यकीय शिक्षणाच्या भव्य दुकानदारीवर आणि डोनेशनवर ठरणाऱ्या प्रवेशांवर भरपूर बोलले-लिहिले गेलेच आहे. दोन-दोन, तीन-तीन वर्षे रात्रंदिवस अभ्यास करून, 'कोचिंग क्लास'चे अवाढव्य शुल्क भरून विद्यार्थी या परीक्षेला सामोरे जातात. मेहनतीने गुण मिळवतात. तरीही बऱ्याच लोकांच्या वाट्याला निराशा येते. कारण 'मॅनेजमेंट कोटा' आणि अवाढव्य 'डोनेशन'च्या नावाखाली पात्र नसलेले विद्यार्थी त्यांच्या जागा बळकावतात. आता 'पेपरफुटी'चा नवा राक्षसही सामान्य-गरिबांच्या स्वप्नांची राखरांगोळी करण्यासाठी तयार झाला आहे. अशा स्थितीत ज्यांच्याकडे केवळ बुद्धिमत्ता आणि कष्टाची तयारी आहे, अशा होतकरू विद्यार्थ्यांचे काय? खरी पात्रता असलेला विद्यार्थी मागे पडतो आणि ज्यांची लायकी नाही, पण लाखो रुपये फेकायची ताकद आहे, असा अपात्र उमेदवार डॉक्टर होतो. ही समाजाच्या आरोग्याशी केलेली प्रतारणाच आहे.

देशभरातील विद्यार्थी रस्त्यावर उतरून संताप व्यक्त करीत आहेत. त्यांचा आक्रोश रास्त आहे. कारण विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा त्याच तणावातून जावे लागणार आहे. पुन्हा प्रवासाचा भुर्दंड बसणार आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, ज्या विद्यार्थ्यांचा पेपर यावेळी चांगला गेला होता आणि पुढे समजा कमनशिबाने तो चांगला गेला नाही, तर त्याला जबाबदार कोण असेल? नाशिकमधून पकडल्या गेलेला शुभम किंवा राजस्थानातील मनीष ही केवळ प्यादी आहेत. यामागे मोठे अर्थकारण आणि शिक्षण 'माफिया' कार्यरत आहेत. नाशिकच्या इंदिरानगर पोलिसांपासून ते राजस्थानातील 'स्पेशल ऑपरेशन्स ग्रुप'पर्यंतच्या अनेक यंत्रणा या तपासात गुंतल्या आहेत. जे काही समोर येत आहे, ते केवळ हिमनगाचे टोक आहे. कोचिंग क्लासेस, दलाल आणि तांत्रिक तज्ज्ञांच्या संगनमताने चालणारी ही टोळी जोपर्यंत मुळासकट नष्ट केली जात नाही, तोपर्यंत परीक्षा पारदर्शी होणे नाही. वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया ही नुसती कठोर नव्हे तर निर्दोष आणि पारदर्शक असली पाहिजे. अतिशय महत्त्वाच्या या परीक्षेचा पेपर फुटतो ही बाब गंभीर आहेच; त्याहून भयावह हे की, 'एनटीए'ने इतिहासातून काहीच धडा घेतला नाही. त्यामुळे या यंत्रणेच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल आवश्यक आहे. 'जीपीएस ट्रॅकिंग', 'बायोमेट्रिक' पडताळणी आणि 'एआय' आधारित देखरेख असतानाही पेपर फुटतोच कसा? व्यवस्थेतील लोक यात सामील असण्याची दाट शक्यता आहे. अशा संस्थांमधील भ्रष्ट अधिकाऱ्यांना आणि म्होरक्यांना आजन्म कारागृहात पाठविले जात नाही, तोपर्यंत हे चक्र थांबणार नाही. ते वारंवार असे करीत राहतील. आता केवळ चौकशी समित्या नेमून चालणार नाही तर 'अँटी-पेपर लीक' कायद्याची कठोर अंमलबजावणी झाली पाहिजे. पेपर फोडणाऱ्यांना आणि विकत घेणाऱ्यांना मोठा धाक निर्माण होणे गरजेचे आहे. पेपरफुटीला देशद्रोहाइतकाच गंभीर गुन्हा मानून संबंधित गुन्हेगारांच्या मालमत्ता जप्त करणे आणि त्यांना जन्मठेपेसारखी शिक्षा देण्याची तरतूद करणे आवश्यक आहे. खाजगी शिकवण्यांच्या हस्तक्षेपावरही लगाम घालणे गरजेचे आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे हे खरे. पण आज हेच दूध माफियांच्या घशात जात आहे. आता विद्यार्थ्यांच्या संयमाचा अंत पाहू नये. केवळ मलमपट्टी न करता, या सडक्या व्यवस्थेवर 'मेजर सर्जरी' करण्याची वेळ आली आहे. अन्यथा, गुणवत्ता मरेल आणि केवळ पदव्या धारण केलेल्या पण कौशल्य नसलेल्यांची गर्दी तेवढी दिसेल. भावी डॉक्टरांच्या हाती अशा भ्रष्ट व्यवस्थेने 'स्टेथोस्कोप' दिला, तर तो या समाजाच्या नाडीचा ठोका नक्की चुकवेल. प्रश्न २३ लाख विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा आहे.


देशाच्या नैतिकतेचा व प्रतिमेचाही आहे. एखाद्या संस्थेचे नाव बदनाम झाले, तर अवघ्या जगात त्या संस्थेने प्रमाणित केलेल्या विद्यार्थ्यांना समोर उभे केले जात नाही. नागपूर विद्यापीठातील कोहचाडे प्रकरण याचे चांगले उदाहरण. त्या प्रकरणानंतर बरीच वर्षे या विद्यापीठातील विद्यार्थ्यांकडे संशयाने बघितले जात होते. 'एनटीए'नेही आजवर आपली अक्षमता वारंवार सिद्ध केली आहे. त्यामुळे सरकारने या संस्थेची पुनर्रचना करावी किंवा पर्यायी व्यवस्था निर्माण करावी. प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील अश्रू हे व्यवस्थेच्या अपयशाचे पुरावे आहेत, हे समजून घेतले पाहिजे. 'नीट'चे एकदाचे आणि कायमचे सगळे नीट केले पाहिजे. तरच या परीक्षेची विश्वासार्हता आणि विद्यार्थ्यांचे भवितव्य सुरक्षित राहील.

## प्रासंगिक

# जीवनोत्सवाची शिकवण देणारे गुरुदेव

**नंदिनी निखिल गडकरी**

**आध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर यांचा १३ मे रोजी जन्मदिवस होता. त्यानिमित्त...**



काही माणसे आपल्या आयुष्यात शांतपणे येतात, पण आपल्या मनावर आणि आत्म्यावर चिरस्थायी ठसा उमटवतात. माझ्यासाठी, गुरुदेव श्री श्री रविशंकर यांना भेटणे आणि 'आर्ट ऑफ लिव्हिंग'शी ओळख होणे हा अनोखा अनुभव होता. आर्ट ऑफ लिव्हिंगने जगभरातील आपल्या कार्याची ४५ वर्षे पूर्ण केली आहेत. या काळात या माध्यमातून कोट्यवधी लोकांना जीवनाचा खरा आनंद आणि अर्थ कळलेला आहे.

अगदी लहान वयात 'आर्ट ऑफ लिव्हिंग'शी जोडले जाणे, हा माझ्यासाठी सर्वात मोठा आशीर्वाद आहे. गुरुजींच्या शिकवणीने आणि त्यांच्या दिव्य कृपेने दैनंदिन जीवनातील चिंता कमी करण्यास मदत केली. मला असे वाटते की, गुरुजी हीच माझी सावली आहे आणि म्हणूनच ते प्रत्येक वेळी माझ्यासोबत असतात.

इयत्ता तिसरीत असताना माझ्या आजीकडून मला 'आर्ट ऑफ लिव्हिंग'बद्दल कळले आणि त्यानंतर, २०२१ मध्ये लॉकडाऊन संपल्यावर, मी पहिल्यांदा बंगळुरु येथील आंतरराष्ट्रीय 'आर्ट ऑफ लिव्हिंग' केंद्राला भेट दिली. तेव्हापासून, तिथे अनुभवलेली आपुलकी, शांती आणि आनंद माझ्यासोबत कायमचे राहिले आहेत. गुरुदेवांच्या शिकवणीतून, मी दयाळूपणाचे महत्त्व, तणाव देणाऱ्या किंवा विचार करण्यायोग्य नसलेल्या गोष्टी कशा सोडून द्याव्यात हे शिकले आहे. ते म्हणतात की, जीवन हा एक उत्सव आहे. त्याचा आनंद मिळवत राहिले पाहिजे. संकटांची, अडचणींची फार चिंता करू नये.

मी दरवर्षी त्यांच्या आश्रमाला भेट देते. कारण ते माझे दुसरे घर आहे. संगीता जानी दीदींसारख्या गुरुदेवांच्या अनेक अद्भुत शिष्यांची भेट घेण्याचे भाग्य मला लाभले. त्या म्हणतात, गुरू आपल्याला शोधून काढतात आणि आपल्या सोबत असतात. दुसऱ्या आहेत हेतल आंटी, ज्यांनी 'सुदर्शन क्रिया' ही दिव्य क्रिया शिकवली. त्यांच्या स्नेह आणि प्रोत्साहनामुळे मला नेहमी सुरक्षित आणि प्रेरित वाटले. त्यांच्या मायेने आणि वात्सल्याने माझ्या हृदयात जागा निर्माण केली आहे. त्यामुळेच माझे आश्रमातील वास्तव्य अविस्मरणीय बनले. गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त मी त्यांना वंदन करते. त्यांच्या ज्ञानाने, करुणेने आणि त्यांच्या दिव्य दृष्टीने माझ्यासह असंख्य जिवांना आशीर्वाद दिल्याबद्दल सर्वशक्तिमान परमेश्वराप्रति कृतज्ञता व्यक्त करते. त्यांची शिकवण आणि निरपेक्ष प्रेम जगभरातील लोकांना मधुर सत्संगासह सात्त्विक जीवनशैलीचा अवलंब करण्याचा प्रयत्न करण्यासाठी प्रेरणा आणि धैर्य देत आहे. गुरुदेवांचा आशीर्वाद आपल्या सर्वांना सतत मिळो, त्यांचे कार्य अविरत सुरू राहो आणि जगात सर्वत्र आनंद व शांतता नांदो, एवढेच परमेश्वराला मागणे.

॥ जय गुरुदेव ॥

## वेध

**नीलेश जोशी**

# विद्यार्थ्यांच्या आत्महत्या चिंताजनक

जगातील सर्वात तरुण देश अशी भारताची ओळख. आपल्या देशातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात ६५ टक्के लोकसंख्येचे वय ३५ वर्षांपेक्षा कमी तर देशाचे सरासरी वय केवळ २९ वर्षे इतके आहे. एकीकडे जागतिक स्तरावर ही अभिमानास्पद बाब असली, तरी दुसरीकडे देशांतर्गत विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटनांमध्ये सातत्याने होणारी वाढ ही सामाजिक चिंता वाढविणारी आहे. नुकताच राष्ट्रीय गुन्हे अभिलेख विभागाने 'अपघाती मृत्यू आणि आत्महत्या-२०२४' हा अहवाल प्रसिद्ध केला. त्यात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे वाढत असलेले प्रमाण चिंताजनक आहे. या आकडेवारीनुसार देशात २०२० साली १२ हजार ५५६ इतक्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. देशात झालेल्या एकूण आत्महत्यांच्या तुलनेत विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची टक्केवारी ८.२ इतकी होती. २०२१ साली १३ हजार ८९, २०२२ साली १३ हजार ४४, २०२३ साली १३ हजार ८९२ तर २०२४ साली १४ हजार ४८८ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद या अहवालात आहे. २०२४ साली एकूण आत्महत्येच्या तुलनेत ८.५ टक्के इतक्या आत्महत्या विद्यार्थ्यांच्या आहेत. ही आकडेवारी निश्चितच दुर्दैवी म्हणावी लागेल. त्यातही विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची सर्वाधिक १९०९ घटना महाराष्ट्रात झाल्याचे या अहवालातील आकडेवारीवरून दिसून येते. महाराष्ट्राखालोखाल उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, तामिळनाडू यांचा क्रम लागतो.

विद्यार्थी आत्महत्यांपैकी जवळपास ४३ टक्के आत्महत्या या ४ राज्यात घडल्याचे दिसून येते. नुकताच दहावीचा निकाल लागला. या निकालात बहुतांश विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले तर काहींना अपेक्षित यश गाठता आले नाही. अकोला जिल्ह्यातील एका घटनेमुळे आता यशाची व्याख्या कळेनाशी झाली आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याला ६७ टक्के मिळाले. खरं म्हणजे ही टक्केवारी प्रथम श्रेणीची पण या विद्यार्थ्याने निकालानंतर एका जलाशयात उडी मारून आत्महत्या केली. मोबाईलवरील स्टेटसमुळे त्याला अपेक्षित यश न मिळाल्याने त्याने आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले. या घटनेमुळे पुन्हा एकदा यश-अपयश, ज्ञान प्राप्ती- शिक्षण या सर्व बाबीचे समीक्षण आणि विद्यार्थ्यांचे समुदेशन करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

शिक्षण हे आता ज्ञानप्राप्तीचे साधन राहिले नसून ते आता स्पर्धेचा आखाडा झाल्याचे चित्र आहे. अगदी शिशू अवस्थेपासून शाळा (कॉन्व्हेंट), शिकवणी, एक्स्ट्रा क्लास, विशेष वर्ग (अदर ॲक्टिव्हिटी) या चक्रात विद्यार्थी अडकतो अन् मग उरते ती केवळ मार्क आणि टक्केवारीची स्पर्धा. यातूनच आत्महत्येसारखी समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे समोर येत आहे. वास्तविक इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, वाङ्मय अशा क्षेत्रातही उत्तम ज्ञान, संधी आहेत. देशाच्या विकासात प्राध्यापक, संशोधक, तज्ज्ञ आदींनी या विषयाद्वारे महत्त्वपूर्ण भूमिका वठविली आहे. या विषयासह विविध विषयांचे ज्ञान असणाऱ्यांची गरज भविष्यातही आहेच. दुर्दैवाने पालक आणि विद्यार्थी केवळ स्पर्धा परीक्षा, इंजिनीअरिंग, वैद्यकीय क्षेत्र यालाच भविष्य समजू लागले.

यातच जीवनाचे सार्थक आहे. या कल्पनेच्या बाहेर विद्यार्थी जाऊ शकत नसल्याने विद्यार्थ्यांची मानसिक अवस्था विचित्र होत आहे. अनेकदा स्वतःतील न्यूनगंड वाढतो. 'मी मागे पडतोय' ही भावना मानसिक तणाव वाढवते. वास्तविक एका परीक्षेतील अपयश म्हणजे आयुष्याचा शेवट हा कधीच असू शकत नाही. पण दुर्दैवी घटनांमध्ये सतत होणारी वाढ ही भयावह आहे. आत्महत्येचा विचार सुरू असणाऱ्याच्या मनात प्रचंड द्वंद्व सुरू असतं, आत्महत्येचा विचार केवळ निकोप संवादातून दूर सारला जाऊ शकतो, असेही असे तज्ज्ञांचे मत आहे. खरं म्हणजे मनमोकळा संवाद हा भारतीय कुटुंब व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. दुर्दैवाने गत काही वर्षात कुटुंबातील संवाद कमी होत असल्याचे दिसून येते. याची अनेकानेक कारणे असली तरी कुटुंबातील निकोप संवाद वाढणे, अधिक दृढ होणे हे विद्यार्थी आत्महत्येसह विविध समस्यांच्या निराकरणासाठी आवश्यक आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# रालोआ मजबूत, इंडिया आघाडी कमजोर

**श्यामकांत जहागीरदार**

केरळ, आसाम, पुडुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या पाच राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या निकालाने नेमके काय झाले, याचे उत्तर भाजपाच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी अधिक मजबूत झाली, तर काँग्रेसच्या नेतृत्वातील विरोधकांची इंडिया आघाडी आणखी कमजोर झाली, असे म्हणावे लागेल. आसाम आणि पुडुचेरीत भाजपा आणि भाजपाच्या मित्रपक्षांची सत्ता होती; त्यात आता पश्चिम बंगालची भर पडली आहे. या पाच राज्यातील कुठेही काँग्रेसची सत्ता नव्हती, पण काँग्रेसच्या नेतृत्वातील संयुक्त लोकशाही आघाडीला केरळमध्ये बहुमत मिळाले. काँग्रेसची सत्ता असलेल्या राज्यात एकने वाढ झाली. त्यामुळे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह काँग्रेस नेत्यांनी आपल्या हाताने आपली पाठ थोपटून घ्यायला हरकत नाही. केरळमधील काँग्रेसच्या विजयात राहुल गांधी यांचा 'हात' किती आहे, हा खरं म्हणजे संशोधनाचाच विषय आहे. २०१९ च्या लोकसभेत राहुल गांधी केरळमधील वायनाड लोकसभा मतदारसंघातून निवडून आले होते. २०२४ ची लोकसभा निवडणूकही ते रायबरेलीसोबत वायनाडमधून जिंकले; नंतर त्यांनी रायबरेली कायम ठेवत वायनाडचा राजीनामा दिला. त्यामुळे वायनाड मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत प्रियांका वढेरा जिंकल्या आहेत. केरळमधील युडीएफच्या विजयात गांधी घराण्याचा एवढाच बादरायण संबंध म्हणायला हरकत नाही.

तामिळनाडूत चित्रपट अभिनेते विजय यांच्या पक्षाने सर्वाधिक म्हणजे १०८ जागा जिंकल्या. २३४ सदस्यांच्या तामिळनाडू विधानसभेत बहुमतासाठी ११८ जागांची आवश्यकता होती. त्यामुळे विजय यांच्या तमिळगा वैत्ती कळगम (टीव्हीके) या पक्षाला बहुमतासाठी १० जागा कमी पडल्या. अशा वेळी कधी नव्हे ती चपळाई दाखवत काँग्रेसने विजय यांच्या पक्षाला पाठिंबा जाहीर केला. काँग्रेसने या निवडणुकीत खूप जास्त जागा जिंकल्या असेही नाही; त्या पक्षाला फक्त ५ जागा मिळाल्या. या पाच जागाही काँग्रेसला राज्यात स्वतःच्या ताकदीवर जिंकता आल्या नाही. त्यासाठी द्रमुकच्या कुबड्या धराव्या लागल्या. पण सत्तेच्या वितभर तुकड्यासाठी काँग्रेसने दीर्घकाळपासून राज्यात द्रमुकशी असलेली आपली सोयरिक मोडली. यातून काँग्रेसला तात्कालिक लाभ झाल्यासारखे दिसत असले, तरी दीर्घकालीन नुकसान झाले आहे. टीव्हीकेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेताना काँग्रेसने आपला मित्रपक्ष असलेल्या द्रमुकला विश्वासात घ्यायला हवे होते; पण काँग्रेसने तसे केले नाही. द्रमुकला अंधारात ठेवून टीव्हीकेला पाठिंबा जाहीर करीत काँग्रेसने एकप्रकारे द्रमुकच्या पाठीत खंजीर खुपसला, असे म्हणायला हरकत नाही. राज्यात विजय यांच्या नेतृत्वातील सरकारला पाठिंबा देण्यासाठी काँग्रेसच्या दिल्लीतील नेतृत्वाने माकप आणि भाकप अशा डाव्या पक्षाच्या नेत्यांना दूरध्वनी करीत त्यांचेही मन वळवले. पण काँग्रेस नेत्यांच्या या भूमिकेमुळे द्रमुक नेते दुखावले गेले. त्यांनी काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीतून बाहेर पडण्याचे संकेत दिले. द्रमुक नेत्या कनिमोझी यांनी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना पत्र लिहीत आपल्या पक्षाच्या खासदारांसाठी सभागृहात बसण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी, अशी मागणी केली. सध्या द्रमुक हा काँग्रेसचा मित्रपक्ष आणि इंडिया आघाडीचा घटक पक्ष म्हणून लोकसभेत विरोधी पक्षांच्या बाजूला काँग्रेससोबतच बसतो. कनिमोझी





यांच्या अशा पत्रामुळे द्रमुक आता विरोधी आघाडीतून बाहेर पडल्याचे दिसते आहे. द्रमुकने आतापर्यंत लोकसभेत सरकारविरोधी सर्वच मुद्यांवर काँग्रेसला सहकार्य करण्याची भूमिका घेतली होती. द्रमुकचे लोकसभेत २२ तर राज्यसभेत ८ खासदार आहेत. यावरून द्रमुकचे ३० खासदार इंडिया आघाडीतून बाहेर पडले तर इंडिया आघाडीची काय स्थिती होईल, याची कल्पना करता येते. लोकसभेत महिला आरक्षणासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयक फेटाळले गेले. त्यात एकसंध इंडिया आघाडीचा मोठा सहभाग होता. त्यामुळे तामिळनाडूत सरकार स्थापन करण्यासाठी टीव्हीके पक्षाला पाठिंबा देत आपण मोठी चूक केली, याचा अनुभव लवकरच काँग्रेसला आल्याशिवाय राहणार नाही. त्यावेळी काँग्रेसची स्थिती गाढवही गेले आणि ब्रह्मचर्यही गेले, अशी होणार आहे. टीव्हीकेसोबत सत्तेत राहता येणार नाही आणि द्रमुकसारखा जुना आणि विश्वासू मित्र पक्ष गमावला, अशी काँग्रेसची स्थिती होणार आहे.

भाजपा आपला वैचारिक विरोधक असल्याचा दावा राज्याचे नवनियुक्त मुख्यमंत्री विजय सध्या करत असले, तरी त्यांना आपली भाजपा विरोधांची भूमिका फार काळ रेटून नेता येणार नाही. राज्यातील आपले सरकार चालवण्यासाठी त्यांना केंद्रातील मोदी सरकारचे सहकार्य आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या सहकार्याशिवाय विजय यांना राज्यातील आपले सरकार दीर्घकाळ चालवता येणार नाही, ही दगडावरची रेष आहे. राजकीय शहाणपणा दाखवत टीव्हीकेने केंद्रातील भाजपाच्या सरकारशी जुळवून घेण्याची भूमिका घेतली तर त्या सरकारला पाठिंबा दिलेल्या वा सरकारमध्ये असलेल्या काँग्रेस पक्षाची अडचण झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे टीव्हीकेच्या सरकारला घाईगर्दीत पाठिंबा देत आपल्या हाताने आपल्या पायावर धोंडा पाडून घेतल्याचा अनुभव काँग्रेसला आल्याशिवाय राहणार नाही. पाच राज्यातील विधानसभा निवडणूक निकालाचा आणखी एक अन्वयार्थ म्हणजे या निकालाने देशातील राष्ट्रीय पातळीवरील दोन प्रमुख राजकीय पक्ष म्हणजे भाजपा आणि काँग्रेस हे मजबूत झाले आहेत. मात्र भाजपाची मजबुती आणि या निकालाने काँग्रेसला मिळालेली थोडीबहुत ताकद यांची बरोबरी होऊ शकत नाही. या निवडणूक निकालाचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे देशातील प्रादेशिक पक्षांची घसरण सुरू झाली आहे. बिहारमध्ये राजदचा पराभव झाला. ओडिशात प्रदीर्घ काळ सत्तेत असलेल्या बिजू जनता दलालाही पराभवाचे तोंड पाहावे लागले. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला राज्यातील मतदारांनी यावेळी चांगलाच धडा शिकवला. तामिळनाडूत स्टॅलिन यांच्या नेतृत्वातील द्रमुकला सत्ताच्युत व्हावे लागले. बिहारमध्ये आतापर्यंत जदयु या प्रादेशिक पक्षाचाचा मुख्यमंत्री होता; आता भाजपाचा झाला आहे. आप हा प्रादेशिक पक्ष नाही तर राष्ट्रीय पक्ष आहे, पण त्या पक्षाचाही दिल्ली विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव झाला. पंजाबमधील त्या पक्षाचे सरकार शेवटच्या घटका मोजत आहे. पुढील वर्षी म्हणजे २०२७ मध्ये उत्तरप्रदेशात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत समाजवादी पक्षालाही आपले चंबुगबाळे गुंडाळावे लागेल, यात शंका नाही.

आपल्या देशातील राजकारण आतापर्यंत बहुतांशपणे प्रादेशिक पक्षांवर अवलंबून होते. अनेक वेळा प्रादेशिक पक्ष प्रादेशिक अस्मितांना हवा देत राष्ट्रीय पातळीवरील पक्षांना पण आपल्या तालावर नाचवण्याचा प्रयत्न करीत होते. आता मात्र ते प्रादेशिक पक्षाच्या कचाट्यातून मुक्त होत असल्याचे आणि ते राष्ट्रीय पक्षांकडे जात असल्याचे या निकालांवरून दिसून आले आहे. मतदारांनी देशातील राजकारण प्रादेशिक पक्षांच्या तावडीतून सोडवत राष्ट्रीय पक्षांकडे सोपुवण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो एक चांगला संकेत म्हटला पाहिजे. हा संकेत देशाच्या राजकारणावर दीर्घकालीन आणि दूरगामी परिणाम करणारा म्हणावा लागेल.

९८८१७१७८१७

### होर्मुझ संकटामुळे महागाई वाढण्याची शक्यता

अमेरिका आणि इस्रायलने इराणविरुद्ध लष्करी कारवाई सुरू केल्यामुळे इराणने होर्मुझची सामुद्रधुनी जवळजवळ पूर्णपणे बंद केली आहे व यामुळे जागतिक पुरवठा साखळीवर गंभीर परिणाम झाला असल्याचे दिसून येते. या परिस्थितीतही इराणने स्पष्ट केले आहे की, अमेरिका आणि इस्रायल संबंधित जहाजे वगळता इतर जहाजांसाठी हा मार्ग खुला ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहेत, परंतु अतिशय तणावपूर्ण वातावरणामुळे सध्या वाहतूक ठप्प आहे, म्हणजेच जागतिक ऊर्जा व्यापार ठप्प झाला आहे. जगातील सुमारे २० ते २५ टक्के तेलाचा पुरवठा (आयात-निर्यात) याच मार्गातून होतो; सध्याच्या या संघर्षमय परिस्थितीत हा मार्ग बंद झाल्याने तेलाच्या किमतीत मोठी वाढ होण्याची संभावना नाकारणे योग्य होणार नाही. युद्ध संपविण्याच्या दृष्टीने आणि होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याबाबतच्या चर्चा दोन्हीही देशांमध्ये होत असल्या, तरी यांत अद्याप तरी काही ठोस निर्णय समोर आलेले नाही. अशा परिस्थितीत आखाती देशांमध्ये अडकलेले तेल बाहेर काढण्यासाठी युएईने त्याची यंत्रणा कामाला लावून तेलवाहू जहाजांच्या निर्यातीसाठी गनिमी काव्याचा अवलंब केला होता. इराणने घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे इराक, कुवेत आणि कतारसारख्या उत्पादकांनाही त्यांची तेल विक्री थांबवली आहे. सौदी अरेबिया सध्या केवळ लाल समुद्राच्या मार्गाने तेल निर्यात करत आहे. या मुळे जागतिक इंधन बाजारात बरीच उलथापालथ होत असून जागतिक अर्थव्यवस्थेलाही धोका निर्माण झाला आहे.

**संजय श्रौती** /९८६०४५१८४०

### निसर्गाचा समतोल राखा

विकास प्रकल्पासंदर्भात आपले भविष्य घडवणे म्हणजे काय? (तरुण भारत, १३ मे) अभ्यासपूर्ण, चिंतनशील अग्रलेख वाचला. मनापासून आवडला. अग्रलेखातून निसर्गाबद्दल व्यक्त केलेले विचार काळजाला भिडले. खरोखरंच, पुढचे संभाव्य अनर्थ न ओळखल्यास किंवा जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष झाल्यास त्याची किंमत आपणा सर्वांना मोजावी लागेल. त्याकरिता विकासाच्या नावाखाली जंगल-दऱ्या-डोंगर फोडून किंवा मोठमोठ्या झाडांची कत्तल करून काही साध्य होणार नाही. ज्ञान-विज्ञान, पर्यावरणपूरक गोष्टींचा सातत्यपूर्ण अभ्यास करून हवा, पाणी, झाडे, वृक्ष, नदी-नाले यांचं संवर्धन योग्यरीत्या करून निसर्गाचा समतोल राखला पाहिजे तरच अग्रलेखात म्हटल्याप्रमाणे निसर्ग आणि माणूस यांच्यातील नाते सहजीवनाचे असायला हवे, सार्थक झाल्यासारखे होईल.

**डॉ. राहुल भोसले**/पुणे

### चला, सेंद्रिय शेतीकडे वळूया

पंतप्रधानांनी देशाला परकीय चलन वापराबाबत काटकसरीचे आवाहन केले आहे. 'जगाचा पोशिंदा' म्हणून ओळखला जाणारा शेतकरी नकळतपणे रासायनिक शेतीमुळे अन्नसाखळीत निर्माण होणाऱ्या विषाचा भागीदार बनत आहे. या पृष्ठभूमीवर पुन्हा सेंद्रिय शेतीकडे वळण्याची मोठी संधी आपल्या समोर आहे. विषमुक्त शेतीचा स्वीकार केल्यास अन्नसाखळी अधिक निरोगी होईल, पर्यावरणाचे रक्षण होईल आणि पुढील पिढ्यांचे आरोग्यही सुरक्षित राहील. सरकारनेही सेंद्रिय शेतीसाठी येणाऱ्या व्यावहारिक अडचणींवर मात करण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे.

**अनिकेत शेटे**/पुणे

## वाचक पत्रे

### पर्यायी साधनांचा वापर

देशाच्या आर्थिक स्थितीवर नियंत्रण आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना पेट्रोल, डिझेल, गॅस व इतर इंधनांचा वापर मर्यादित ठेवण्याचे तसेच काटकसरीचे आवाहन केले आहे. त्याच पृष्ठभूमीवर ठाणे येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी नगरसेवकांसमवेत घोड्यावर स्वार होत तसेच बैलगाड्यांसह ठाणे महापालिकेत अनोख्या आंदोलनाद्वारे प्रवेश केल्याची घटना वाचनात आली. हे आंदोलन अत्यंत वेगळे, विनोदी आणि विचार करायला लावणारे वाटले. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रज व्यापारासाठी आले आणि पुढे राज्यकर्ते बनले. त्या काळात रस्ते, वाहतूक आणि इंधनाच्या मर्यादित सुविधा असल्याने घोडे, बैलगाड्या यांसारख्या पारंपरिक साधनांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात होता.

त्या परिस्थितीतही त्यांनी प्रशासन चालवत अनेक सुविधा आणि योजना निर्माण केल्या. आजच्या या आंदोलनामुळे जणू इतिहासाची पुनरावृत्ती होत असल्याचे चित्र समोर आले आहे. जर देशाच्या आर्थिक बचतीसाठी इंधन वापरावर नियंत्रण आवश्यक असेल, तर केवळ सामान्य जनतेनेच नव्हे तर केंद्र व राज्य सरकारमधील मंत्री, लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीही पुढाकार घेणे गरजेचे आहे. आवश्यकतेनुसार पर्यायी साधनांचा वापर करण्यात काहीच गैर नाही.

**सुनील झळके**/भिवंडी, जि. ठाणे

### पर्यावरण रक्षक विकास हाच भविष्य घडविणारा मैलाचा दगड

१३ मे च्या अंकातील अग्रलेख भविष्य घडवणे म्हणजे काय? वाचण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाच्या दृष्टिकोनानुसार विकास प्रकल्पांना समाजातून विरोध करणे जितके अयोग्य तितकेच विकास प्रकल्पाच्या योजना राबविण्यासाठी निरंतर होत असलेला मोठ्या प्रमाणावर कॉंक्रिटीकरण, गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यासाठी होणारी अतोनात वृक्षतोड, कारखान्यांकडून नद्यांना दूषित करण्याचे वाढते प्रमाण, सात-आठ पदरी रस्ते व औद्योगिक वसाहती यामुळे शेत जमिनीचा निरंतर होत असलेला संकोच इत्यादी चालू असलेला पर्यावरणाचा ऱ्हास विकासाच्या योजना राबविणाऱ्या केंद्र व राज्य सरकारांनी व समस्त मानव समाजाने अग्रलेखात सांगितलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करून आपला मंगलमय भविष्यकाळ सुनिश्चित करणे आवश्यक आहे. अन्यथा भावी पिढ्यांना नैसर्गिक स्रोतांचा उपयुक्त असा साठा; पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे हस्तांतरित करण्यासाठी आपण निश्चितच असमर्थ ठरू.

**ॲड. प्रकाश देशपांडे** /७०५८९७५३७६

### मोदींच्या कार्यक्षमतेबद्दल शंका का?

वर्षपूर्तीच्या आवाहनाला निर्णय म्हणून समजणारे महाभाग किती कार्यक्षम आहेत, हेच आता मोदींनी इंधन व सोन्याच्या बाबतीत केलेल्या विधानावरून समजून गेले. ज्या जनतेने सातत्याने मोदींना पाठिंबा दिला आहे तो अकार्यक्षम म्हणून दिला का? याचा विचार राहुल गांधी, शरद पवार, रोहित पवार, राज ठाकरे आणि त्यांच्या सवंगड्यांनी करणे अगत्याचे ठरेल. इराण-इस्रायल युद्धाच्या दरम्यान इंधनाचे दर पेट्रोल ५ ते ६० टक्के आणि डिझेलचे दर ८ ते ६५ टक्के वेगवेगळ्या देशांमध्ये वाढले गेले; पण भारतात किती वाढले? याचा अभ्यास का केला जात नाही? भूतान ते म्यानमार अशा जवळजवळ १३ राष्ट्रांमध्ये हे दर वाढले आहेत. मधु दंडवतेंनी अर्थमंत्री असताना इंधनाच्या बाबतीत काही बंधने पाळण्याचे आवाहन केलेच होते. जून १९६७ च्या काळात इंदिरा गांधी यांनीही सोने न खरेदी करण्याबाबत आवाहन केले होते. या सर्वांना देशहितच सांभाळायचे होते; किंबहुना आहे. म्हणूनच आवाहन केले जाते, निर्णय लादले जात नाहीत. मोदीजी देशहितासाठी आवाहन करीत आहेत; परंतु सत्तेसाठी हपापलेल्यांना केवळ मोदींना पाण्यातच पाहायचे आहे. परंतु विरोधकांनी लक्षात असू द्यावे, 'मोदी है तो मुमकिन है.' २०२९ पूर्वीच लोकसभेत मोदी बहुमत स्पष्ट करतील, यात शंका नाही. मोदीच भारताला महासत्ता बनविण्यासाठी कार्यक्षम आहेत.

**अमोल करकरे**/खेड-रत्नागिरी, ९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ई-मेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

# ४ तालुक्यातील ४३ गावातून जाणार शक्तीपीठ महामार्ग

## जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांची माहिती

## बोगस भूसंपादन झाल्यास कठोर कारवाईचा इशारा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

राज्य सरकारचा नियोजित शक्तीपीठ महामार्ग जिल्ह्यातील बार्शी, माढा, पंढरपूर, माळशिरस या तालुक्यातील ४३ गावातून आणि १२९ किलोमीटर जाणार आहे. अधिक मोबदल्याच्या हव्यासापोटी काहीजणांनी फळ झाडांची लागवड केली आहे. या ४३ गावात बिगर शेती (एनए) ची प्रकरणे संशयाच्या भोवऱ्यात आहेत. या प्रकारात काही रॅकेट कार्यरत आहेत. या सर्व प्रकाराची चौकशी करण्यासाठी उपजिल्हाधिकारी सुशांत बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली आहे. समितीला पंधरा दिवसात अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर कठोर कारवाई करणार असल्याचा इशारा जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी बुधवारी (दि. १३) माध्यमांशी बोलताना दिला.

या प्रकरणात ज्या अधिकाऱ्याने बिगर शेतीसाठी परवानगी दिली आहे; त्याच्यावर फौजदारी कारवाई करणार आहेत. महामार्ग आपल्या जागेतून जातो, त्यामुळे अधिकचा मोबदला मिळण्याच्या हव्यासापोटी काहींनी मोठ्या प्रमाणात फळझाडांची लागवड केल्याचे समजले आहे. काही शेतकऱ्यांनी जिरायती जमिनी बागायती दाखविण्यासाठी पाईपलाईन टाकली आहे. हा प्रकार गंभीर असून, यात काही रॅकेट कार्यरत असल्याचा संशय जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. यासाठी ड्रोनद्वारे सर्व्हे पूर्वीच केला आहे आणि सॅटेलाईटवरून पाहणीनंतर त्या त्या तारखेला त्या विभागाची स्थिती समोर येणार आहे. सध्या काही ठिकाणी बोगसगिरी समोर येत असल्यानेच या चौकशीसाठी एक समिती स्थापन केली आहे. आता नव्याने केलेले चित्रीकरण संग्रहित करून ठेवले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी जास्त मोबदल्याच्या आमिषाला बळी पडू नये असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

### पुणे व सोलापूर जिल्ह्यातील नर्सरीची चौकशी

बोगस वृक्ष लागवड करून अधिकचा मोबदला लाटण्यासाठी कोणी कोणी कोणत्या नर्सरीमधून फळझाडे घेतली याचा शोध घेण्यासाठी पुणे व सोलापूर जिल्ह्यातील नर्सरीची चौकशी करण्यात येत आहे. त्याबरोबरच आंध्र, कर्नाटक या राज्यातून सोलापूर जिल्ह्यात केव्हा केव्हा फळझाडांची आवक झाली. याचा डेटा मार्गावरील सीसीटीव्हीद्वारे संग्रहित करण्यात आल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. यामुळे शक्तीपीठ महामार्गाचा मावेजा वाटप प्रक्रिया पारदर्शकच पार पाडणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

# महापालिकेने ४८ कोटी रुपये देण्याचा समीक्षा कन्स्ट्रक्शनचा दावा फेटाळला



## लवाद न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

शहरातील कचरा संकलनासाठी दिलेला घंटागाडी कर्मचाऱ्यांचा मक्ता महापालिका प्रशासनाने रद्द केल्यानंतर 'समीक्षा कन्स्ट्रक्शन' या मक्तेदाराने न्यायालयात धाव घेतली होती. या संदर्भात लवाद न्यायालयात दावा दाखल करतानाच महापालिका प्रशासनाने ४८ कोटी रुपये द्यावे अशी मागणी करणारा दावा समीक्षाने केला होता. त्यांचा हा दावा उच्च न्यायालयाने नेमलेल्या सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश तथा लवाद न्यायाधीश शब्बीरअहमद औटी यांनी फेटाळून लावला. उलट समीक्षा कन्स्ट्रक्शन खर्चासह महापालिकेला ४५ दिवसात १ कोटी रुपये द्यावे असा महत्वपूर्ण आदेश देखील दिला आहे.

शहरातील कचरा संकलनासाठी तत्कालीन आयुक्त चंद्रकांत गुडेवार यांनी घंटागाडीचा समीक्षा कन्स्ट्रक्शन यांना मक्ता दिला होता. मात्र अचानक कामबंद आंदोलनानंतर त्यांचा हा मक्ता रद्द करून महापालिका प्रशासनाने स्वतंत्र यंत्रणा राबविली होती. यानंतर महापालिका आणि समीक्षा यांच्यामध्ये संघर्ष वाढला होता हे प्रकरण शासनापर्यंतही गेले होते. बिंट्रेशन अप्लिकेशनमध्ये यापुर्वी उच्च न्यायालयात आरबिंट्रेशन पिटीशन (क्र. २९/२०१९) दाखल होते. समिक्षा कंन्सट्रक्शन कंपनीतर्फे रविंद्र राठोड विरुद्ध सोलापूर महापालिका या पिटीशनमध्ये याचिकाकर्त्यांनी सोलापूर महापालिकेने बेकायदेशीर पध्दतीने करार संपुष्टात आणला असून याचिकाकर्त्याची डिसेंबर २०१३ ते डिसेंबर २०१४ कलम ११ (६) आरबिंट्रेशन ॲंड कॉन्सिलेशन ॲक्ट १९६६ प्रमाणे हा वाद संपविण्यासाठी मध्यस्त नियुक्त करावा, देय रक्कमेची पुर्तता करावी तसेच सोलापूर महापालिकेने बेकायदेशीरपणे दि. २७ ऑगस्ट २०१५ रोजी सेवा संपुष्टात आणली. हा आदेश रद्द करावा यासाठी आर्बिट्रेशन पिटीशन दाखल केलेली होती. या पिटीशनमध्ये सेवानिवृत्त माजी जिल्हा न्यायाधिश शब्बीर अहमद औटी यांची लवाद न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्याबाबत उच्च न्यायालयाने दि. २ एप्रिल २०२४ रोजी आदेश देवून हे पिटीशन वर्ग केली होती. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने सोलापूर महापालिकेत लवाद न्यायालय नेमण्यात आले. या लवाद न्यायालयात समिक्षा कंन्स्ट्रक्शन कंपनीतर्फे रविंद्र राठोड विरूध्द सोलापूर महापालिका हे अप्लिकेशनही दाखल झाले. यामध्ये याचिकाकर्त्याने दि. १७ सप्टेंबर २०१२ रोजीचे करारपत्रानुसार केलेल्या कामाचे थकीत देयक व्याजासह देण्याबाबत निवाडा घोषित करण्यात यावा. करारातील अटी व शर्तीनुसार ज्या रक्कमा मिळण्यास पात्र आहे, त्या रक्कमा मुळ किंमतीवर आर. बी. आय. इंडेक्सप्रमाणे वेळोवेळी होणा-या दरवाढीनुसार अर्जदार यांना अदा करण्यात याव्यात. हिशोबाप्रमाणे दि. २१ सप्टेंबर २०१५ रोजीपर्यंत ही रक्कम ४८ कोटी ४७ लाख २ हजार १९८ रुपये इतके मिळण्यास पात्र आहे. तसेच त्या रक्कमेवर पुढे या वेळेपासून आर. बी. आय. इंडेक्सप्रमाणे व्याज मिळण्यास पात्र आहे अशी मागणी केली होती. मात्र हा दावा खर्चासहित फेटाळण्यात आला. तर महापालिकेचा प्रतिदावा खर्चासह मंजूर करण्यात आला. तसेच निवाड्याच्या तारखेपासून रक्कम वसूल होईपर्यंत त्यावर ६ टक्के प्रतिवर्षी दराने भविष्यातील व्याजासह प्रतिवादीला नुकसानभरपाई म्हणून निवाडयापासून ४५ दिवसांच्या आत १ कोटी द्यावे असे आदेशीत केले आहे.

### महापालिकेची जागा भाड्याची मागणी फेटाळली

दावाकर्ता आणि प्रतिवादी यानी महाराष्ट्र मुद्रांक कायद्याच्या कलम १२ च्या तरतूदीनुसार दाव्यावर ८७ कोटी ८ लाख ४९ हजार ३९३ आणि प्रति दाव्यावर ५ कोटी रुपयांवर संबंधित मुद्रांक शुल्क भरावे असे आदेश दिले आहेत. तसेच प्रतिवादीने ५०÷१० फुटाच्या तात्पुरत्या जागेच तावा महापालिकेने घ्यावा आणि गरज भासल्यास ती जागा पाडण्याचे स्वातंत्र्य त्यांना असेल असे नमूद केले. मात्र महापालिकेची दरमहा ५० हजार रुपये जागा भाडयाची मागणी फेटाळण्यात येत असल्याचे लवाद न्यायाधीश शब्बीरअहमद औटी यांनी नमूद केले आहे.

# मोहोळमध्ये उष्माघाताने शेतकरी महिलेचा मृत्यू

## तालुक्यात दुसरा बळी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १३ मे-**

पापरी( ता.मोहोळ ) येथे उष्माघातामुळे महिला शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि.१०) दुपारी घडली. शोभा बाबुराव डोंगरे (वय ३५) असे मृत महिलेचे नाव असून, गेल्या पंधरा दिवसांतील उष्माघातामुळे झालेला हा तालुक्यातील दुसरा मृत्यू आहे.

शोभा डोंगरे या रविवारी सकाळपासून शेतात गुलछडीची फुले तोडण्याचे काम करत होत्या. दुपारी दीडच्या सुमारास त्यांचे पती बाबुराव डोंगरे शेतात आले. त्यांनी सोबत पिण्याचे पाणी आणले होते. कडक उन्हामुळे तहान लागल्याने शोभा यांनी पाणी पिले. मात्र काही वेळातच त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यांनी प्रकृती बिघडत असल्याची माहिती पतीला दिली. यानंतर बाबुराव डोंगरे यांनी त्यांना तातडीने पेनूर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी सुसज्ज रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला. दरम्यान, पुढील रुग्णालयात नेल्यानंतर तपासणीदरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. यापूर्वी १६ एप्रिल रोजी खवणी (ता. मोहोळ) येथील शेतकरी रमाकांत भोसले यांचाही उष्माघातामुळे मृत्यू झाला होता.

> मी भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करतो. दुपारी मी घरी आल्यावर शेतात गेलो. त्यावेळी पत्नी शोभा ही फुले तोडत होती. तिने पिण्यास पाणी मागितले. पाणी पिल्यानंतर तिला थोड्या वेळात अस्वस्थ वाटू लागले. तिला रुग्णालयात उपचारासाठी नेले, मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.
>
> **- बाबूराव डोंगरे, मृत शोभाचे पती**

> अचानक अशा प्रकारे रुग्णाची प्रकृती खालावणे हा उष्माघाताचा स्ट्रोक असतो. प्रत्येकाने आपल्या प्रकृतीची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. कडक उन्हात काम करणे शक्यतो टाळावे.
>
> **- डॉ. अरुण पाथरूटकर, तालुका वैद्यकीय अधिकारी, मोहोळ**

## म्हैसूर-हजरत निजामुद्दीन दरम्यान २ विशेष गाड्या

**सोलापूर, दि. १३ मे-**

म्हैसूर आणि हजरत निजामुद्दीन (दिल्ली) दरम्यान सोलापूरमार्गे २ विशेष गाड्या चालवण्यात येतील. गाडी क्र. ०६२६१ ही विशेष गाडी २१ मे रोजी ४ वाजता म्हैसूरहून सुटेल आणि तिसऱ्या दिवशी ५:४५ वाजता हजरत निजामुद्दीन येथे पोहोचेल. ही गाडी सोलापूरला २१ मे रोजी रात्री ८:०५ वाजता येईल आणि रात्री ८:१५ वाजता प्रस्थान करेल. गाडी क्रमांक ०६२६२ ही विशेष गाडी २४ मे रोजी रात्री ९ वाजता हजरत निजामुद्दीनहून सुटेल आणि तिसऱ्या दिवशी रात्री ११:५५ वाजता म्हैसूर येथे पोहोचेल. सोलापूरला ही गाडी २६ मे रोजी सकाळी ७:२० वाजता पोहोचेल आणि सकाळी ०७:३० वाजता प्रस्थान होईल.


## Classifieds

**Vacancy**

Vacancy available for Sales Engineer / Marketing Executive. Swaraj Pneumatics mobile: 8380050483

**पाहिजेत**

**जुनी मील कंपाऊंड परिसरात बंगल्यात घरगुती काम करण्यासाठी २५ ते ३५ वयोगटातील महिला पाहिजे. संपर्कः ९४२३५९००३६/ ९४२०८८५६०७**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि ।। व सब डि ।। सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी महानगरपालिका हद्दीतील पेठ - लक्ष्मी पेठ यांसी स.नं. ७६०-अ, १, ८, १०, ११, १५ यापैकी झोपडी तथा प्लॉट नं. १५० यांसी एकूण क्षेत्र १०८९ चौ. फुट इतकी असून झोपडी मिळकतीची चतुःसिमा :- पुर्वेस - झोपडी/प्लॉट नं. १४९, पश्चिमेस - बांध, दक्षिणेस - रस्ता, उत्तरेस - खुली जागा येणेप्रमाणे ही झोपडी सोलापूर महानगरपालिका सोलापूर गलिच्छ वस्ती सुधारणा (ग.व.सु.) यांच्या अभिलेखाच्या भोगवट पत्रकास मिळकत क्र. २४७५६३ नुसार संतोष गोरोबा यमपुरे यांच्या नावाची नोंद असून संतोष गोरोबा यमपुरे यांचे दि. १७/०३/२०१२ रोजी निधन झालेले आहे.

मयत संतोष गोरोबा यमपुरे यांच्या मृत्यु पश्चात जवळचे व कायदेशीर वारसदार आमचे अशिल नं. १) सुरेश राजू यमपुरे, २) कुमार राजू यमपुरे आणि ३) परशुराम राजू यमपुरे हे होते व आहेत. त्यानुसार मयत संतोष गोरोबा यमपुरे यांच्या नावाची नोंद कमी करुन भोगवटदार म्हणून आमचे अशिलाच्या नावाची नोंद होऊन मिळणेकामी म्हणून रितसर अर्ज दाखल करणार आहेत. तरी सदर झोपडीबाबत कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, दान, लिज, टाच, गहाण, जप्ती, बोजा, इसारापावती साठेखत, खरेदीखत, कब्जापावती, पोटगी, करार, मदार, इत्यादी प्रकारचे हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यानिशी लेखीस्वरुपात खालील पत्यावर हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही, कसलीही हरकत/तक्रार न आल्यास सदरहू झोपडी हि निर्वेध, निजोखीम आहे असे समजून दप्तरी आमचे अशिलाच्या नावाची नोंद करतील. कोणाचीही कसलीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहिर नोटीस देत आहे, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली दि. १३/०५/२०२६.

**सही/-**
**श्री. अश्विन एस. कोंगारी**
**ॲडव्होकेट बी.कॉम., एलएल.बी.**
**पत्ता- प्लॉट नं. २३, नवनाथ नगर, आकाशवाणी केंद्र रोड, सोलापूर मो.नं. ९८९०५०३२८१**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## विक्री अधिकारी यांचे कार्यालय, बार्शी.

**श्री. भगवंत मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑप सोसायटी लि. बार्शी**

**पत्ता - ७३९/७/१७ पाटील प्लॉट निकिता हॉटेल शेजारी, कुर्डुवाडी रोड, बार्शी. जि. सोलापूर पिन - ४१३४११**

**संपर्क - ९०११६९२८५८ / ९८८१९२६२९६ / ९९०५३७५९५९**

**जा.क्र. कायदा विभाग/२९/२०२६-२७** — **दिनांक ०७/०५/२०२६**

### स्थावर मालमत्ता विक्रीसाठी विक्री सुचना

**(बहुराज्यीय सहकारी संस्था नियम २००२ मधील नियम ३७ (११) व या मधील इतर तरतुदी पहा)**

बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ व नियमामधील तरतुदीनुसार कलम ९७ व नियम २ (१०) नुसार शक्ती प्रदानित विक्री अधिकाऱ्याने जप्त केलेली स्थावर मालमत्तेची विक्रीची जाहिर सूचना याद्वारे सामान्यतः जनतेला आणि विशेषतः कर्जदार / जामीनदारांना नोटीस देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सदर कायद्याअंतर्गत कलम ९७ व नियम २ (१०) नुसार शक्ती प्रदानित विक्री अधिकारी यांनी कर्जदाराकडून / जामीनदारांकडून थकबाकी रक्कमेच्या वसुलीसाठी थकबाकीदारांच्या स्वतःच्या नावाने असलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यात आला आहे. मालमत्ता जशा व जेथे आहेत तशा आणि ज्या परिस्थितीत आहेत तशा आणि ज्ञात व अज्ञात बोजासह त्याची जाहिर लिलावाने विक्री करण्यात येत आहे. खाली नमुद केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव सदर अधिनियम व त्या खालील नियमामधील अटी व शर्ती व नियमातील तरतुदीनुसार करण्यात येईल. खाली स्थावर मालमत्तेचा तपशील, लिलाव विक्रीची तारीख, वेळ व ठिकाण देण्यात येत आहे. लिलाव खालील अटी व शर्तीवर करण्यात येईल.

| कर्जदार/ जामीनदार / तारण मिळकतदार यांचे नाव पत्ता | दिनांक २८/०५/२०२६ अखेर येणे बाकी | मिळकत क्रमांक | तारण स्थावर मालमतेचा तपशील | राखीव किंमत | लिलावाचे ठिकाण, लिलाव तारीख, लिलाव वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **श्री. विशाल रमेश मोरे,** मौजे बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | २५,७२,५३५/- | गट नं. ९८३/२/अ/पै | बिनशेती प्लॉट क्षेत्र ००.०५ हे. आर. | **रु. ३०,००,०००** | दिनांक :- १०/०५/२०२६ वेळ :- सकाळी ११.०० ठिकाण : मुख्य कार्यालय ७३९/७/१७, पाटली प्लॉट, निकिता हॉटेल शेजारी, कुर्डुवाडी रोड, बार्शी |
| **श्री. वर्धमान ज्ञानेश्वर विभुते,** मौजे - बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | रुपये २५,७२,५३५/- | नगर भूमापन क्र. ३०९/ब | निरंक | निरंक | |
| **सौ. श्वेता विशाल मोरे,** बार्शी, जि. सोलापूर | रुपये २५,७२,५३५/- | गट नं. १४०८/१/६६ | निरंक | निरंक | |

सहदुय्यम निबंधक वर्ग - २ बार्शी
यांच्या मुल्यांकन प्रमाणपत्राप्रमाणे जमिनीचा शासनदराप्रमाणे बाजार भाव दर **रु. ६,८०,०००/-**

**खाजगी /संस्था नियुक्त मूल्यांकनकार**
श्री. साहिल शरद खडके (B.Tech (Civil) यांनी या मालमत्तेत
बाजारभावाप्रमाणे दिलेली आजची किंमत बाजारभाव दर **रु. १०,२०,०००/-**

बहुराज्यीय सहकारी अधिनियम २००२ व नियम ९७ नुसार विक्रीसाठी वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना गहाणखत करणार / कर्जदारांना लिलावापूर्वी पुढील व्याजासह एकूण थकबाकी भरण्याची शेवटची संधी दिली जात आहे. तसे न झाल्यास वरील वेळापत्रकानुसार जप्त केलेली मालमत्ता विकली जाईल.

**सुचना** : सर्वांना असे ही सुचित करण्यात येते की, धनको उपरोक्त संस्थेचे विक्री अधिकारी यांनी कर्जदार व जामीनदार यांना (ज्यांच्या मालमत्ता लिलावाने विक्री करावयाच्या आहेत त्यांना) नोंदणीकृत पोष्टाने नोटीसा पाठविल्या आहेत. ज्यांना नोटीस प्राप्त झाली. त्यांनी इतर कर्जदार व जामीनदार यांना त्याची कल्पना द्यावी. त्याच प्रमाणे व्यापक प्रसिद्धी म्हणून ही नोटीस नामांकीत दैनिकामध्ये देखील प्रकाशित करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:**

१) लिलावात भाग घेणाऱ्यांना / लिलाव बोली बोलणाऱ्यांना लिलाव सुरु होण्यापूर्वी राखीव किंमतीच्या १०% अनामत रक्कम भरावी लागेल.
२) स्थावर मालमतेच्या राखीव किंमती पेक्षा कमी रक्कमेत विक्री केली जाणार नाही.
३) ज्या व्यक्तिच्या नावे लिलाव पूर्ण होईल जो व्यक्ती सर्वापेक्षा जास्त बोली बोलेल त्या व्यक्तीस लिलाव बोलीच्या २५% रक्कम लिलावाच्या नंतर त्याच दिवशी ताबडतोब भरावी लागेल किंवा बहुराज्यीय सहकारी संस्था कायदा २००२ मधील तरतुदीनुसार कालावधी दिला जाईल, लिलाव बोलीची बाकी राहिलेली ७५% रक्कम व मुद्रांक शुल्काची रक्कम विक्री कायम केलेल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत भरावी लागेल. न भरल्यास खरेदीदाराने भरणा केलेली २५% रक्कम व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच अशा परिस्थितीत खरेदीदाराचा संबंधित मालमतेवर कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.
४) लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना स्थावर मालमत्तेची पाहणी संस्थेच्या कामकाजाच्या दिवशी आठवड्यातून दोन दिवस मंगळवार व बुधवार या दिवशी दुपारी ३ ते ४ च्या वेळेत करता येईल, त्याकरिता आमच्या शाखेचे शाखाधिकारी श्री. सूरज उत्तरेश्वर कुंभारे, मो.नं. ९८८१९२६२९६, ८८०५३७५९५९ यांच्याशी संपर्क साधावा.
५) कोणतीही पूर्व सूचना न देता, लिलाव, विक्री स्थगित व रद्द करण्याचे अधिकार, विक्री अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.
६) वरील मालमत्तेवरील शेतसारा, नगर परिषद कर, लोकल कर, लाईट बिल व इतर कराची जबाबदारी खरेदीदारावर राहील.
७) स्थावर मालमतेची विक्री '**जेथे आहे, जशी आहे, जशा परिस्थितीत आहे तशी**' या तत्वावर करण्यात येणार आहे. जर या मालमतेवर काही बोजा असेल तर त्यासह ही विक्री करण्यात येईल.
८) यशस्वी बोलीदाराच्या नावे विक्रीचा व्यवहार कर्ज देणाऱ्या संस्थेच्या संचालक मंडळाच्या अनुमतीनंतर पूर्ण केला जाईल.
९) लिलाव प्रसंगी मोबाईल वापरण्यास प्रतिबंध राहील, तसेच बयाणा रक्कम भरलेल्या भागधारकांनाच प्रवेश देण्यात येईल. नियमाचे उल्लंघन, आर्थिक क्षमता, लिलावाच्या वेळी गोंधळ घालणे, सार्वजनिक शांततेचा भंग करणे इ. कारणास्तव कोणत्याहीक्षणी लिलाव तहकूब करण्याचा अधिकार **विक्री अधिकारी** यांनी राखून ठेवला आहे.

**बहुराज्यीय सहकारी कायदा २००२ अंतर्गत वैधानिक सुचना :-**

कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे अशी ही संधी देण्यात येते की, त्यांनी उपरोक्त संस्थेची एकूण थकबाकी लिलावाची बोली बोलण्यापूर्वी अदा करावी. त्यात ते अयशस्वी झाल्यास तसेच थकबाकीच्या वसुलीसाठी विक्रीच्या रक्कमेतून वसुल न झाल्यास शिल्लक रक्कम जर असेल तर कर्जदार / जामीनदार यांच्याकडून शिल्लक पूर्ण येणे बाकी व पुढील व्याज आणि खर्चासह वसुल केली जाईल, याची नोंद घ्यावी.

**टिपः-** अधिक माहितीसाठी विक्री अधिकारी **श्री. नवनाथ गुणवंत भोसले** मो. नं. ९०११६९२८५८ / ९८८१९२६२९६
**पत्ता** : मुख्य कार्यालय, ७३९/७/१७, पाटील प्लॉट, निकिता हॉटेल शेजारी, कुर्ईवाडी रोड, बार्शी. जि. सोलापूर. पिन - ४१३४११ यांच्याशी संपर्क करावा.

**दिनांक : ०७/०५/२०२६**
**ठिकाण :- बार्शी**

शिक्का

**सही/-**
**विक्री अधिकारी**
**(कलम - ९७ मधील तरतूदी प्रमाणे नियुक्त)**
**श्री. भगवंत मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि, बार्शी**

## डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.

**DNS BANK (मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक)**

अर्थाला विश्वास मिळे अन् विश्वासाला अर्थ मिळे!

**नोंदणी क्र. : टी.एन.ए./बी.एन.के./१२७, दिनांक ०४ जुलै १९७०**
**नोंदणी क्र. : एम.एस.सी.एस./सी.आर./१२७५/२०१७, दिनांक २८ जुलै २०१७**
**भारतीय रिझर्व्ह बँक लायसन्स-एसीडी.एमएच.-२२७(पी) दिनांक ०९.१०.१९८०**
नोंदणीकृत कार्यालय - मधुकुंज, प्लॉट क्र.पी-५२, एम.आय.डी.सी.फेज-२, सोनारपाडा, कल्याण शिळ रोड, डोंबिवली (पूर्व)-४२१२०४

### ५६व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

बँकेची ५६वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ३१ मे २०२६ रोजी सकाळी ०९.३० वा. पाटीदार भवन, कल्याण शिळ रोड, व्यंकटेश पेट्रोल पंपाच्या मागे, डोंबिवली (पूर्व) येथे खालील विषयांवर विचार व निर्णय घेण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. तरी कृपया सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील कामकाजाचे विषय -**

१. दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला वार्षिक अहवाल, लेखापरीक्षित ताळेबंद व नफा-तोटा खाते, नफ्याचे वाटप यास मंजुरी देणे तसेच वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.
२. आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीचा दोष-दुरुस्ती /अनुपालन (Compliance) अहवाल सादर करण्यात आल्याची नोंद घेणे.
३. आर्थिक वर्ष २०२६-२७ करीताच्या बँकेच्या अंदाजपत्रकास (Budget) मंजूरी देणे.
४. बँकेने सुचविलेल्या पोटनियम/उपविधी (Bye-laws) दुरुस्तीस मंजुरी देणे.
५. आर्थिक वर्ष २०२७-२८ साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचे सेवाशुल्क ठरविण्यासाठीचे वार्षिक सर्वसाधारण सभेचे अधिकार संचालक मंडळास देणे.
६. दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर संचालक व त्यांच्या नातेवाईकांना (केवळ त्यांच्या स्वत:च्या मुदत ठेवींच्या तारणावर) दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
७. संचालक मंडळाने सादर केलेली बँकेची आर्थिक वर्ष २०२६-२७ ची वार्षिक योजना (Annual Operational Plan) सभेपुढे मंजुरीसाठी सादर करणे.
८. सभेस अनुपस्थित राहिलेल्या सर्व सभासदांची रजा मंजूर (condone) करणे.
९. मा. अध्यक्षांच्या परवानगीने इतर कोणतेही विषय

संचालक मंडळाच्या आदेशानुसार,
**(वि. द. दीक्षित)**
**व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी**

दिनांक : १४ मे २०२६

**टीप :-**

१) गणसंख्ये अभावी सभा स्थगित झाल्यास, अशी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर म्हणजे सकाळी १०.०० वा. घेण्यात येईल. अशा सभेसाठी गणसंख्यापूर्तीचे बंधन असणार नाही.
२) सभेचे संचालन सुरळीत होण्यासाठी, दिनांक ३१ मार्च २०२६ अखेरचा वार्षिक अहवाल अथवा बँकेची प्रगती यासंदर्भात काही प्रश्न असल्यास सभासदांनी २५ मे २०२६ पूर्वी व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी स्वरुपात विचारणा करावी, म्हणजे माहिती देणे शक्य होईल. तसेच या प्रश्नावर आवश्यकता वाटल्यास समर्पक चर्चा होईल. सदर लेखी विचारणा नजिकच्या शाखेत अथवा बँकेच्या केंद्रीय कार्यालयात सादर करण्यास हरकत नाही. दैनंदिन कामकाजाविषयक प्रश्न हे नोंदणीकृत कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन विचारता येतील.
३) आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या वार्षिक अहवालाची छापील प्रत दिनांक २० मे २०२६ पासून बँकेच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध असेल तसेच बँकेचे संकेतस्थळ https://dns.bank.in येथेही नोटीस दिल्याच्या तारखेपासून उपलब्ध असेल.

## बालाजी अमाईन्स लिमिटेड

**(CIN: L24132MH1988PLC049387)**

**नोंदणीकृत कार्यालय** : 'बालाजी टॉवर्स',
क्र. 9/1A/1, होटगी रोड, आसरा चौक, सोलापूर 413 224
**दूरध्वनीः** +912172451500, **फॅक्सः** +912172451521,
**ई-मेलः** cs@balajiamines.com
**वेबसाईटः** https://www.balajiamines.com

**३१ मार्च, २०२६ रोजी समाप्त झालेल्या तिमाही आणि वर्षाअखेरचे लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा स्वतंत्ररित्या आणि एकत्रितरित्या गोषवारा**

लेखा परीक्षण समितीच्या शिफारशींवर आधारित, बालाजी अमाईन्स लिमिटेड (कंपनी) च्या संचालक मंडळाने १३ मे, २०२६ रोजी झालेल्या सभेत ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाअखेरचे स्वतंत्र आणि एकत्रितरित्या आर्थिक निष्कर्ष मंजूर केले आहेत.

वर नमूद केलेले आर्थिक निकाल आणि त्यावरील प्रेस रीलिझ कंपनीच्या वेबसाइटवर https://balajiamines.com/QRC/Marathi2526.pdf उपलब्ध आहेत आणि खाली दिलेला क्विक रिस्पॉन्स कोड स्कॅन करून देखील पाहू शकता.

**स्थळ :- सोलापूर**
**दिनांक : १३ मे २०२६**

**बालाजी अमाईन्स लिमिटेड करिता**
**स्वाक्षरीत/-**
**डी. राम रेड्डी**
**व्यवस्थापकीय संचालक**




## महत्त्वाचे

### अव्वल ट्रॅप नेमबाज झोरावर आशियाई स्पर्धेतून बाहेर



**नवी दिल्ली** : आशियातील अव्वल आणि जागतिक क्रमवारीत सहाव्या क्रमांकावर असलेल्या ट्रॅप नेमबाज झोरावर सिंग संधू याला, या वर्षीच्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी प्रस्तावित असलेल्या भारतीय शॉटगन संघातून वगळण्यात आले आहे. हा अनुभवी नेमबाज देशातील सर्वोत्तम नेमबाजांपैकी एक असून, त्याने गेल्या वर्षी प्रतिष्ठित जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदकही पटकावले होते, असे असूनही त्याला संघात स्थान मिळाले नाही. जागतिक अजिंक्यपद स्पर्धा आणि विश्वचषक अंतिम फेरी अशा अत्यंत व्यस्त आंतरराष्ट्रीय वेळापत्रकामुळे आलेला थकवा असूनही, झोरावरला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा आणि देशांतर्गत निवड चाचण्यांमध्ये सहभागी होणे भाग पडले. या स्पर्धांमध्ये त्याला आपल्या सर्वोत्तम लयीत कामगिरी करणे जमले नाही आणि त्याचा फॉर्म काहीसा खालावला. राष्ट्रीय निवड चाचण्यांमधील त्या निराशाजनक गुणांमुळेच त्याला अखेरीस आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीच्या संघातून बाहेर राहावे लागले.

### हैदराबादच्या प्रशिक्षकांकडून गुजरातच्या गोलंदाजांची प्रशंसा

**अहमदाबाद** : सनरायझर्स हैदराबादचे मुख्य प्रशिक्षक डॅनियल व्हेटोरी यांनी गुजरात टायटन्सच्या गोलंदाजीची मुक्तकंठाने प्रशंसा केली. येथील एका सामन्यात 'प्रबळ' गुजरात टायटन्स संघाने आपल्या 'उत्कृष्ट' गोलंदाजीच्या जोरावर आम्हाला पूर्णपणे निष्प्रभ केले, असे व्हेटोरी यांनी मान्य केले. साई सुदर्शन (६१) आणि वॉशिंग्टन सुंदरच्या (५०) अर्धशतकांच्या जोरावर गुजरात संघाने ५ गड्यांच्या मोबदल्यात १६८ धावांपर्यंत मजल मारल्यानंतर, वेगवान गोलंदाजांची जोडी - मोहम्मद सिराज (१/११) आणि कागिसो रबाडा (३/२८) - यांनी पॉवरप्लेमध्येच प्रतिस्पर्ध्यांची दाणादाण उडवली. त्यानंतर जेसन होल्डर (३/२०) आणि प्रसिद्ध कृष्णानेही (२/२३) यात मोलाची भर घालत हैदराबादच्या संघाला अवघ्या ८६ धावांत गुंडाळले. गुजरात टायटन्सचे वेगवान गोलंदाज पूर्णपणे अप्रतिम होते, असेही तो म्हणाला.

### कर्णधार कमिन्सला दंड

**अहमदाबाद** : सनरायझर्स हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्सला, येथे झालेल्या आयपीएल सामन्यात गुजरात टायटन्सविरुद्धच्या लढतीत संथ गतीने षटके टाकल्याबद्दल दंड ठोठावण्यात आला आहे. कमिन्सला १२ लाख रुपयांचा दंड करण्यात आला आहे. मंगळवारी रात्री नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात, सनरायझर्स हैदराबादला गुजरात टायटनसकडून ८२ धावांनी दारुण पराभव पत्करावा लागला. गुजरातने उभारलेल्या ५ बाद १६८ धावांचा पाठलाग करताना, हैदराबादचा संघ केवळ १४.५ षटकांत अवघ्या ८६ धावांवर गारद झाला.

# पंजाब किंग्ज घसरण रोखण्याच्या प्रयत्नात



हार्दिक पांड्या



श्रेयस अय्यर

**आजचा सामना**
**पंजाब किंग्ज वि. मुंबई इंडियन्स**
**स्थळ** : हिमाचल प्रदेश क्रिकेट संघटना स्टेडियम, धर्मशाला
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

◆ **धर्मशाला, १३ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) निर्णायक टप्प्यात गुरुवारी येथे आधीच स्पर्धेबाहेर पडलेल्या मुंबई इंडियन्सविरुद्ध खेळताना पंजाब किंग्जला आपल्या गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणातील उणिवा भरून काढाव्या लागतील, तर त्यांना सातत्याने होत असलेली घसरण थांबविता येऊ शकेल.

स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात वर्चस्व गाजवल्यानंतर पंजाब किंग्जने सलग चार सामने गमावले आहेत व आता प्ले-ऑफच्या शर्यतीत त्यांची स्थिती अत्यंत नाजूक झाली आहे. अव्वल चार संघांमध्ये स्थान निश्चित करण्यासाठी त्यांना त्यांच्या उर्वरित सामन्यांपैकी किमान दोन सामने जिंकावे लागतील.

दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या पराभवानंतर कर्णधार श्रेयस अय्यरने नमूद केल्याप्रमाणे, सध्याच्या कठीण परिस्थितीत सापडण्यासाठी पंजाब किंग्ज केवळ स्वतःलाच दोष देऊ शकतात.

स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात फलंदाजीतील दमदार कामगिरीने गोलंदाजी विभागातील कमकुवतपणा झाकून टाकला होता; परंतु अलीकडच्या काळात खुद्द अय्यरच्याच कबुलीनुसार सरासरीपेक्षा अधिक धावसंख्या उभारूनही दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध तो विजय मिळविण्यासाठी पुरेसा ठरला नाही.

वेगवान गोलंदाजांना अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर अय्यर आणि त्याच्या सहकाऱ्यांनी सामन्यावर पूर्णपणे पकड मिळविली होती; परंतु शेवटच्या पाच षटकांमध्ये वेगवान गोलंदाजांना आपली गोलंदाजीची लांबी अचूक राखता आली नाही. अर्शदीप सिंगच्या नेतृत्वाखालील वेगवान गोलंदाजी आक्रमणाचा इकोनॉमी रेट १० संघांमध्ये सर्वात वाईट आहे.

आयपीएलच्या पहिल्या टप्प्यात झेव्हियर बार्टलेट व अर्शदीपने नवीन चेंडूने गोलंदाजी करताना एक स्थिर व प्रभावी जोडी म्हणून कामगिरी केली होती; परंतु आता लॉकी फर्ग्युसनच्या आगमनामुळे हे समीकरण विस्कळीत झाले आहे. फर्ग्युसन हा मधल्या आणि शेवटच्या षटकांमध्ये (डेथ ओव्हर्समध्ये) गोलंदाजी करण्यातील कौशल्यासाठी ओळखला जातो.

गत सामन्यात त्यांनी तीन डावखुरे वेगवान गोलंदाज खेळवण्याचा निर्णय घेतला होता व त्यासाठी बेन ड्वार्शियसचा संघात समावेश केला होता, परंतु तो गोलंदाज अत्यंत महागडा ठरला.

संघाचा मुख्य वेगवान गोलंदाज अर्शदीपने खेळलेल्या ११ सामन्यांपैकी बहुतांश सामन्यांमध्ये प्रति षटक १० पेक्षा अधिक धावा दिल्या आहेत.

डावाची सुरुवात करताना प्रियांश आर्याला योग्य साथ देण्यासाठी, प्रभसिमरन सिंगला पुन्हा एकदा फॉर्ममध्ये परतणे गरजेचे आहे.

या हंगामात मुंबई इंडियन्सने अत्यंत निराशाजनक कामगिरी केली असली, तरीही ते नक्कीच प्रतिस्पर्ध्यांच्या मोहिमेत खोडा घालण्याची क्षमता बाळगतात. दुखापतीमुळे गत दोन सामने न खेळलेला कर्णधार हार्दिक पांड्या, बुधवारी रात्री मैदानात उतरतो की नाही, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. सूर्यकुमार यादव आपल्या उर्वरित तीन आयपीएल सामन्यांचा पुरेपूर फायदा उठवण्याच्या प्रयत्नात असेल. रायन रिकेल्टन व रोहित शर्मा यांच्याकडूनही पॉवरप्लेमध्ये संघाला धडाकेबाज सुरुवात करून देण्याची अपेक्षा असेल. संघात स्थान निश्चित नसलेला ट्रेंट बोल्ट आणि जसप्रीत बुमराह या अनुभवी वेगवान गोलंदाजांची जोडी, गोलंदाजांना अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर आपल्या गोलंदाजीचा प्रभाव पाडण्यास सज्ज असेल. (वृत्तसंस्था)

### दुखापतग्रस्त रामकृष्णाच्या जागी कर्नाटकचा नोरोन्हा



**चेन्नई** : चेन्नई सुपर किंग्सने दुखापतग्रस्त अष्टपैलू खेळाडू रामकृष्ण घोष याच्या जागी कर्नाटकचा अष्टपैलू खेळाडू मॅकनील नोरोन्हा याची निवड केली आहे, असे आयपीएलच्या एका प्रसिद्धीपत्रकात बुधवारी नमूद करण्यात आले.३ मे रोजी मुंबई इंडियन्सविरुद्ध झालेल्या सामन्यादरम्यान घोषच्या उजव्या पायाला दुखापत झाली होती. या दुखापतीमुळे तो या संपूर्ण हंगामातून बाहेर झाला आहे. घोषचा बदली खेळाडू म्हणून मॅकनील नोरोन्हा ३० लाख रुपयांच्या मोबदल्यात संघात सामील होईल, असे या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. कर्नाटकचा अष्टपैलू खेळाडू असलेल्या नोरोन्हाचा नुकत्याच पार पडलेल्या नमन पुरस्कार सोहळ्यात एम. ए. चिदम्बरम् चषक देऊन गौरव करण्यात आला.

# कसोटी क्रमवारीत बुमराहचे अव्वल स्थान कायम

◆ **दुबई, १३ मे**

बुधवारी जाहीर झालेल्या आयसीसीच्या ताज्या क्रमवारीत भारताचा वेगवान गोलंदाजीचा मुख्य आधारस्तंभ असलेल्या जसप्रीत बुमराहने कसोटी गोलंदाजांमध्ये आपले अव्वल स्थान कायम राखले आहे. फलंदाजांच्या यादीत यशस्वी जयस्वाल व शुभमन गिलने अनुक्रमे ८वे आणि ९वे स्थान पटकावले आहे, तर इंग्लंडचा माजी कसोटी कर्णधार जो रूट ८८० गुणांसह या यादीत अव्वल स्थानी आहे.



जयस्वालच्या खात्यावर ७५० गुण जमा आहेत, तर एका स्थानाची प्रगती केलेल्या गिलने ७३० गुण मिळवले आहेत. या यादीत हॅरी ब्रुक दुसऱ्या क्रमांकावर असून, त्यानंतर अनुक्रमे ट्रॅव्हिस हेड आणि स्टीव्ह स्मिथ यांचा क्रमांक लागतो. भारताने २०२६ मधील जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचे अद्याप कोणतेही सामने खेळलेले नाहीत. त्यांनी आपला शेवटचा सामना नोव्हेंबर महिन्यात मायदेशात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळला होता.

गोलंदाजांच्या यादीत, बुमराह ८७९ गुणांसह अजूनही अव्वल स्थानी आहे, तर या यादीतील दुसरा सर्वोत्तम भारतीय गोलंदाज मोहम्मद सिराज १२व्या क्रमांकावर आहे. रवींद्र जडेजा आणि कुलदीप यादव सध्या अनुक्रमे १४व्या आणि १५व्या क्रमांकावर आहेत. ऑस्ट्रेलियाचा मिचेल स्टार्क आणि कसोटी कर्णधार पॅट कमिन्स यांनी अनुक्रमे दुसरे आणि चौथे स्थान पटकावले आहे, तर न्यूझीलंडच्या मॅट हेन्रीनेही झेप घेत तिसरे स्थान गाठले आहे. (वृत्तसंस्था)

# नीरज चोप्रा स्वित्झर्लण्डमध्ये सराव करणार

◆ **नवी दिल्ली, १३ मे**

पाठीच्या दुखापतीतून सावरत असलेला भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा २५ मे पासून स्वित्झर्लण्डमधील ऑलिम्पिक प्रशिक्षण केंद्राकडे रवाना होणार आहे, तर नेमबाज मनू भाकर इटलीला गेली आहे. या वर्षी होणाऱ्या राष्ट्रकुल आणि आशियाई क्रीडा स्पर्धांच्या पृष्ठभूमीवर, क्रीडा मंत्रालयाने या दोन्ही खेळाडूंच्या परदेशातील प्रशिक्षणाचे प्रस्ताव मंजूर केल्यानंतर ही पावले उचलण्यात आली आहेत.

चोप्रा या दोन्ही स्पर्धांमध्ये सहभागी होईल अशी अपेक्षा असली, तरी मनू भाकर केवळ आशियाई क्रीडा स्पर्धेतच सहभागी होणार आहे, कारण राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतून नेमबाजीचा समावेश वगळण्यात आला आहे.



स्वित्झर्लंडमधील बिएन येथे ४७ दिवसांच्या प्रशिक्षण शिबिरासाठी चोप्राने केलेली विनंती, तसेच मनू भाकरचा प्रशिक्षण आराखडा या दोन्ही प्रस्तावांना मंत्रालयाच्या मिशन ऑलिम्पिक सेलच्या बुधवारी येथे पार पडलेल्या १७३ व्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

सध्या तुर्कस्तानमध्ये पाठीच्या दुखापतीवर उपचार (पुनर्वसन) घेत असलेला, टॉप्समधील मुख्य खेळाडू नीरज चोप्रा या दोन मोठ्या बहु-क्रीडा स्पर्धांच्या तयारीचा भाग म्हणून २५ मे ते १० जुलै या कालावधीत बिएन येथील ऑलिम्पिक प्रशिक्षण केंद्रात सराव करेल.

**मनू भाकरचे इटलीतील प्रशिक्षण**

क्रीडा सचिव हरी रंजन राव यांच्या नेतृत्वाखालील एमओसीने, दोन ऑलिम्पिक पदके जिंकणाऱ्या मनू भाकरच्या इटलीतील लुक्का येथील परदेशी प्रशिक्षणालाही मंजुरी दिली आहे. हे प्रशिक्षण १३ मे ते २२ मे या कालावधीसाठी मंजूर करण्यात आले आहे. या २४ वर्षीय खेळाडूच्या सोबतीला तिचे प्रशिक्षक जसपाल राणा आणि फिजिओथेरपिस्ट स्नेहित खुराना हे देखील आहेत. लांब पल्ल्याचा धावपटू गुलवीर सिंगच्या प्रस्तावालाही हिरवा कंदील दाखवला आहे. (वृत्तसंस्था)

## मोहन बागानचे माजी अध्यक्ष टुटू बोस यांचे निधन

◆ **कोलकाता, १३ मे**

मोहन बागानचे माजी अध्यक्ष स्वप्न साधन बोस यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते.



कोलकाताच्या फुटबॉल क्षेत्रात प्रेमाने 'टुटू बाबू' म्हणून ओळखले जात असत. आधुनिक युगात मोहन बागान क्लबला आकार देण्यात बोस यांनी अत्यंत निर्णायक भूमिका बजावली. त्यांनी तीन दशकांहून अधिक काळ क्लबची विविध पदांवर राहून सेवा केली, यात सचिव आणि अध्यक्षपदाचाही समावेश आहे. बोस यांच्या पश्चात त्यांचे दोन पुत्र - श्रींजय आणि सौमिक - असा परिवार आहे.

श्रींजय हे सध्या मोहन बागानचे सचिव आहेत. भारतीय फुटबॉल प्रशासनातील अत्यंत प्रभावशाली व्यक्तींपैकी एक असलेल्या बोस यांच्यावर आरोग्याच्या विविध गुंतागुंतीच्या समस्यांमुळे येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते व मंगळवारी रात्री त्यांचे निधन झाले. त्यांचे पार्थिव शरीर बुधवारी मोहन बागान क्लबच्या तंबूमध्ये अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. (वृत्तसंस्था)

## खेळाडू ग्रेस गुण प्रस्ताव त्रुटी पुर्ततेसाठी आज अंतिम मुदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी राज्य शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या ग्रेस गुण सोलापूर शहर व ग्रामीण भागातील दहावी वन बारावीच्या ९५ खेळातील ३३३३ खेळाडू विद्यार्थ्यांना खेळाडूंना ग्रेस गुण मिळाले आहेत. यात २०० खेळाडूंच्या प्रस्तावांना त्रुटी लागल्या आहेत.

ज्या विद्यार्थ्यांनी यापुर्वी शासनाच्या ''आपले सरकार'' पोर्टलद्वारे ऑनलाईन पद्धतीने सादर केलेले आहेत परंतू त्यांच्या क्रीडा गुण प्रस्तावामध्ये त्रुटी राहिलेल्या आहेत किंवा प्रस्ताव सादर करुनही गुण मिळालेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे प्रस्ताव आवश्यक त्रुटी व पूर्ततेसह दोन प्रतीत कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा कार्यालयात १४ मे रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत सादर करावेत. असे जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी कळविले आहे.

# बंगळुरू-कोलकाता सामन्यात पावसाचा व्यत्यय

◆ **रायपूर, १३ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात बुधवारी रायपूर येथे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) आणि कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) यांच्यादरम्यानचा सामना पावसाच्या व्यत्ययामुळे विलंबाने सुरू झाला. पावसामुळे सामन्याची सुरुवात एक तास आणि १५ मिनिटे उशिराने झाली असली, तरी एकही षटक कमी करण्यात आलेले नाही. शेवटचे वृत्त आले तोपर्यंत आरसीबीने ८ षटकांत २ बाद ६९ धावा केल्या होत्या व त्यावेळी अंगकृश रघुवंशी नाबाद २० धावांवर,क तर कॅमेरॉन ग्रीन नाबाद ११ धावांवर खेळत होते.

आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदार याने नाणेफेक जिंकून केकेआरविरुद्ध प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. केकेआरचा कर्णधार अजिंक्य रहाणे आणि फिन ॲलन यांनी डावाला सुरुवात केली, परंतु संघाच्या जेमतेम २४ धावा होत नाही तोच भुवनेश्वर कुमारने फिन ॲलनला (१८) शर्माकडून झेलबाद करीत केकेआरला पहिला धक्का दिला. पुढे रहाणे अंगकृश रघुवंशीच्या साथीने मोठी खेळी करेल असे वाटत असतानाच जोश हेझलवूडने आपल्या गोलंदाजीत रहाणेला (१९) झेलबाद केले. केकेआरची ४.४ षटकांत २ बाद ४८ धावा अशी स्थिती झाली. पुढे अंगकृश व कॅमेरॉन ग्रीनने संयमाने खेळी करत केकेआरची पडझड थांबविली व संघाच्या धावसंख्येला आकार दिला. (वृत्तसंस्था)

# प्ले-ऑफसाठी आठ संघांमध्ये चुरस

◆ **नवी दिल्ली, १३ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) साखळी फेरीचा समारोप होण्यास अवघे १० दिवस शिल्लक असताना चेन्नई सुपर किंग्स आणि कोलकाता नाईट रायडर्ससारख्या संघांनी अखेरच्या टप्प्यात केलेल्या दमदार पुनरागमनामुळे, प्ले-ऑफमधील चार जागांसाठी तब्बल आठ संघ शर्यतीत आहेत.

स्पर्धेच्या सुरुवातीला, गतविजेते रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सातत्यपूर्ण कामगिरी करणारे गुजरात टायटन्स हे संघ प्ले-ऑफमध्ये स्थान मिळवतील अशी अपेक्षा होती. आता मात्र, स्पर्धेची सुरुवात संथ गतीने होऊनही, सनरायझर्स हैदराबाद हा संघही आघाडीच्या संघांच्या गटात सहभागी झाला आहे.

**प्ले-ऑफ शर्यतीतील अनपेक्षित वळणे**

या शर्यतीत सर्वात अनपेक्षित ठरलेली बाब म्हणजे पंजाब किंग्सची झालेली वेगाने घसरण; साखळी फेरीच्या पहिल्या टप्प्यात वर्चस्व गाजवल्यानंतरही, सलग चार सामने गमावल्यामुळे हा संघ सध्या अत्यंत नाजूक स्थितीत सापडला आहे.

मुंबई इंडियन्स आणि लखनौ सुपर जायण्ट्स हे दोन संघ मात्र या शर्यतीतून आधीच बाहेर पडले आहेत.

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा प्ले-ऑफपर्यंतचा मार्ग**

रजत पाटीदारच्या नेतृत्वाखालील



आरसीबी संघाने ती सातत्यपूर्ण कामगिरी कायम राखली आहे. या सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर गेल्या वर्षी दीर्घ प्रतीक्षेनंतर त्यांनी आपले पहिले-वहिले विजेतेपद पटकावले होते.

बुधवारी रात्री त्यांचा सामना कोलकाता संघासोबत होणार आहे. या सामन्यातील विजयामुळे प्ले-ऑफमध्ये त्यांचे स्थान जवळपास निश्चित होईल. अंतिम चारमध्ये आपले स्थान पक्के करण्यासाठी बंगळुरूला आणखी एका विजयाची आवश्यकता असेल; कारण १६ गुणांच्या तुलनेत १८ गुणांची बेरीज अधिक सुरक्षित मानली जाते. गत हंगामात केवळ मुंबई इंडियन्सच १६ गुणांसह प्ले-ऑफसाठी पात्र ठरू शकले होते. ११ सामन्यांतून ७ विजय आणि १४ गुणांसह, स्पर्धेच्या शर्यतीत असलेल्या संघांमध्ये बंगळुरूचा नेट रन रेट सर्वोत्तम आहे. कोलकाता संघानंतर, आपल्या साखळी फेरीतील शेवटच्या दोन सामन्यांमध्ये त्यांचा सामना पंजाब किंग्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्याशी होईल.

**पात्रतेसाठी पंजाब किंग्सचा संघर्ष**

वाईट गोलंदाजी व क्षेत्ररक्षणामुळे पंजाब किंग्सला सलग चार पराभव पत्करावे लागले आहेत, तरीही आयपीएलच्या पूर्वार्धातील त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे ते अव्वल चार संघांमध्ये कायम आहेत. त्यांच्या फॉर्मात असलेल्या संघामुळे, त्यांचा नेट रन रेट चांगला आहे आणि मुंबई इंडियन्स, बंगळुरू व हैदराबाद विरुद्धच्या उर्वरित तीन सामन्यांपैकी दोन विजय त्यांना स्पर्धेत पुढे जाण्यासाठी पुरेसे ठरतील. ११ सामन्यांमधून त्यांचे १३ गुण आहेत, त्यापैकी एक गुण केकेआर विरुद्धचा सामना पावसामुळे रद्द झाल्याने मिळाला आहे. धर्मशाला येथे मुंबई इंडियन्सविरुद्धचा सामना त्यांच्यासाठी जिंकणे अनिवार्य आहे, .

**गुजरात टायटन्सचे लक्ष्य अव्वल दोन स्थानांवर**

२०२२ मध्ये पदार्पण केल्यापासून गुजरात टायटन्सला केवळ एकदाच



प्ले-ऑफ्समध्ये स्थान मिळवता आले नाही. पूर्ण क्षमतेने कामगिरी करणाऱ्या गोलंदाजी फळीच्या आणि भक्कम अशा पहिल्या तीन फलंदाजांच्या जोरावर, शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील हा संघ गुणतालिकेत अव्वल दोनमध्ये स्थान निश्चित करण्याच्या मार्गावर आहे.

१२ सामन्यांमध्ये आठ विजय मिळवून त्यांनी १६ गुण जमा केले आहेत. त्यामुळे त्यांची प्ले-ऑफमधील जागा जवळपास निश्चित झाली आहे. त्यांचे शेवटचे दोन सामने कोलकाता व चेन्नई विरुद्ध होणार आहेत.

**चेन्नई सुपर किंग्सचे पुनरागमनाचे प्रयत्न**

सुरुवातीचे तीन सामने गमावल्यानंतर सीएसकेने आपल्या गत आठ सामन्यांपैकी सहा सामने जिंकत जोरदार पुनरागमन केले आहे. १५ मे रोजी लखनौ सुपर जायण्ट्सविरुद्ध दोन गुण मिळविण्याबाबत त्यांना स्वतःवर पूर्ण विश्वास असेल; त्यानंतर आपल्या लीग फेरीतील शेवटच्या दोन सामन्यांमध्ये त्यांना आणि गुजरात टायटन्सचा सामना करायचा आहे.

केवळ १८ गुणच संघाचे पुढील फेरीतील स्थान (पात्रता) निश्चित करतील. पुढील १० दिवसांच्या कालावधीत पात्रतेच्या शर्यतीत असलेले संघ एकमेकांविरुद्ध खेळणार असल्याने, सीएसकेला आपले उर्वरित सर्व सामने जिंकणे अनिवार्य ठरले आहे.


**कोलकाता नाईट रायडर्सचे पुनरुज्जीवन**

अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखालील केकेआर संघाची स्पर्धेची पहिली फेरी अत्यंत निराशाजनक ठरली होती; मात्र, सलग सहा सामने गमावल्यानंतरही, शेवटचे चार सामने जिंकत त्यांनी स्पर्धेतील आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे.

इतर संघांच्या तुलनेत त्यांच्या हाती अजूनही एक सामना शिल्लक आहे. ते जास्तीत जास्त १७ गुणांपर्यंत मजल मारू शकतात, जे कदाचित पुढील फेरीसाठी पात्र ठरण्यास पुरेसे ठरू शकतील. आपले शेवटचे तीन सामने आपल्या घरच्या मैदानावर खेळणार आहे.

**राजस्थान रॉयल्सच्या सातत्यातील समस्या**

वैभव सूर्यवंशी आणि ध्रुव जुरेल



यांच्या वैयक्तिक उत्कृष्ट कामगिरीनंतरही, रॉयल्सला सातत्य राखण्यात अपयश आले आहे. त्यांनी सलग चार विजय मिळवून सुरुवात केली, पण त्यानंतर त्यांची लय बिघडली आणि त्यांनी शेवटच्या सात सामन्यांपैकी पाच सामने गमावले. पंजाब किंग्सप्रमाणेच गोलंदाजी ही त्यांच्यासाठी एक समस्या ठरली आहे.

११ सामन्यांमधून १२ गुणांसह राजस्थान रॉयल्सलाही तीनपैकी किमान दोन सामने जिंकावे लागतील आणि इतर सामन्यांचे निकाल त्यांच्या बाजूने लागतील अशी आशा बाळगावी लागेल.

त्यांच्या उर्वरित सामन्यांमध्ये दिल्ली कॅपिटल्स, लखनौ सुपर जायण्ट्स व मुंबई इंडियन्स यांचा सामना करावा लागणार आहे. या विरोधी संघांची कामगिरी पाहता, या सामन्यांमुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल.

**दिल्ली कॅपिटल्सच्या क्षीण आशा**

अक्षर पटेलच्या नेतृत्वाखालील दिल्ली कॅपिटल्स संघाने पुढील हंगामासाठी नियोजन सुरू केले असले तरी, दिल्लीच्या आशा अगदीच क्षीण झाल्या आहेत. पंजाब किंग्सवर विजय मिळवूनही, प्ले-ऑफमध्ये पोहोचण्यासाठी त्यांना अजून खूप काही करायचे आहे. ते १२ सामन्यांमधून १० गुणांवर आहेत आणि जास्तीत जास्त १४ गुणांपर्यंत पोहोचू शकतात. मोठ्या फरकाने मिळवलेले विजयही पुरेसे ठरतीलच असे नाही. (वृत्तसंस्था)

### सनरायझर्स हैदराबादची अखेरच्या टप्प्यातील जोरदार मुसंडी

आपल्या शेवटच्या आठ सामन्यांपैकी सहा सामने जिंकून,सनरायधझर्स हैदराबाद हा आणखी एक असा संघ ठरला आहे जो अगदी योग्य वेळी आपल्या सर्वोत्तम कामगिरीच्या शिखरावर पोहोचत असल्याचे दिसून येत आहे. त्यांची आक्रमक फलंदाजी फळी यशस्वी ठरली आहे आणि पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखालील गोलंदाजांनी त्यांना भक्कम साथ दिली आहे.

सीएसके आणि आरसीबी यांच्याविरुद्धचे दोन सामने शिल्लक असताना, त्यांच्या खात्यावर सध्या १४ गुण जमा आहेत. प्ले-ऑफमध्ये स्थान मिळविण्यासाठी सनरायझर्स हैदराबादला किमान आणखी दोन (आणि शक्य असल्यास चार) गुणांची आवश्यकता असेल; शिवाय, ०.०३१ इतका असलेला त्यांचा नेट रन रेट देखील त्यांच्या पथ्यावर पडणारा आहे. १२ सामन्यांमधील त्यांचा पाचवा पराभव मंगळवारी रात्री गुजरात टायटन्सविरुद्ध झाला.

# मालविकासह सिंधू, देविकाची आगेकूच

**थायलंड ओपन बॅडमिंटन**

**किदाम्बी श्रीकांतची आठव्या मानांकित खेळाडूवर मात**



मालविका बनसोड



देविका सिहाग

◆ **पातुमवान, १३ मे**

थायलंडमधील निमिबुत्र स्टेडियमवर सध्या सुरू असलेल्या थायलंड ओपन बॅडमिंटन स्पर्धेत अंतिम ३२ खेळाडूंच्या फेरीत माजी प्रथम विश्वमानांकित किदाम्बी श्रीकांतने सिंगापूरच्या आठव्या मानांकित खेळाडू लोह कीन यूचा सरळ सेट्समध्ये २१-१४, २१-१५ असा पराभव करीत मोठा उलटफेर घडविला. दरम्यान, पी.व्ही. सिंधूने चीन तैपेईच्या तुंग सिओ-टोंगचा २१-९, २१-१२ असा पराभव केला, तर देविका सिहागने जपानच्या नात्सुकी निदैराचा २१-१९, १३-२१, २१-१५ असा पराभव करत विजय मिळवला. नागपूरच्या मालविका बन्सोडनेही आपल्या प्रतिस्पर्धीवर मात करून पुढील फेरीत प्रवेश केला.

भारताला थॉमस कपमध्ये कांस्यपदक मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलल्यानंतर या स्पर्धेत उतरलेल्या श्रीकांतने माजी विश्वविजेत्या प्रतिस्पर्ध्याला सामन्यावर वर्चस्व गाजवण्याची कोणतीही संधी दिली नाही व अवघ्या ३० मिनिटांतच सामना संपवला. पुढील उप-उपांत्यपूर्व फेरीत त्याचा सामना चीन तैपेईच्या सु ली यांगशी होईल.

पुरुषांच्या एकेरी गटातील अन्य एका सामन्यात थॉमस चषक स्पर्धेदरम्यान झालेल्या दुखापतीतून सावरत पुनरागमन करणाऱ्या लक्ष्य सेनने सिंगापूरच्या जिया हेंग जेसन तेहचा ४३ मिनिटांत २१-१६, २१-१७ असा पराभव करत पुढील फेरीत प्रवेश केला.

स्पर्धेत सहावे मानांकन असलेल्या सिंधूने, चीन तैपेईच्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध आपल्या पहिल्या गेमची सुरुवात ०-३ अशा पिछाडीने केली होती; मात्र त्यानंतर तिने जोरदार पुनरागमन करत एकतर्फी विजय नोंदवला आणि पुढील फेरीत स्थान पक्के केले.

थायलंड मास्टर्स २०२६ ची विजेती असलेल्या देविका सिहागने सामन्याची सुरुवात विजयाने केली. जपानी प्रतिस्पर्ध्याने दुसरा गेम जिंकला. निर्णायक गेममध्ये देविकाने सलग सात गुण मिळवत ११-५ अशी भक्कम आघाडी घेतली व अखेर विजयावर शिक्कामोर्तब केले. पुढील फेरीत सिंधूचा सामना डेन्मार्कच्या अमाली शुल्झशी होईल, तर देविकाचा सामना थायलंडच्या पिचामोन ओपातनिपुथशी होईल. मालविका बन्सोडनेही पुढील फेरीत प्रवेश केला; तिने आपल्या कॅनेडियन प्रतिस्पर्ध्याचा ५३ मिनिटांत १३-२१, २६-२४, २१-१३ असा पराभव केला.

अन्य लढतीत, अनमोल खरबने दुसरी मानांकित खेळाडू चीनच्या चेन यू फेईविरुद्ध कडवी झुंज दिली. अखेरीस, एक तास आणि दहा मिनिटे चाललेल्या या अटीतटीच्या लढतीत अनमोलला २१-१९, १३-२१, १८-२१ असा पराभव पत्करावा लागला. (वृत्तसंस्था)

# विठ्ठल मंदिरात सापडला ४०० वर्षांपूर्वीचा चादगडी रांजण

## माणकोजी बोधले यांनी मंदिरात रांझण बसविल्याची माहिती समोर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ मे-**

येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर जतन आणि संवर्धनाचे काम सुरू आहे. यादरम्यान मंदिरांमध्ये सुमारे चारशे वर्षांपूर्वीच्या प्राचीन अशा ऐतिहासिक दगडी रांजण सापडला आहे. हा रांझण विठ्ठल भक्त माणकोजी बोधले यांनी १६४० मध्ये बाजीराव पडसाळी मध्ये बसवल्याची माहिती समोर आली आहे.

**सापडलेल्या रांझणाची पुर्नस्थापनाकरणार**

दरम्यान या जुन्या दुर्मिळ अशा पाषाणा पासून तयार केलेल्या रांझणाची पुनर्स्थापना याच ठिकाणी करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सोलापूर तरुण भारतशी बोलताना दिली.

**बोधलेबुबांचा रांझण असेही संबोधले जायचे**

विठ्ठल भक्त माणकोजी बोधले यांनी त्याकाळी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना व पूजेसाठी या रांजणातील पाण्याचा वापर केला जात होता. या रांजणाला बोधलेबुवांचा रांजण असेही त्याकाळी संबोधले जायचे. सुमारे चारशे वर्षानंतर दुर्मिळ दगडी रांझण सापडल्याने याविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे.

**तब्बल दोन टन वजनाचा आहेहा रांझण**

सध्या पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शना खाली विठ्ठल मंदिर जतन आणि संवर्धनाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे सध्या बाजीराव पडसाळी भागामध्ये नवीन दगडी फर्शी व डागडुजी करण्याचे काम सुरू आहे.

या दरम्यान जुना दगडी रांजण आढळून आला आहे. हा दगडी रांजण ४०० वर्षांपूर्वीचा जुना असून तब्बल दोन टन वजनाचा आहे. यामध्ये जवळपास



दोनशे लिटरहून अधिकपाणी मावते असा हा भला मोठा रांझण भाविकांची लक्ष वेधून घेत आहे.

> संत माणकोजी बोधले महाराज हे वारकरी संप्रदायातील थोर संत व समाजसेवक होते. त्यांनी विठ्ठल भक्ती बरोबरच समाजोपयोगी कार्ये केली.पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोयव्हावी यासाठी त्यांच्या पुढाकारातून हा रांझण बसवण्यात आल्याची आख्यायिका सांगितली जाते.
>
> **- गहिनीनाथ महाराज औसेकर**
> ( सहअध्यक्ष, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूर)

# सांगोल्यातील पाच ग्रामपंचायतींना इमारत निधी मंजूर

## ✻ आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीला यश ✻

**सांगोला,दि.१३ मे -**

ग्रामपंचायत प्रशासनाचा कार्यभार व्यवस्थित पार पाडण्यासाठी ग्रामपंचायतींना नवीन इमारतीची आवश्यकता होती. सांगोला विधानसभा मतदारसंघातील सोनके व तिप्पेहळ्ळी ग्रामपंचायतींना प्रत्येकी २५ लाख तर आगलावेवाडी, हटकर मंगेवाडी आणि सोनलवाडी ग्रामपंचायतींना प्रत्येकी २० लाख असे ५ ग्रामपंचायतींना बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत नविन ग्रामपंचायत इमारत बांधण्यासाठी एकूण १ कोटी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून आ.डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीला यश मिळाले आहे.



राज्याचे ग्रामविकास तथा पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे आ.डॉ.देशमुख यांनी ग्राम पंचायतींना इमारत बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा ही मागणी अधिवेशनापूर्वी केली होती. या मागणीची दखल घेत मंत्री गोरे यांनी तत्काळ या ग्रामपंचायतींना बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गतनिधी मंजूर केला आहे. निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आ. डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आभार मानले.

# जैन मंदिर परिसरात रिक्षाची धडक; मजूर गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ मे-**

शहरातील जैन मंदिर परिसरात नाली खोदकाम सुरु असताना रस्ता ओलांडणाऱ्या मजुराला भरधाव रिक्षाने जोरदार धडक दिल्याची घटना घडली असून या अपघातात मजूर गंभीर जखमी झाला आहे. अपघातानंतर रिक्षाचालक घटनास्थळावरुन पसार झाल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

दशरथ सिद्राम चौगुले हे आपल्या कुटुंबासह चौरमुले प्लॉट, बार्शी येथे वास्तव्यास असून मजुरीचे काम करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. दि. १४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास ते त्यांचे मामा लक्ष्मण त्रिंबक चव्हाण तसेच इतर सहकाऱ्यांसह जैन मंदिर परिसरात रोडलगतच्या नालीचे खोदकाम करण्यासाठी गेले होते.. दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास लक्ष्मण चव्हाण हे नालीचे काम करून रस्ता ओलांडत असताना रिक्षा क्रमांक चक१३उ्ढ६६४३ च्या चालकाने भरधाव व निष्काळजीपणे रिक्षा चालवत त्यांना समोरून जोरदार धडक दिली. या धडकेत त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर चालकाने कोणतीही मदत न करता रिक्षासह घटनास्थळावरुन पलायन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. घटनेनंतर सहकाऱ्यांनी तातडीने जखमी लक्ष्मण चव्हाण यांना बार्शी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी धाराशिव येथे रेफर केले. धाराशिव येथे उपचारानंतर प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सोलापुरातील कुंभारी येथील आश्विनी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. दरम्यान, अपघात घडविणाऱ्या रिक्षाचालकाची चौकशी केली असता चालकाचे नाव रविकांत जाधव असे असल्याचे समोर आले. याप्रकरणी संबंधित चालकाविरोधात भरधाव, निष्काळजी व हयगयीने वाहन चालवून गंभीर अपघात घडविल्याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# सिंहगड पब्लिक स्कूल तृतीय

## ग्लोबल कप राष्ट्रीय हँडबॉल स्पर्धेत मुले व मुलींच्या संघाची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ मे-**

गोवा राज्यातील मडगाव येथे पार पडलेल्या ग्लोबल कप नॅशनल हँडबॉल चॅम्पियनशिप स्पर्धेत केगाव येथील सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या मुले व मुलींच्या संघाने तृतीय स्थान संपादले.

बारा वर्षाखालील मुलींच्या गटात सिंहगड पब्लिक स्कूलच्या संघाने उपांत्यपूर्व फेरीत मनोविकास गोवा संघाचा ७-४ अशा गोल फरकाने पराभव करत शानदार विजय मिळविला. या सामन्यात सिंहगडच्या खेळाडूंनी आक्रमक तसेच बचावात्मक खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. शरयू वल्लभ वसेकर हिने प्रभावी खेळ करत प्लेअर ऑफ द मॅच पुरस्कार पटकाविला.

त्यानंतर तृतीय क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात सिंहगड पब्लिक स्कूल संघाने विबग्योर खारघर संघावर ६-२ असा एकतर्फी विजय मिळवत स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला. या सामन्यात जानवी




दिनेश बुराडे हिने प्लेअर ऑफ द मॅच पुरस्काराचा मान मिळविला. सतरा वर्षाखालील मुलांच्या गटात सिंहगड पब्लिक स्कूलच्या संघाने उत्कृष्ट फिटनेस, सांघिक समन्वय आणि जिद्दीच्या जोरावर संयुक्त तृतीय क्रमांक पटकाविला. तसेच मुलींच्या गटातही संघाने प्रभावी खेळाचे प्रदर्शन करत संयुक्त तृतीय क्रमांक मिळवून संस्थेचा गौरव वाढविला.

या खेळाडूंना क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक राजू ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले. संघ व्यवस्थापक महेश गोगी यांनी उत्कृष्ट नियोजन केले, तर खेळाडूंच्या फिटनेससाठी फिजिओ मंजुषा सावंत यांनी परिश्रम घेतले.

सिंहगड पब्लिक स्कूलच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव संजय नवले यांनी सर्व खेळाडू, प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक, फिजिओ तसेच पालकांचे अभिनंदन केले. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि संघभावना विकसित होते. राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश संपूर्ण सिंहगड शिक्षण संस्थेसाठी अभिमानास्पद आहे, असे गौरवोद्गार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

# कुंभारी येथे २६ वर्षीय तरुणीची गळफासाने आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

अज्ञात कारणावरून एका २६ वर्षीय तरुणीने राहत्या घरात दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथे आज बुधवारी सकाळी नऊ वाजता उघडकीस आली. शिल्पा विजयकुमार इमाडे (वय २६ वर्षे, राहणार कुंभारी) असे त्या गळफास घेतलेल्या तरुणीचे नाव आहे. बुधवारी सकाळी शिल्पा हिने घरामध्ये गळफास घेतला असल्याचे घरच्यांना आढळून आले. ही खबर वळसंग पोलिसांना समजली असता पोलीस हवालदार व्ही एम मोरे यांनी घटनास्थळी पोहचून सदरचा मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पावणे बारा वाजता दाखल केला.

# पाणीटंचाईग्रस्त सुळेवाडी गावात टँकर सुरु

## पं.स.सदस्या नम्रता पुकळे; विक्रम सुळे यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १३ मे-**

माळशिरस तालुक्यातील तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पंचायत समिती सदस्या नम्रता पुकळे यांनी शासनाच्या माध्यमातून टंचाईग्रस्त सुळेवाडी गावामध्ये पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरू केला आहे. यासाठी सुळेवाडीचे युवा नेते विक्रम सुळे यांनी पाठपुरावा केला होता.

> शासनाच्या माध्यमातून तात्पुरता टँकर सुरू केला असला तरी निरा देवघर प्रकल्पाचे काम पूर्ण करून शेताच्या शेवटच्या टोकापर्यंत कायमस्वरूपी पाणी पोहोचवणे हाच आमचा अंतिम उद्देश आहे.
>
> **- नम्रता पुकळे, सदस्या, पंचायत समिती, माळशिरस.**

काही दिवसांपासून माळशिरस तालुक्यातील अनेक गावांमध्ये भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. नागरिकांचे व जनावरांचे हाल होत असल्याचे निदर्शनास येताच नम्रता पुकळे यांनी तातडीने पंचायत समिती व तहसील प्रशासनाकडे पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे सुळेवाडी परिसरातील वाड्या-वस्त्यांवर शासकीय टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू झाला आहे. नम्रता पुकळे म्हणाल्या, 'नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, ही आमची प्राथमिकता आहे. एकाही नागरिकाला पाण्यावाचून त्रास होणार नाही, याची आम्ही काळजी घेऊ.' टँकर सुरू झाल्यामुळे ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत आहे. विशेषतः महिला वर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे. अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. विक्रम सुळे यांनीही प्रशासनाचे आभार मानले.

# सांगोला न्यायालयात कायदेविषयक शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ मे-**

राष्ट्रीय व राज्य विधी सेवा प्राधिकरण तसेच प्रमुख जिल्हा न्यायधीश एम.एस.शर्मा, एस.एस.शिंदे यांचे सहकार्याने सांगोला तालुका विधी सेवा समिती व विधिज्ञ सेवा संघ यांचे संयुक्त विद्यमाने सांगोला येथे कायदेविषयक शिबीर आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी सांगोला न्यायालयाचे दिवाणी न्यायाधीश पी.आर.कुलकर्णी, सह दिवाणी न्यायाधीश ए.ए.पाटील, २ रे सह दिवाणी न्यायाधीश एस.एस. साळुंखे तसेच सांगोला विधीज्ञ संघाचे अध्यक्ष अ‍ॅड. व्ही.व्ही.बाबर उपस्थित होते.

शिबीरात १ मे महाराष्ट्र दिन या विषयावर अ‍ॅड. एस.एन.फुले, ३१ मे तंबाखू विरोधी दिन या विषयावर अ‍ॅड. ए.एच.भोसले, असंघटीत कामगार कायदेशीर सेवा योजना २०१५ या विषयावर अ‍ॅड. एस.आर.कदम यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अ‍ॅड. एम.यु.डबीर, प्रास्ताविक अ‍ॅड.व्ही.व्ही.बाबर यांनी केले. आभार अ‍ॅड. ए.डी.काटकर यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करणेकरीता सांगोला न्यायालयाचे सहा.अधिक्षक ए.एस.बमनळ्ळी, सहा.अधिक्षक डी. डी.मायभाटे, विधी सेवा समितीचे व न्यायालयीन कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


> **समाज व्यसनमुक्त होणे ही काळाची गरज : न्यायाधीश कुलकर्णी**
>
> अध्यक्षीय भाषणात दिवाणी न्यायाधीश पी.आर.कुलकर्णी यांनी दिवसेंदिवस समाजाम धील वाढत चाललेली व्यसनाधीनता हा चिंतेचा विषय असून प्रत्येकाने स्वतःला व्यसनापासून दूर ठेवणे ही काळाची गरज आहे. संपूर्ण समाज व्यसनाधीनतेपासून मुक्त होण्याकामी त्याची सुरुवात स्वतःपासून करणे अतिशय महत्वाचे असलेबाबत नमूद केले.

# अक्कलकोटमध्ये चौडेश्वरी देवीच्या यात्रेनिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ मे-**

अक्कलकोटचे ग्रामदैवत श्री चौडेश्वरी देवीची यात्रा महोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष काशिनाथ कुंभारे व कार्याध्यक्ष शरणप्पा कुंभार यांनी दिली.

यात्रा महोत्सवानिमित्त शुक्रवारी सकाळी आठ वाजता चतुर्दशी निमित्ताने श्री देवीची मंदिरापासून ते श्री शांतलिंगेश्वर हिरेमठ पर्यंत सवाद्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी विहीरीवर श्री देवीची जलाभिषेक, ओटी भरणे व वेदमूर्ती बसवराज शास्त्री यांच्या विविध मंत्रोच्चारात विधीवत पूजा व आरती होणार आहे. त्यानंतर सुहासिनी महिलांचा पूजन करून प्रसाद वाटप होणार आहे. यात्रा महोत्सवाच्या मुख्य दिवशी शनिवारी (दि.१६) अमावस्या निमित्ताने श्री देवीची आरती, रुद्राभिषेक व पूजा होणार आहे. त्यानंतर मंदिर भाविकांना नैवेद्य दाखविण्यासाठी व दर्शनासाठी खुला राहणार आहे. सकाळी दहा वाजता श्री देवीची मिरवणूक शुभारंभ आमदार सचिन कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, नगरसेवक व अन्य मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. पहिल्या दिवशी कुंभार गल्ली पासून ते टिळक गल्ली, मेन रोड, हरवाळकर गल्ली, कारंजा चौक, श्री स्वामी समर्थ समाधी मठ, बसस्थानक, वेताळ चौक, खासबाग गल्ली, हन्नूर चौक, धनगर गल्ली, बेडर गल्ली मार्गे निघणार आहे. रविवारी दि. १७ मे रोजी सकाळी दहा वाजता श्री देवीची सवाद्य मिरवणूक मंदिरापासून




ते नाईकवाडी गल्ली, फत्तेसिंह चौक, भारत गल्ली, मधला मारुती, सुभाष गल्ली, आझाद हिंद गल्ली, माळी गल्ली, देशमुख गल्ली, महादेव नगर मार्गे निघणार आहे. या यात्रा उत्सवात पारंपरिक वाद्य, वाजंत्री, डिजिटल फटाके, ढोल, ताशा, टाळ चा समूह सहभागी होणार आहे. मंगळवारी (दि. १९) कुंभार मठात सकाळी अकरा ते दुपारी चार वाजता सर्व भाविकांना खिरीचा महाप्रसाद वाटप होणार आहे. तरी सर्व भाविकांनी यात्रा उत्सवात सहभागी होऊन महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन यात्रा महोत्सव कमिटीने केले आहे.

> यात्रा महोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम, मिरवणुका व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उत्सवाची शोभा वाढवावी.
>
> - शरणप्पा कुंभार, कार्याध्यक्ष, यात्रा महोत्सव समिती

> श्री चौडेश्वरी देवी यात्रा महोत्सव हा अक्कलकोटच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. या उत्सवात सर्व भाविकांनी सहभागी होऊन देवीचा आशीर्वाद घ्यावा.
>
> **- काशिनाथ कुंभारे, अध्यक्ष, श्री चौडेश्वरी देवी मंदिर ट्रस्ट**

## महत्वाचे...



### संजय भोकरे यांच्या हत्येचा कट रचणाऱ्यास अटक करण्याची मागणी

**अक्कलकोट, दि. १३ मे-**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे यांच्या हत्येचा कट रचणाऱ्या मुख्य सूत्रधाराला अटक करून भोकरे यांना सुरक्षा देण्याच्या मागणीसाठी अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ डिजिटल मीडिया सोलापूर जिल्ह्याच्या वतीने निवेदन देण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य कार्यकारणी सदस्य स्वामीराव गायकवाड, सोलापूर जिल्हा डिजिटल मीडिया विभागाचे जिल्हाध्यक्ष राजेश जगताप, ज्येष्ठ सदस्य समाधान आहिरे, रमेश भंडारी आदी उपस्थित होते.

### महापालिकेत दर मंगळवार, गुरुवारी जनता दरबारचे आयोजन

**सोलापूर, दि. १३ मे-**

शहरातील नागरिकांच्या तक्रारी, अडचणी व विविध समस्या वेळेत आणि प्रभावीपणे सोडवण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेने 'जनता दरबार' हा उपक्रम अधिक नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी आठवड्यातील मंगळवार व गुरुवार या दोन दिवसांत दुपारी ३.३० ते ५.३० या वेळेत नागरिकांसाठी निश्चित वेळ राखून ठेवण्यात आली आहे. तक्रारींच्या तत्काळ निवारणासाठी नियंत्रण अधिकाऱ्यांची रोटेशन पद्धतीने नियुक्ती करण्यात आली आहे. महापालिका आयुक्तांच्या वतीने नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्यावर तत्काळ कार्यवाही व्हावी, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची रोटेशन पद्धतीने नियुक्ती करण्यात आली आहे. या रोटेशननुसार अतिरिक्त आयुक्त, नगर अभियंता, उपायुक्त तसेच सहाय्यक आयुक्त स्तरावरील अधिकारी ठराविक आठवड्यांमध्ये उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या ऐकणार आहेत. पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी तसेच दुसऱ्या गुरुवारी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे उपस्थित राहतील. दुसऱ्या व चौथ्या मंगळवारी आणि पहिल्या गुरुवारी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार व नगर अभियंता सारिका अकुलवार उपस्थित राहणार आहेत. तर तिसऱ्या व चौथ्या गुरुवारी आणि उर्वरित जास्तीचे मंगळवार अथवा गुरुवार उपायुक्त सोनाली यादव, सहाय्यक आयुक्त मनिषा मगर या नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करणार आहेत. या वेळेत संबंधित अधिकारी आपल्या कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारी समजून घेऊन त्यावर आवश्यक ती कार्यवाही करतील. तसेच आवश्यकतेनुसार संबंधित विभागांचे इतर अधिकारीही उपस्थित राहून समन्वय साधतील, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आदेशात म्हटले आहे. जनता दरबारात प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा आढावा दर आठवड्याला घेण्यात येणार असून, त्यांच्या निवारणाची स्थिती तपासली जाणार आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना थेट प्रशासनाशी संवाद साधण्याची संधी मिळणार असून, प्रलंबित प्रश्नांच्या निपटाऱ्याला गती मिळणार आहे.

### श्रध्देच्या वटवृक्षाला प्रत्येक भक्तांनी मनापासून उभारी द्यावी : न्यायमूर्ती जोशी

अक्कलकोट, दि.१३ मे-

श्री स्वामी समर्थावरील भक्तांची भक्ती व श्रद्धा ही स्वामींच्या विशाल वटवृक्षा सारखी कधीही न संपणारी असावी आणि आपण सारे स्वामी भक्त त्या स्वामींवर असलेल्या भक्ती व श्रध्देच्या वटवृक्षाला मनापासून उभारी द्यावी असे मनोगत मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती तसेच मानवाधिकार आयोगचे सदस्य श्रीमती स्वप्ना जोशी यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानास सहकुटूंब भेट देवून श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांनी माजी न्यायमूर्ती श्रीमती स्वप्ना जोशी व कुटूंबियांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सत्कार केला. यावेळी मंदिर समितीचे प्रथमेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशांत काळे, विपुल जाधव, सागर गोंडाळ, स्वप्निल मोरे, सुरवसे उपस्थित होते.

### दाजी पेठ येथे ५० वर्षीय इसमाची गळफास घेऊन आत्महत्या


**सोलापूर, दि. १३ मे-**

अज्ञात कारणावरून एका पन्नास वर्षीय इसमाने घरातील छताचे पंख्याला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दाजी पेठ येथे मंगळवारी संध्याकाळी साडेसात वाजता उघडकीस आली. राजेंद्र नरसिंगराव बोगा वय ५० वर्ष , रा.१५२८ , दाजी पेठ सोलापूर ) असे त्या गळफास घेतलेल्या इसमाचे नाव आहे . मंगळवारी संध्याकाळी राजेंद्र यांनी घरामध्ये गळफास घेतला असल्याचे घरच्यांना आढळून आले .तेव्हा भाऊ चंद्रकांत याने इतरांच्या मदतीने गळफास सोडविला.ही खबर समजताच जेलरोड पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार एस.आय. सय्यद यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात रात्री सव्वा आठ वाजता दाखल केला असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.

## निधन वृत्त...

### आशा करकमकर-शहा

**सोलापूर, दि. १३ मे-**



रेल्वे लाईन्स, होमगार्ड ऑफिस जवळील आशा रतिलाल करकमकर-शहा (वय ८६) यांचे बुधवार, दि. १३ मे रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या मागे एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर रुपाभवानी मंदिराजवळील विद्युत वाहिनी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. सोन्या मारुती चौकातील युनिक हॉस्पिटलचे डॉ. सुहास करकमकर यांच्या त्या मातोश्री आहेत.

## महत्वाचे...

### पंधे अपार्टमेंटमध्ये धाडसी घरफोडी; दागिन्यासह लाखाचा ऐवज लंपास

**सोलापूर, दि. १३ मे-**

बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने सोन्याचे दागिने आणि रोख रकमेसह १ लाख ७०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना अभिमानश्री नगरातील पंधे अपार्टमेंट मध्ये बुधवार सकाळी सात वाजता उघडकीस आली. याबाबत संजय मधुकर येळ्ळूरकर (वय ५८, रा. घर नं. बी/१७, दुसरा मजला, पंधे अपार्टमेंट, अभिमानश्री नगर, सोलापूर) यांनी फिर्याद दिली असून अज्ञात चोरट्यावर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



यातील फिर्यादी हे घराला कुलूप लावून परिवारासह दि. ११ मे रोजी रात्री ११ वाजल्या पासून बाहेर गेले होते.दोन रात्र घर बंद होते . दरम्यान अज्ञात चोरट्याने रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत घराच्या सेफ्टी डोअरचा आणि मुख्य लाकडी दरवाजाचा कडा-कोयंडा कशाच्या तरी साहाय्याने उचकटला. घरात प्रवेश केल्यानंतर चोरट्यांनी बेडरुममधील लाकडी आणि लोखंडी कपाटांचे लॉक तोडून ८४ हजार रुपये किमतीची १२ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन, ८ हजार २०० रुपयांची चांदीची चैन आणि कपाटात ठेवलेली १५ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम, असा एकूण १ लाख ७ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला आहे. दरम्यान येळ्ळूरकर कुटुंब तिसऱ्या दिवशी म्हणजे १३ मे रोजी सकाळी सात वाजता घरी परतल्यानंतर त्यांना घराचा दरवाजा तुटलेला दिसला, तेव्हा घरामध्ये चोरी झाल्याचे उघडकीस आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे . गुन्ह्याचा पुढील तपास हवालदार परीट हे करीत आहेत .

### जुना पुना नाका पुलावर अपघातात तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १३ मे-**

मित्राला भेटण्यासाठी सोलापूरकडे निघालेला एक दुचाकीस्वार ४ चाकी वाहनाच्या धडकेत जागीच ठार झाला. ही घटना जुना पुना नाका ब्रिजवर आज बुधवारी दुपारी साडेतीन वाजता घडली. महारुद्र रामा तानवडे (वय ३४, रा. सावरगाव, ता. तुळजापूर) असे त्या मयत दुचाकीस्वाराचे नाव आहे. आज तुळजापूरहून तो चुलत्याला भेटण्यासाठी बाळे येथे आला होता. मात्र दुपारी मित्राचा फोन आल्यावर तो घरी सांगून मित्राला भेटण्यासाठी सोलापूरकडे मोटरसायकलवरून निघाला असताना दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास त्याच्या दुचाकीला पाठीमागून एका वाहनाने जोरात धडक दिली. या धडकेत तो गंभीर जखमी होऊन जागीच मृत्युमुखी पडला. यादरम्यान घटनास्थळाकडून सोलापूरकडे एक रुग्णवाहिका येत होती.तिला थांबवून त्यातच या महारुद्र अवताडेचा मृतदेह घालून येथील शासकीय रुग्णालयात सायंकाळी पाच वाजता दाखल केला. महारुद्र हा अविवाहित असून तो सेंट्रींग मिस्तरीचे काम करायचा. त्याच्या लग्नासाठी स्थळ बघण्याचे काम घरच्यांकडून सुरू होते .त्याच्या पश्चात वडील, एक भाऊ बहीण असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली .



# पंढरी तीर्थक्षेत्राची समग्र विकासकामे ३० महिन्यांत पूर्ण करण्याचे 'टार्गेट'

- जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांची माहिती
- तीर्थक्षेत्र विकासासाठी ३९९३.९० कोटीची शिखर समितीची अंतिम मान्यता
- २०२६.७२ कोटी रुपयांचा भूसंपादनावर होणार खर्च

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पंढरपूर तीथक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीच्या बैठकीत ३९९३.९० कोटीच्या सर्वसम ावेशक आराखड्यास अंतिम मान्यता देण्यात आली. पंढरपूर हे राज्यातील सर्व धर्मियांचे श्रध्दास्थान आहे. त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या भाविकांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात. पुढील ५० वर्षाचा विचार करुन या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करण्यात येणारी विकास कामे येत्या ३० महिन्यात पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी आज (दि. १३) दिली. दरम्यान, यापैकी २०२६.७२ कोटी भूसंपादनावर होणार खर्च होणार असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची बैठक नुकतीच मंत्रालयात पार पडली होती. पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे धार्मिक व सांस्कृतिक तीर्थक्षेत्र आहे. येथे दरवर्षी आषाढी, कार्तिकी, चैत्री आणि माघी वारीच्या काळात लाखो वारकरी श्री विठ्ठल-रुक्मिणींच्या दर्शनासाठी येतात. भाविकांची सातत्याने वाढणारी संख्या, रस्ते, वाहतूक आणि अन्य संबंधित बाबी लक्षात घेता पंढरपूर तीर्थक्षेत्र परिसराच्या समग्र व नियोजित विकासाची कामे वेगाने हाती घेण्यात यावीत, अशा सुचना त्यांनी जिल्हा प्रशासनास दिल्या आहेत.

पंढरपूर येथे येणाऱ्या वारकरी व भाविकांना स्वच्छ, गर्दीमुक्त, सुरक्षित आणि आध्यात्मिकदृष्ट्या समाधानकारक अनुभव मिळावा हा विचार करून विकास कामे दर्जेदार, शाश्वत व भविष्याभिमुख पायाभूत सुविधा उभारणे आवश्यक आहे. यासाठी बाधित निवासी व व्यावसायिक मालमत्ताधारक तसेच भाडेकरूंना योग्य म ोबदला तात्काळ देण्यात यावा. भूसंपादनासाठी आवश्यक निधीही त्वरित उपलब्ध करून द्यावा आणि निधीअभावी कोणतेही काम अपूर्ण राहू नये, अशा सूचनाही मुख्यमंत्री यांनी यावेळी दिल्या आहेत.

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी या बैठकीत सादर केलेल्या प्रस्तावानुसार गर्दी व्यवस्थापनासाठी कॉरिडॉर उभारणी, पुरातन मंदिर व मठांचे जतन-संवर्धन, बाधितांना व्यावसायिक संधी आणि वारकऱ्यांसाठी समग्र सुविधा विकास यासाठी ७३५.८० कोटी रुपयांचा आराखडा मांडण्यात आला. तसेच नगर प्रदक्षिणा मार्ग विकास, नदी घाट सुशोभीकरण, वाहनतळ व व्यापारी संकुल, शहर सुशोभीकरण, रस्ते व पूल आणि पालखी तळांच्या विकासासाठी १३८७.९१ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला. याशिवाय भूसंपादन व पुनर्वसन खर्च, बाधित इमारतींचा मोबदला आदींसाठी २०२६.७५ कोटी रुपयांचा प्रस्ताव मांडण्यात आला. असा एकूण ४१५०.४६ कोटी रुपयांच्या या सर्वसमावेशक आराखडा होता; यातील काही काम ांची दोन वेळा झालेली रक्कम कमी करून शिखर समितीच्या बैठकीत ३९९३.९० कोटीच्या सर्वसमावेशक आराखड्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी शिखर समितीच्या बैठकीत मान्यता दिली आहे.



#### झिरो डे ते ३० महिन्यात कॉरिडॉर होणार पूर्ण

या कॉरिडॉरची उभारणी पुढील ५० वर्षाचा विचार करुन करण्यात येणार आहे. या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करण्यात येणारी विकास कामे काम चालू केल्यापासून ३० महिन्यात पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या कामाचे इतिवृत्त आले असून, आता ४ दिवसात जीआर येईल आणि ३० टक्के निधी मिळताच प्रत्यक्ष कामास प्रारंभ होणार आहे. कॉरिडॉरची उभारणी करताना स्थानिकच्या व्यापारी बाधितांचे आहे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्याचे धोरण आहे. निवासी मालमत्ताधारक आणि भाडेकरी लोकांना योग्य तो मोबदला देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिली.

#### पंढरी नगरी होणार लवकरच चकाचक

या शिखर समितीच्या मान्यतमुळे आता लवकरच ३० टक्के निधी मिळणार आहे. याद्वारे कामांना हळूहळू सुरूवात होणार आहे. यानंतर आलेल्या मोठ्या निधीतून मंदिराबरोबर नगरप्रदक्षिणा मार्ग, पालखी मार्ग, हेलिपॅडवर ४ नव्याने स्लॉट निर्माण करणे, ६५ एकरात सुशोभीकरण, शहराला जोडणारे २८ मार्गांचे सुशोभीकरण, वयोवृध्द नागरिकांना उजैनच्या धर्तीवर स्नानकंड उभारणी करणे, ४ वाहनतळे निर्माण करणे, वाळवंट सुशोभीकरण, स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी आवास योजना राबविणे यासह येणाऱ्या भाविकांसाठी इतरही विकासकामे राबविली जाणार असल्याने पंढरीनगरी लवकरच चकाचक होणार आहे.

कार्तिकेयन एस. जिल्हाधिकारी, सोलापूर

## कुंभमेळा 'बोधचिन्हा'साठी पियुष पिंपळनेरकरची बाजी

**पंढरपूरच्या तरुणाची कमाल; तब्बल १ लाखांचा ठरला मानकरी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ मे-**



नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी राज्य शासनाकडून 'बोधचिन्ह' अर्थात लोगोसाठी राज्यातील तरुणांना, युवकांना आवाहन करण्यात आले होते. या मध्ये पंढरपूर येथील पियुष कुमार पिंपळनेरकर यातरुणाने बाजी मारीत तृतीय क्रमांक पटकाविला. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते त्याचा गौरव करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, छगन भुजबळ व गिरीश महाजन आदी उपस्थित होते.

पुढील वर्षी नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे कुंभमेळा भरत आहे. यानिमित्त राज्य शासनाकडून विविध योजना, विकास कामेसुरू आहेत. दोन दिवसांपूर्वी त्रिंबकेश्वर येथे ध्वजाचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले. मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे बुधवारी (ता.१३) मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्या हस्ते बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. बोधचिन्हासाठी राज्यातील तरुणांना आवाहन करण्यात आले होते.

सुमारे ३ हजार तरुणांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. यात पियुषच्या लोगोला तिसरा क्रमांक मिळाला. त्यास राज्य शासनातर्फे १ लाख रुपये बक्षीस व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

#### पियुषच्या यशामुळे पंढरीच्या नावलौकीकात भर

पंढरपूर येथील पियुष पिंपळनेरकर यांनीहिंदू धर्माला अपेक्षित असलेल्या सर्व गोष्टीचा समावेश या 'बोधचिन्हा' मध्ये केलाहोता. या स्पर्धेत तब्बल तीन हजार स्पर्धक सहभागीझालेले होते. या तीन हजार स्पर्धेकांमधून पियुष याने बाजी मारीत पंढरीचा नावलौकीक वाढविला आहे.या स्पर्धेत पियुष कुमारपिंपळनेकर याला तिसऱ्या क्रमांकाचे सुमारेएक लाख रुपयांचे पारितोषिक मिळाले आहे.




**सोलापूर :** छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त टिळक चौक येथे छावा ग्रुप दीनानाथ शेळके मित्र परिवाराच्यावतीने स्त्री सन्मान देखावा केला आहे. (छाया : केवल तिवारी)

## उत्पन्न वाढीसाठी सेवाशुल्क, दरवाढीचा प्रस्ताव आता महापालिका सभेपुढे

**खोकेधारक, चारचाकी हातगाड्या आणि पथ विक्रेत्यांकडूनही होणार वसुल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**



शहरात कोणत्याही प्रकारचा सेवाशुल्क आणि कर-दरवाढ होणार नसल्याचा खुलासा पदाधिकाऱ्यांना करावा लागल्यानंतर मात्र आता महापालिका प्रशासनाकडून एक-एक करत सेवाशुल्क आणि दरवाढ करण्याच्या नियोजनाची सुरुवात झाली आहे. याम ध्ये पहिला फटका हा मंडई विभाग अंतर्गत येणाऱ्या विविध सेवा आणि भाजी विक्रेते तसेच रस्त्यावर विविध वस्तू, खाद्यपदार्थ आणि फळ विक्रेते यांना बसणार आहे. यामधून उत्पन्न वाढविण्याचे नियोजनही आखण्यात आले आहे.

सोलापूर महापालिकेची मे महिन्याची सर्वसाधारण सभा बुधवार २० मे रोजी बोलावण्यात आली आहे. या सभेपुढे मुख्य अजेंड्यामध्ये ७ विषय मान्यतेसाठी आले आहेत. यानंतर पुन्हा पुरवणी अजेंड्यामध्ये वेगळे विषय असणार आहेत. सोलापूर महापालिका प्रशासनापुढे सभागृहाने भांडवली कामांसाठी १८५ कोटी रुपयांचा तक्ता मंजूर करून दिला आहे. प्रशासनाने यासाठी ६१ कोटी रुपयांचा अंदाज व्यक्त केला होता. तब्बल १२५ कोटी रुपयांच्या या वाढीमुळे प्रशासन अस्वस्थ झाले आहे. अशावेळी मात्र पदाधिकारी नगरसेवकांनी सुचविलेल्या उत्पन्न वाढीच्या स्त्रोतातून मार्ग काढत प्रशासनाने देखील विविध विभागामधील सेवाशुल्क आणि कर-दरवाढ टप्प्याटप्प्याने करण्याचा निर्णय घेतला आहे. हे करताना प्रशासनाला महापालिका सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे.

महापालिका प्रशासनाने दरवाढीचा पहिला टप्पा मंडई विभागातून हाती घेतला आहे. महापालिकेच्या मंडई विभागांतर्गत येणाऱ्या विविध सेवा आणि शुल्कमध्ये सुधारणा करून उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने हा प्रस्ताव सादर केला आहे. महापालिका आयुक्त यांच्या ३० एप्रिल २०२६ रोजीच्या इतिवृत्तांतानुसार, शहरातील रस्त्यावरील फुटपाथवर बसणारे विक्रेते यांच्याकडून आकारल्या जाणाऱ्या शुल्कात वाढ करण्याबाबत सुचविले होते. या अनुषंगाने दैनिक भाजीपाला विक्री फी, बकरे व मोठ्या जनावरांची कटिंग फी, फुटपात वरील अनधिकृत खोके व चार चाकी हातगाड्यांवरील दंड फी यांचा समावेश आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मंडई विभागाला एक कोटी सत्तर लाख रुपये वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी विभागाने १ कोटी ४७ लाख ५० हजार ७९७ रुपयांची वसुली केली आहे. यानंतर सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात सर्वसाधारण सभेने मंडई विभागाच्या उद्दिष्टामध्ये वाढ करत ती २ कोटी ५० इतकी केली आहे. यामुळे विभागाला उत्पन्न वाढीसाठी आणि उद्दिष्टपूर्तीसाठी ही मोठी वाढ करण्यात येत असल्याचे स्पष्ट केले आहे. हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी पाठविला असून त्यावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात येणार आहे.

#### दंडात्मक पावतीमुळे कोणताही अधिकार नसल्याची अट

शहरात पथविक्रेता समिती स्थापन होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात ठोकेधारक व हातगाडी चालक यांच्याकडून दंडात्मक पावती घेणे योग्य ठरेल असे नमूद करतानाच या पावतीच्या आधारे संबंधित खोकेधारक अथवा हात गाडीच्या चालकांचा कोणताही अधिकार यामुळे निर्माण होणार नाही, या अटीच्या अधीन राहून प्रस्तावास मान्यता घेण्यासंदर्भातील प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे आला आहे.

#### अशी असणार मोठी दरवाढ...

- दैनिक भाजी विक्रेत्यांकडून दंडात्मक पावती– ५० रुपये
- बकरे कटिंग– ४० रुपये
- मोठ्या जनावरांची कटिंग फी– २००
- फुटपाथवर विनापरवाना व्यवसाय करणाऱ्या खोटेधारकांसाठी दंडात्मक पावती – दरमहा २ हजार रुपये
- चारचाकी हातगाड्यांसाठी दंडात्मक पावती – दरमहा १ हजार रुपये.



## ३१ मेपर्यंतच्या सेवानिवृत्त जागा समाविष्ट करा

**अतिरिक्त शिक्षक समायोजनामुळे भरतीवर मर्यादा येण्याची भीती; शिक्षक संघटनांचे प्रशासनाला निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ मे-**

राज्यातील नवीन संचमान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन सुरू असल्याने आगामी 'पवित्र' पोर्टल शिक्षक भरतीमध्ये रिक्त पदांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे ३१ मे २०२६ पर्यंत सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांच्या जागांचाही समावेश करून १०० टक्के पदभरती करावी, अशी मागणी विविध शिक्षक संघटनांनी केली आहे.

शिवयुनिट, शिक्षक एकता संघटना तसेच युवा शैक्षणिक व सामाजिक न्याय संघटना यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि महापालिका आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांची भेट घेऊन रिक्त पदांबाबत सविस्तर माहिती जाणून घेण्यात आली.

प्राथमिक शिक्षण विभागात मे अखेरपर्यंत सुमारे ४२० शिक्षक पदे जाहिरातीत समाविष्ट होण्याची शक्यता असून, माध्यमिक विभागात इयत्ता पाचवी ते दहावीसाठी सुमारे ३९० पदे उपलब्ध होऊ शकतात, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. यामध्ये कला, क्रीडा, कार्यानुभव तसेच बीएससी-बीएड प्रवर्गातील पदांचे प्रमाण अधिक असणार असल्याचे सांगण्यात आले.

कन्नड व उर्दू माध्यमासाठी मात्र एकही रिक्त पद उपलब्ध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्या ठिकाणी अतिरिक्त शिक्षकांची संख्या जास्त असल्याने भरतीची आवश्यकता नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. खासगी अनुदानित शाळांमध्येही अतिरिक्त शिक्षकांमुळे रिक्त पदे नसल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, शिक्षक भरतीसाठी पात्र उमेदवारांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने कमी पदभरतीमुळे हजारो भावी शिक्षकांच्या अडचणी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सध्या शिक्षक समायोजन आणि रोस्टर तपासणीची प्रक्रिया सुरू असून, ३१ मे २०२६ पर्यंत अधिकृत आकडेवारी स्पष्ट होईल. त्यानंतर 'पवित्र' पोर्टलवर जाहिराती प्रसिद्ध करण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने सुरू असल्याचे प्रशासनाने सांगितले.

#### प्रशासनाने बिंदूनामावली अद्ययावत करावी

राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी सांगितले की, नवीन संचमान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षकांचे प्रमाण वाढल्याने रिक्त जागा कमी होण्याची शक्यता आहे. मात्र मेअखेरपर्यंतच्या सर्व सेवानिवृत्त जागांचा समावेश केल्यास भरतीतील पदसंख्या वाढू शकते. मागासवर्गीय आणि इतर आरक्षण प्रवर्गातील अनुशेष भरून काढण्यासाठी सर्व रिक्त पदे तात्काळ 'पवित्र' पोर्टलवर प्रसिद्ध करावीत. प्रशासनाने बिंदूनामावली अद्ययावत करून अपलोड करणे आवश्यक आहे.

#### रिक्त पदांची संख्या वाढविणे गरजेचे

अभियोग्यताधारक अजय पवार यांनीही चिंता व्यक्त करताना सांगितले की, अंतिम संचमान्यतेनुसार जर जागा कमी आल्या किंवा अतिरिक्त शिक्षकांमुळे भरती मर्यादित झाली, तर अनेक उमेदवारांना रोजगारासाठी इतर जिल्ह्यांत जावे लागेल. स्थानिक पात्र उमेदवारांना आपल्या जिल्ह्यातच रोजगार मिळावा, यासाठी रिक्त पदांची संख्या वाढविणे गरजेचे आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### शिवम इंटरप्राईजेसच्या वतीने आजपासून कर्ज मार्गदर्शन अभियान

**सोलापूर, दि. १३ मे-**

येथील शिवम इंटरप्राईजेसच्या वतीने नितीन मोरे यांच्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत १४ मे २०२६ ते १९ फेब्रुवारी २०२७ दरम्यान कर्ज मार्गदर्शन अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानचा शुभारंभ गुरुवार दि. १४ मे रोजी वैभवशाली चेम्बर, हरि ओम ऑटोम ोबाईल्स जवळ, जुना पुणा नाका येथे करण्यात येणार आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या विविध योजनांची माहितीही लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. सन २०२३ पासून युवक, बेरोजगार, छोटे व्यावसायिक तसेच सर्वसामान्य नागरिकांना कर्ज योजनांविषयी माहिती, मार्गदर्शन व पात्रता प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्याचे काम करण्यात येणार आहे.

### सर्विस रोडवरील अपघातात पादचारी जखमी

**सोलापूर, दि. १३ मे-**

सर्व्हिस रोडने पायी निघालेल्या एका म जुराला धडक देवून गंभीर जखमी केल्याप्रकरणी अज्ञात मोटारसायकलस्वारा विरूद्ध जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हा अपघात पुणे-हैद्राबाद रोडवरील मसरे टाऊनशिप जवळ ११ मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता घडला. अंगद झुंबर धागतोडे (वय ४५ रा. न्यु बुधवार पेठ) असे जखमी पादचारी मजुराचे नाव असून या प्रकरणी सागर संजय सदाफुले (वय २५ रा. न्यू बुधवार पेठ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील जखमी मजूर सेंट्रींगचे काम करून कारंबा नाका ते तुळजापूर नाका या सर्व्हिस रोडने पायी जात असताना त्यांना मोटारसायकल (क्र.एमएच- ०५ ईडी-१२७८) ने धडक देऊन जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तपास सहायक फौजदार शेख करीत आहेत.




### बस स्टँड आवारात धडक; वृद्ध महिला गंभीर जखमी

**सोलापूर, दि. १३ मे-**

वृद्ध महिलेस धडक देवून गंभीर दुखापत केल्याप्रकरणी दुचाकी स्वार (क्र.एमएच-१३ डीएल-०५३०) विरूद्ध फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हा अपघात ९ मे २०२६ रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास एसटी स्टॅन्ड प्लॅटफॉर्म क्र.२२ समोर घडला होता. सचिन नागनाथ वाकसे (वय ४० रा. सलगरवाडी डोणगाव रोड, सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव असून याबाबत पुजा धम्मपाल शिंदे (वय ३२ रा. न्यू बुधवार पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादीच्या आजी राधाबाई गोपीनाथ मस्के (वय ६८) या नऊ मे रोजी दुपारी पायी चालत बस स्थानक आवारातून जात असताना वरील आरोपी दुचाकी स्वाराने धडक दिली. त्यात त्या जखमी होऊन त्यांच्या पायाचे हाड फ्रॅक्चर झाल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. हवालदार भद्रशेट्टी हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### फकीरा चौकातील बंद घर फोडून ५० हजारांचा ऐवज लंपास

**सोलापूर, दि. १३ मे-**

बंद घराचा कडी कोयंडा उचकटून अज्ञात चोरट्याने कपाटातील रोख रक्कम व सोन्याची कानातील बाली असा एकूण ५० हजाराचा ऐवज चोरून नेल्याची घटना न्यु बुधवार पेठ, फकीरा चौक येथे ५ में रोजी सकाळी सात वाजता उघडकीस आली. या प्रकरणी रेखा दीपक जाधव (रा. न्यु बुधवार पेठ) यांनी फिर्याद दिली असून या प्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी या ४ मे रोजी रात्री ९ वाजता घराला कुलूप लावून बाहेर गेल्या असता पहाटेच्या अज्ञात वेळी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या बंद घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला व कपाटातील चाळीस हजार रुपये रोख आणि दोन ग्राम वजनाचे सोन्याचे कानातील बाली चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. हवालदार आरेनवरू हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.



# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आज सोलापूर दौऱ्यावर


**पुणे ते फलटणपर्यंत बसमधून प्रवास**

**पंढरपूर व खुडूस येथील पुरातन बारवची (विहीर) पाहणी करणार**

**तभा वृत्तसेवा । ओंकार आडत**
**वेळापूर, दि. १३ मे-**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महाम ार्ग मंत्री नितीन गडकरी हे गुरुवार १४ मे रोजी पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते विविध राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचे निरीक्षण आणि भूमिपूजन करणार आहेत.


मंत्री गडकरी हे सकाळी ८:३० वाजता पुण्यातील हॉटेल जे.डब्ल्यू. मॅरियट येथून हडपसरकडे रवाना होतील. त्यानंतर दिवे घाट मार्गे जेजुरी आणि पुढे फलटणला भेट देतील. सकाळी ११:०० वाजता ते 'नीरा कॅनल ब्रिज'ची पाहणी करून दुपारी १२:०० वाजता प्रसारम ाध्यमांशी संवाद साधतील.



फलटणहून नातेपुते आणि वेळापूर मार्गे ते दुपारी २:०० वाजता पंढरपूरला पोहोचतील. दरम्यान खुडूस (ता.म ाळशिरस) येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेल्या पुरातन बारव (विहीर) याठिकाणी तसेच बाजीराव विहीर पंढरपूर येथेही पाहणी करून पुढे ते श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात जाऊन दर्शन घेतील. त्यानंतर माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या निवासस्थानी दुपारचे भोजन व विश्रांती होईल. दुपारी ४:४० वाजता ते हेलिकॉप्टरने पंढरपूरहून अक्कलकोटसाठी रवाना होतील. अक्कलकोट येथे श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान आणि शिवपुरीला भेट दिल्यानंतर, संध्याकाळी ६:३० वाजता सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांच्या भूमि पूजन सोहळ्याला उपस्थित राहतील.

### खुडूसच्या विहिरीला श्रद्धेचे आणि अभिमानाचे स्थान

घुलेनगर, खुडूस (ता. माळशिरस) येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या काळातील ही ऐतिहासिक विहीर असून ती पु. अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेल्या अनेक लोकोपयोगी कामांपैकी एक मानली जाते. पु. अहिल्यादेवींनी आपल्या कारकिर्दीत पांथस्थांची आणि ग्रामस्थांची तहान भागवण्यासाठी ठिकठिकाणी बारवा आणि विहिरींचे जाळे विणले होते, त्यातीलच ही एक महत्त्वाची वास्तू आहे. या विहिरीचे बांधकाम वैशिष्ट्यपूर्ण अशा दगडी चिऱ्यांमध्ये केलेले असून आजही ते अत्यंत भक्कम स्थितीत आहे. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुका हा होळकरकालीन इतिहासाचा साक्षीदार आहे. खुडूस आणि आसपासच्या परिसरातील ही विहीर स्थानिक लोकांसाठी श्रद्धेचे आणि अभिमानाचे स्थान आहे. अनेक दशकांनंतरही ही विहीर अस्तित्वात असून, ती परिसरातील ऐतिहासिक जलव्यवस्थापनाचा एक उत्तम नमुना मानली जाते.



मंत्री गडकरी यांना 'Z+' श्रेणीची सुरक्षा असून या दौऱ्यात सीआरपीएफचे पथक त्यांच्या सोबत असेल. या दौऱ्यात पुण्यापासून फलटणपर्यंत साधारण ७० माध्यम प्रतिनिधी दोन बसमधून सोबत असणार आहेत. मंत्री गडकरी यांचा रात्रीचा मुक्काम सोलापूर येथील हॉटेल बालाजी सरोवर प्रीमियर येथे असेल.

# बार्शी व पांगरी रुग्णालयाच्या ट्रॉमा सेंटरसाठी हालचाली

**मंत्री इंद्रनील नाईक यांचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांना पत्र**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ मे-**

तालुक्यात वाढत असलेल्या अपघातांच्या घटना आणि खासगी रुग्णालयांकडून आकारल्या जाणाऱ्या भरमसाठ बिलांच्या पार्श्वभूमीवर अपघातग्रस्तांना तातडीची उपचार सुविधा सरकारी स्तरावर उपलब्ध व्हावी, यासाठी मंत्रालयीन स्तरावर हालचालींना वेग आला आहे.

ग्रामीण रुग्णालय पांगरी येथे ट्रॉमा सेंटर मंजूर करण्यासाठी प्रयत्न सुरु असून, यासाठी राज्याचे मंत्री इंद्रनील नाईक यांनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांना पत्र पाठवत आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती केली आहे. मंत्रालयात ग्रीन सिग्नेचरचा वेगळाच संकेत मानला जातो. त्यामुळे हिरव्या पेनने केलेल्या सहीसह हे पत्र पाठवण्यात आल्याची चर्चा आहे.

रा.यु.को. प्रदेश सचिव शिरीष ताटे यांनी बार्शी येथील



शासकीय उपजिल्हा रुग्णालयात जळीत आणि भाजलेल्या रुग्णांसाठी बर्न केअर युनिट तसेच अपघातग्रस्तांसाठी ट्रॉमा सेंटर सुरु करण्याची मागणी केली होती. याचबरोबर ग्रामीण रुग्णालय पांगरी येथेही ट्रॉमा सेंटर मंजूर करण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत मंत्री इंद्रनील नाईक यांनी मंत्रालयातून आरोग्य मंत्र्यांना पत्र पाठवून आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यामुळे बार्शी तालुक्यातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. दरम्यान, उपजिल्हा रुग्णालयाचे कामही सध्या वेगाने सुरु असल्याची माहिती समोर येत आहे.

# 'डब्ल्यूआयटी'चे अभिनव संशोधन पेटंट; ऊर्जा बचतीच्या दिशेने ठोस पाऊल




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ मे-**

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (डब्ल्यू.आय.टी.) येथील मेकॅनिकल अँड ऑटोमेशन इंजिनिअरिंग विभागाने संशोधन आणि नवोपक्रम क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत यशाचा आणखी एक मानाचा तुरा आपल्या शिरपेचात रोवला आहे. विभागातील संशोधकांनी विकसित केलेल्या फूड कुकिंग अपॅरॅटस विथ वॉटर हीटिंग अरेंजमेंट या अत्याधुनिक व उपयुक्त उपकरणाचे पेटंट प्रकाशित झाले आहे.

या संशोधनात डब्ल्यू.आय.टी. चे संशोधन व विकास अधिष्ठाता डॉ. श्रीशैलप्पा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मेकॅनिकल अँड ऑटोमेशन इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. भाग्येश देशमुख यांच्यासह प्रा. ए.एन. सुरडे, प्रा. जी.बी. आगलावे, प्रा. जी.एन. सामलेती, प्रा. डी.डी. मसलेकर, प्रा. एन.के. कुलकर्णी, प्रा. वाय.एन. जंगले, प्रा.एस. एस. बिराजदार आणि प्रा. एस.एस. देशमुख यांनी सहभाग नोंदविला आहे.

या संशोधनामागील प्रमुख उद्दिष्ट म्हणजे स्वयंपाक प्रक्रिया अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि ऊर्जा-बचत करणारी बनविणे होय. पारंपरिक पद्धतीत उष्णतेचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत असताना, या नवकल्पनेत अन्न शिजवताना निर्माण होणारी उष्णता पाणी गरम करण्यासाठी उपयोगात आणण्याची अभिनव यंत्रणा विकसित करण्यात आली आहे. त्यामुळे उष्णतेचा पुनर्वापर साध्य होऊन इंधन व ऊर्जेची लक्षणीय बचत होण्यास मदत होते. ऊर्जा वाचते, खर्च कमी होतो आणि पर्यावरणालाही हातभार लागतो. घरगुती वापर, लघुउद्योग, कॅन्टीन, ग्रामीण भागातील स्वयंपाक व्यवस्था तसेच सामुदायिक भोजन प्रकल्पांसाठी हे उपकरण अत्यंत उपयुक्त ठरण्याची दाट शक्यता आहे. ऊर्जा कार्यक्षमतेसह पर्यावरणपूरक दृष्टीकोन जपत, हे संशोधन शाश्वत विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा ठरू शकते.

या उल्लेखनीय यशाबद्दल वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त वैभव गांधी, भूषण शहा, पराग शहा, प्राचार्य डॉ. सचिन गेंगजे तसेच सर्व प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.




# कविवर्य माधव पवार यांचे साहित्य क्षेत्रात आदराचे स्थान होते

**तेलुगु भाषा अभिवृद्धी ग्रंथालयमच्या वतीने श्रद्धांजली**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ मे-**

येथील तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयमच्या वतीने ज्येष्ठ कविवर्य माधव पवार यांच्या प्रतिमेचे पूजन व द्वीप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले.

या श्रद्धांजली सभेत ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र भोसले यांनी माधव पवार यांच्या मैत्रीच्या आठवणी जागृत केल्या. दत्तात्रय इंगळे यांनी माधव पवार यांच्या स्मरणार्थ विचार शिदोरी ही अभंग रचना सादर केली. राजश्री जाधव यांनी माधव पवार यांच्या आठवणीची चमकता तारा कविता सादर केली. ॲड. श्रीनिवास क्यातम यांनी माधव पवार यांचा झालेला भेट याची विस्तृत माहिती दिली. चंद्रकांत यनगुंडी यांनी माधव पवार यांचा मिळालेला शब्बासकी याबद्दल आठवण सांगून कविता सादर केली. कवी प्रा.नरेंद्र गुंडेली यांनी माधव पवार यांचा मिळालेला चार वर्षाचा सहवास व मार्गदर्शन कथन करून बोलविता देव मला ही कविता सादर केली. अय्युब नल्लामंदू यांनी माधव पवार यांचा साहित्य क्षेत्रातील आदराचे स्थान व त्यांचे स्नेहाचे बोल सांगून एक शेरोशायरी प्रस्तुत केली. ग्रंथालयाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम यांनी तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालय येथे माधव पवार यांच्या झालेल्या कवी संमेलनाच्या आठवणी जागृत केल्या. कवियित्री रेणुका बुधारम यांनी माधव पवार यांच्याशी असलेला स्नेह व त्यांचा मिळालेला आशीर्वाद याच्या आठवणी जागृत केल्या. प्रभाकर भिमनाथ यांनी माधव पवार यांचे वकृत्व व नवदितांचे मार्गदर्शक याबद्दल आपले मत व्यक्त केले.

या शोकसभेचे आभार सचिव तिपण्णा गणेरी यांनी म ानले. या कार्यक्रमास ग्रंथालयाचे कार्याध्यक्ष बालराज बोल्ली, ग्रंथपाल विजयालक्ष्मी गुडूर, किसन आडम, वासुदेव आडकी, देविदास कोनापुरे, अजय सुदामनी, विजयकुमार सोनवणे, विठ्ठल टाक, सुरेश निकंबे, रेखा मगर मेलगे, पुरुषोत्तम बुधारम व आदी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# विनंती बदल्यांवर झेडपी कर्मचाऱ्यांचा संताप

## ८९ अर्जांपैकी फक्त एकालाच मंजुरी

**प्रशासकीय बदल्यांना मुहूर्त पण कर्मचाऱ्यांत नाराजीचा सूर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ मे-**

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय व विनंती बदल्यांच्या प्रक्रियेला अखेर मंगळवारी सुरुवात झाली. मात्र विनंती बदल्यांमध्ये केवळ एका कर्मचाऱ्याचा अर्ज मंजूर झाल्याने कर्मचाऱ्यांम ध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या निर्णयाविरोधात कर्मचारी संघटनांनी बुधवारी जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन लेखी निवेदन देण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या मार्गदर्शनाखाली ही बदली प्रक्रिया राबविण्यात आली. वेळापत्रकानुसार प्रक्रिया सायंकाळी उशिरा सुरू झाल्याने कर्मचारी दिवसभर ताटकळत थांबले होते. समायोजन पद्धतीने सात संवर्गातील २० प्रशासकीय तर केवळ पाच विनंती बदल्या करण्यात आल्या.

सामान्य प्रशासन विभागात १२ प्रशासकीय व एक विनंती बदली, महिला व बालकल्याण विभागातील अंगणवाडी पर्यवेक्षिका संवर्गात पाच प्रशासकीय व एक विनंती बदली करण्यात आली. प्राथमिक शिक्षण विभागात शिक्षण विस्तार अधिकारी संवर्गात एक विनंती बदली तर केंद्रप्रमुख संवर्गात एक प्रशासकीय व दोन विनंती बदल्या झाल्या. वरिष्ठ सहाय्यक संवर्गात दोन प्रशासकीय बदल्यांचे आदेश देण्यात आले. विनंती बदल्यांसाठी तब्बल ८९ कर्मचाऱ्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी फक्त एक अर्ज मंजूर करण्यात आला, तर उर्वरित अर्ज फेटाळण्यात आले. त्यामुळे बदलीसाठी आलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. कर्मचारी संघटनांच्या बैठका घेऊन प्रशासनाच्या भूमिकेविरोधात आंदोलनात्मक भूमिका घेण्याचे संकेत देण्यात आले आहेत.



### बदली प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव

माजी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी यापूर्वी पारदर्शक बदली प्रक्रिया राबवून कर्मचाऱ्यांचा विश्वास जिंकला होता. अनेक वर्षे एकाच जागी ठाण मांडून बसलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांनी हलवले होते. त्यांच्या काळात बदली प्रक्रियेनंतर एकही मोठी तक्रार आली नव्हती. मात्र यंदाच्या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव जाणवल्याची भावना कर्मचाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

### मुख्यालयात येण्याची प्रतीक्षा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अन्याय?

काही कर्मचाऱ्यांनी पंचायत समितीत बदली किंवा पदोन्नती घेतल्यानंतर पुन्हा मुख्यालयात नियुक्ती मिळवल्याचा मुद्दा चर्चेत आला आहे. जवळपास ३० अशा नियुक्त्या झाल्याचा आरोप कर्मचारी संघटनांनी केला असून, त्यामुळे पंचायत समितीतून मुख्यालयात येण्याची प्रतीक्षा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त होत आहे. विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव कोणी पाठवले, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

# सोनोग्राफी न करता थेट पोटाची शस्त्रक्रिया केल्याने महिलेचा मृत्यू

**जय संतोषी हॉस्पिटलचे डॉक्टर, व्यवस्थापक, बाउन्सर विरूद्ध एक वर्षानंतर गुन्हा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

दवाखान्यात ॲडमीट करण्यात आलेल्या रुग्ण महिलेची सोनोग्राफी न करता थेट शस्त्रक्रिया करून तिच्या मृत्युस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एसटी स्टँड जवळील जय संतोषी हॉस्पिटलच्या डॉक्टरसह तिघांविरूद्ध घटनेच्या तब्बल एक वर्षानंतर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

डॉ. शरणबसप्पा मल्लिकार्जून दामा,दवाखान्याचा व्यवस्थापक आणि बाऊन्सर (सर्व रा. सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत अर्जून ज्ञानेश्वर कांबळे (वय ३२, रा. गणेश नगर, मडकी वस्ती सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादीची आई जयमाला कांबळे (वय ५४ ) यांना पोट दुखीचा आजार होता. त्यामुळे ६ जून २०२५ रोजी त्यांना




संबंधित हॉस्पीटलमध्ये ॲडमीट केले होते. ७ जून २०२५ रोजी डॉ. शरणबसप्पा दामा यांनी जयमाला कांबळे यांच्या पोटाची सोनोग्राफी केली नाही. थेट शस्त्रक्रीया करून उपचारादरम्यान हलगर्जीपणा केला. त्यानंतर त्यांना ११ जून रोजी नवनित हॉस्पिटल येथे उपचारासाठी पाठवले. त्यानंतर तेथुनही १३ जून रोजी पुढील उपचारासाठी शासकीय रूग्णालयात पाठवण्यात आले. मात्र, तेथे १४ जून २०२५ रोजी जयमाला कांबळे यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी डॉ.शरणबसप्पा दामा हे मृत्यूस कारणीभूत ठरले आहेत. या प्रकारानंतर फिर्यादी हे जाब विचारण्यासाठी हॉस्पिटलमध्ये गेले असता त्यांना तेथील व्यवस्थापक व बाऊन्सरने शिवीगाळ करून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस निरीक्षक महादेव राऊत हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी -१४४०

**तैसा आम्हां झाला भाव ।**
**अंगी जडोनि ठेला देव ।।**

आप-पर ही वृत्ती अनेक समस्यांना जन्म देते, हे सत्य असले तरी बोटावर मोजता येईल एवढे महात्मे सोडले तर जवळपास प्रत्येकाकडे थोड्याफार प्रमाणात का होईना पण आप-पर ही वृत्ती असल्याचे दिसून येते. आप-पर वृत्ती जोपासणारा माणूस जीवात ऐक्य पाहू शकत नाही. हा आपला, तो परका, हे माझे, ते त्याचे अशा विचारधारेत जगणारा माणूस इतरांना आपले करण्यात व आपण इतरांचे होण्यात खऱ्या अर्थाने यशस्वी होत नाही. त्याचे मूळ कारण म्हणजे भेदजन्य वृत्तीमुळे तो स्वत:चा राहात नाही. त्यामुळे तो इतरांचा होण्याचा किंवा इतर त्याचे होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. पण आपल्या बाबतीत म्हणजे तुकाराम महाराजांच्या बाबतीत असे घडले नाही. कारण आपण समचरणी उभ्या असलेल्या व समाजाला समता, बंधुता, निस्वार्थ प्रेमाचा संदेश देणाऱ्या पांडूरंगाच्या कृपेने स्वत:ला खऱ्या अर्थाने ओळखू शकलो आहोत. स्वत:ला स्वत:ची खरी ओळख झाल्याने सर्व जीवमात्रात भगवंताला पाहण्याची दृष्टी मिळाली आहे. सर्व जीव हेच ईश्वर असण्याची जाणीव झाल्याने आपण त्यांच्यापासून, त्यांच्या सेवेपासून वेगळे होऊच शकत नाही. जसा सूर्य आणि त्याची किरणे मूळात एकच आहेत त्याप्रमाणे आपण व जीवमात्ररुपी भगवंत एकच आहोत याची खात्री पटली आहे. या अनुभवाच्या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात



**तैसा आम्हा झाला भाव । अंगी जडोनि ठेला देव ।।**

ईश्वराचे होण्यासाठी प्रथम आपण आपले झाले पाहिजे. आपण आपले होणे म्हणजे नाशवंत देहाला मी समजणे नव्हे. नाशीवंत देहाला मी समजण्यामुळे माणूस स्वत:पासून दूर जात आहे. या देहाचे, इंद्रियाचे लाड करण्याच्या नादात माणूस मानवता विसरत आहे. मानवाची ही अमानवता केवळ समाजाला अनुभवायला मिळत आहे, असे नव्हे तर त्याच्या कुटूंबालाही अनुभवायला मिळते आहे. आपल्या आई-वडिलांशी, बंधू-भगिनीशी नीट न बोलणे, लहान-सहान घटनेवरून वाद विवाद करणे इत्यादी अमानवतेचेच लक्षण आहे. ही अमानवता आपणाला माणूसकीपासून दूर नेते. जेथे माणुसकी नाही, तेथे समत्व राहण्याचा प्रश्नच नाही. अनेक जीवांशी ऐक्य पावण्याकरीता समत्व असावेच लागते. आपण कोण आहोत? आपण काय करायला हवे? आपण काय व का करीत आहोत? या प्रश्नांची उत्तरे मिळविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे स्वपरीचयाकडे वळणे होय. एकदा का खरा स्वपरिचय झाला की मग जन वेगळे वाटण्याचा प्रश्न राहत नाही. सर्व जीव आपल्या प्रमाणे एका ईश्वराचे अंश आहेत. सर्व जीवांना सारखा अधिकार आहे. असे बरेच कांही सकारात्मक वाटू लागते. ही सकारात्मकता रिक्त हाताने आलो तसे रिक्त हातानेच जावे लागते याची आठवण देते. ही आठवण नको ती जमवा जमव करण्यापासून म्हणजे अमानवतेपासून आपणाला परावृत्त करणे. अर्थात सर्व जीवांशी ऐक्य साधण्याचा मार्ग मोकळा होतो.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरूवार,
दि. १४ मे २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - वैशाख, कृ. द्वादशी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- रेवती (२३.३३)
योग - प्रिती (१७.५३)
करण - गरज (२२.००)
राहू काल : गुरूवार
दु. १.३० ते ३.००

दिनविशेष : १९४०: दुसरे महायुद्ध - हॉलंडने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९६०: एअर इंडियाने आपली पहिली मुंबई ते न्यूयॉर्क विमानसेवा सुरू केली.
१९६३: कुवेत देशाचा संयुक्त राष्ट्रसंघात (UN) प्रवेश
१९९७: इंदिरा गांधी भारतीय महिला विकास सहकारी साखर कारखाना - देशातील आणि महाराष्ट्रातील पहिल्या महिला सहकारी साखर कारखान्याची नोंदणी.

# सोलापूर विद्यापीठात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु

## बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना थेट प्रवेशाची संधी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध नाविन्यपूर्ण पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रम नव्याने सुरू झाल्याची माहिती प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी दिली.

**पदवी अभ्यासक्रमांतर्गत प्रवेश**

पदवी अभ्यासक्रमांतर्गत बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स, एन्व्हायर्नमेंटल सायन्स), तसेच बी.एस्सी. फार्मास्युटिकल अँड फाईन केमिकल टेक्नॉलॉजी, बी.एस्सी इसीएस (एनटायर कम्प्युटर सायन्स) यांसारख्या अभ्यासक्रमांसाठी बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. बीसीए, बीबीए अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटीद्वारे प्रक्रिया सुरू आहे. फाईव्ह इयर इंटिग्रेटेड एम टेक इन कॉस्मेटिक टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमासाठीही प्रवेश देणे चालू आहे.

अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (अंतर्गत बी.एस्सी. (फार्मास्युटिकल मॅन्युफॅक्चरिंग अँड क्वालिटी), पेंट टेक्नॉलॉजी, शुगर टेक्नॉलॉजी, टेक्सटाइल डिझाईन तसेच बी.कॉम. (BFSI) व बी.ए. (मीडिया अँड मास कम्युनिकेशन) अभ्यासक्रमांना देखील थेट प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला तसेच विद्यापीठातील संकुलना भेट द्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**प्रवेश परीक्षेद्वारे मिळणारे पदव्युत्तर अभ्यासक्रम**

प्रवेश परीक्षेद्वारे एम.एस्सी.केमिस्ट्री (पॉलिमर, ऑरगॅनिक, इंडस्ट्रियल, मेडिसिनल), एम.एस्सी कम्प्युटर सायन्स, मॅथेमॅटिक्स, स्टॅटिटिक्स, बायो-स्टॅटिस्टिक्स, मायक्रोबायोलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, बायोइन्फॉमटिक्स), एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक सायन्स, फिजिक्स, अप्लाइड इलेक्ट्रॉनिक्स/मटेरियल सायन्स एनर्जी स्टडीज, एन्व्हायरमेंटल सायन्स तसेच एम.ए. (मास कम्युनिकेशन) आदी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश दिला जाणार आहे. त्यासाठी रोजी ऑनलाईन प्रवेश पूर्व परीक्षा होत आहे.

या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता तज्ञ मार्गदर्शक, सुसज्ज ग्रंथालय, क्रीडांगणे तसेच विद्यार्थ्यांना निवासासाठी वस्तीगृहाची देखील सोय राहणार आहे. विद्यापीठाच्या www.sus.ac.in संकेतस्थळावरून देखील अधिक माहिती घेता येणार आहे.

यासाठी विद्यार्थी व पालकांना विद्यापीठात भेट देता येणार आहे. या पत्रकार परिषदेत डॉ. गौतम कांबळे, डॉ. विकास पाटील, जनसंपर्क अधिकारी राहुल वंजारे, डॉ. अंबादास भासके आदी उपस्थित होते.

### थेट प्रवेश प्रक्रियेचे पदव्युत्तर अभ्यासक्रम

तसेच विद्यापीठ संकुलातील काही अभ्यासक्रमांसाठी थेट प्रवेश (Direct dmission) प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यामध्ये एम.एस्सी. अप्लाइड जिओलॉजी, जिओ इन्फॉर्मेटिक्स, एम.ए. प्राचीन भारतीय इतिहास व पुरातत्त्वशास्त्र, ग्रामीण विकास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, मानसशास्त्र या अभ्यासक्रमांना थेट प्रवेश देण्यात येणार आहे. एम ए (मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, उर्दू, पाली, प्राकृत आणि कन्नड), एम ए (म्युझिक, ड्रामा, तबला) एम ए योगा याही अभ्यासक्रमांना थेट प्रवेश होणार आहे. एम.कॉम., एमबीए (सीईटीद्वारे), एमसीए (सीईटीद्वारे) तसेच पाच वर्षांचा इंटिग्रेटेड एम.टेक. (कॉस्मेटिक टेक्नॉलॉजी) हेही अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

## महिलेवर वारंवार अत्याचार करून केले गर्भवती

### इसमावर बलात्काराचा गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १३ मे-**

ओळखीचा फायदा घेत एका महिलेस वेगवेगळ्या हॉटेल व लॉजवर नेऊन लैंगिक अत्याचार करून गर्भवती केल्याप्रकरणी सोलापूर शहरातील एका इसमा विरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अविनाश पार्श्वनाथ गडदे (वय ४३ वर्ष, रा. सलगर कॉपलेक्स, नवी पेठ, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. वरील आरोपीने यातील पीडित महिलेशी ओळखीचा फायदा घेऊन तिला २०२१ ते २०२४ या कालावधीत शहरातील नवीपेठ, कोरे गाव पार्क , पुणे, दादर येथील वेगवेगळ्या हॉटेल, लॉज व मुंबई येथे नेऊन वारंवार अत्याचार केला. शिवाय गर्भवती केल्यानंतर जबदरस्तीने गर्भपाताच्या गोळ्या दिल्या. तसेच अनैसर्गिक रित्या संबंध करून मारहाण करत, ऑफिसमध्ये बदनामी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सुरुवातीस याबाबत ची फिर्याद पीडित महिलेने मुंबई येथे दिली होती. सदरचा गुन्हा मुंबईहून सोलापुरात वर्ग करण्यात आला असून फौजदार पाटोळे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत करत आहेत.



## जीवनज्योत प्रशालेचे दहावी परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

कंदलगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील जीवनज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेतील विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी व बारावी (कला शाखा) बोर्डाच्या परीक्षेत उज्वल यश संपादन केले.

इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल ७३.६८ टक्के लागला असून शिवानी जाधव हिने ८७.४० टक्के प्रथम, महेक शेख हिने ८४.६० टक्के द्वितीय तर ऋतुजा यलगोंडे हिने ८२.८० टक्के गुण प्राप्त करत तृतीय क्रमांक पटकाविला. तर इयत्ता बारावी कला शाखेचा निकाल ७१.९३ टक्के लागला. यामध्ये कु. प्रतीक्षा विठ्ठल वाघमोडे हिने ८५.६७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. ऐश्वर्या जमादार हिने ७४.१७ टक्के तर अक्षता डोळ्ळे हिने ७३.०० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकाविला. या यशाबद्दल सोलापूर जिल्हा सम ाजसेवा मंडळ संस्थेचे अध्यक्ष मा. पी. एल. कोळी, उपाध्यक्ष डॉ. चनगोंडा हविनाळे, उपाध्यक्ष संदेश कोळी, सचिव एम. डी. कमळे, सहसचिव सुबोध कोळी, विश्वस्त नागेश बिराजदार व संसथेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य पी. एम. कमळे, पर्यवेक्षक आर. बी. यलगोंडे, सरपंच शारदा कडते, शाळा व्यवस्थापन समिति उपाध्यक्ष संजय कोले, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ जोकारे, विश्वनाथ जोकारे यांनी अभिनंदन केले.

## 'प्रोग्रेसिव्ह'ची आयेशा काझी दहावीच्या परीक्षेत तृतीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**



प्रतिकूल परिस्थितीवर मात करत दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी उर्दू हायस्कूलमधील विद्यार्थिनी आयेशा अबिदुल्ला काझी हिने दहावीच्या परीक्षेत ९३.८० टक्के गुण मिळवून शाळेत तृतीय क्रमांक पटकावला आहे. आर्थिक अडचणी असूनही आयेशाने जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हे यश संपादन केले. तिच्या या यशामुळे कुटुंबीयांसह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून तिचे अभिनंदन होत आहे. या यशाबद्दल शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक व मित्रपरिवाराकडून विशेष कौतुक करण्यात येत आहे. प्रतिकूल परिस्थिती असली तरी मेहनत, आत्मविश्वास आणि ध्येयाची जिद्द असेल तर यश नक्की मिळते, हे आयेशाने आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. मुख्याध्यापक गफूर सगरी यांचे मार्गदर्शन लाभले.



## शालांत परीक्षेतील यशवंतांचा डॉ.आंबेडकर प्रशालेत गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशालेतील माध्यमिक शालांत परीक्षेत यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

हा कार्यक्रम शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विष्णू गायकवाड व प्रशालेचे मुख्याध्यापक महादेव यादव यांच्या हस्ते पार पडला. प्रशालेचा या परीक्षेत शंभर टक्के निकाल लागल्याने संस्थेचे कार्याध्यक्ष लक्ष्मण माने यांनी विद्यार्थ्यांचे तसेच शिक्षकांचे अभिनंदन केले.

याप्रसंगी विष्णू गायकवाड तसेच मुख्याध्यापक महादेव यादव यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करीत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक साहेबराव शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन रवी देवकर यांनी केले तर किरण गायकवाड यांनी आभार मानले.

## गांजा तस्करी प्रकरणी आरोपींना पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १३ मे-**

मंगळवेढ्यातील गांजा तस्करी प्रकरणी पोलिसांनी शाहूअली रतिलाल धावड, सुर्यकांत भागवत भाकरे, ब्रह्मदेव दादासो जुगदर, जब्बार हमजेखान मुल्ला या चार आरोपींना पंढरपूर जिल्हा सत्र न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान या प्रकरणातील सौरभ इंगोले (रा. औंढी) हा मात्र अद्यापही फरार आहे. ९ मे रोजी सायंकाळी ४.२५ वाजता बेगमपूर येथून आरोपी शाहूअली धावड हा मोटर सायकलवरुन ब्रह्मपुरी गावच्या सर्व्हिस रोडवरुन अंमली पदार्थ अर्थात गांजा घेवून जात असताना पोलिसांनी पकडले होते. अधिक तपासात पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर यांनी घटनेतील ४ आरोपींना तात्काळ अटक केले. त्यांना पंढरपूर येथील जिल्हा सत्र न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने १४ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. फरार आरोपी सौरभ इंगोले



## रेल्वे रुग्णालयात परिचारिका दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने, आरोग्य सेवा आणि रुग्णसेवेमध्ये परिचारिका (नर्सिंग) क्षेत्रातील व्यावसायिकांच्या अमूल्य योगदानाची दखल घेत, १२ मे रोजी येथील डॉ. कोटणीस स्मृती रेल्वे रुग्णालयात आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन साजरा केला.

आधुनिक नर्सिंग क्षेत्राच्या प्रणेत्या, फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी १२ मे रोजी आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन साजरा केला जातो. या कार्यक्रमाची सुरुवात, नुकतीच सेवेत रुजू झालेली सर्वात कनिष्ठ परिचारिका कर्मचारी शफाकत अली यांच्या हस्ते केक कापून करण्यात आली.

मुख्य नर्सिंग अधीक्षक सुवर्णा कृष्णन यांनी या वर्षाच्या संकल्पनेचे महत्त्व विशद केले आणि प्रेमळ व दर्जेदार आरोग्य सेवा पुरवण्यात परिचारिका बजावत असलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भर दिला. याप्रसंगी DMO डॉ. विनोद आणि DMO डॉ. रतन मेखला यांनीही भाषण केले. हा कार्यक्रम सोलापूर येथील डॉ. कोटणीस स्मृती रेल्वे रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. जी. एस. मंजुनाथ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला होता.

डॉ. मंजुनाथ यांनी याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून व्याख्यान दिले. यामध्ये त्यांनी आधुनिक आरोग्य सेवेमध्ये परिचारिकांची बदलती भूमिका अधोरेखित केली आणि भारतीय रेल्वेची आरोग्य सेवा प्रणाली बळकट करण्यासाठी नर्सिंग कर्मचाऱ्यांनी केलेल्या अथक प्रयत्नांचे कौतुक केले. सूत्रसंचालन CNS यशवंत शर्मा यांनी अत्यंत खुबीने केले, तर NO सी. व्ही. साखरे यांच्या नेतृत्वाखाली CNS प्रदीप यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



## जि.प. कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १३ मे-**

जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था नियमित नं.१ या पतसंस्थेच्या ९२व्या वर्धापन दिनानिमित्त संस्थेचे कार्यालयात जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य, उपाध्यक्ष इंदजित पवार, कृषी व पशुसंवर्धन सभापती रामप्पा चिवडशेटटी, सभापती महिला व बाल कल्याण ॲड अमृता बाये यांचा संस्थेतर्फे सत्कार केला.

या वेळी संस्थेचे मार्गदर्शक पंडीत भोसले यांनी संस्थेची माहीती विषद केली. संस्थेची प्रगती चांगली आहे. संस्थेमधे राजकारण येऊ देऊ नका असे प्रतिपादन उपाध्यक्ष श्री पवार यांनी यावेळी विषद केले.

याप्रसंगी संस्थचे मार्गदर्शक पंडीत भोसले, दयानंद परिवार संस्थेचे चेअरमन श्रीधर कल्लोटटी संचालक डॉ. एस पी. माने, विशाल घोगरे, चेतन वाघमारे, शिवाजी राठोड, शहाजहान तांदोळी, शिवानंद म्हमाणे, रोहित पुले माजी तज्ञ संचालक श्रीशैल देशमुख, तजमुल मुतवल्ली तसेच सभासद अमित सत्वगर, आर. वी. हव्यु, विलास मसलकर, ज्यातीलिंग कारंडे, सिधराम बोरूटे, यतिराज जाधव, अतुल गायकवाड आदी उपस्थित होते.

कार्यकमाचे सुत्रसंचलन डॉ. एस. पी. माने यांनी केले. श्रीगल देशमुख यांनी आभार मानले.

## नरोटेवाडी गाव उत्तुंग झेप घेईल: आनंद मिरकले

### मुख्यमंत्री समृद्ध गाव समितीकडून विकास कामाची प्रशंसा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात गावो-गावच्या नागरिकांनी दिलेले योगदानामुळे गावे समृद्धीचे दिशेने जात असून नरोटेवाडी गावाने केलेले काम हे जिल्ह्यात देखील आदर्शवत ठरेल असे औसा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तथा समितीचे प्रमुख आनंद मिरकले यांनी सांगितले.

उत्तर सोलापूर तालुक्यातील नरोटेवाडी व हगलूर ग्रामपंचायतीचे तपासणी समितीनी केली. यावेळी नरोटेवाडीचे ग्रामस्थांचे कौतुक करताना मिरकले बोलत होते. यावेळी त्यांचे समवेत विस्तार अधिकारी प्रदिप राऊत, अभिजित साखरे, बाळकृष्ण बंडे, अतिरिक्त गटविकास अधिकारी बाळासाहेब पाटील, विस्तार अधिकारी सोमनाथ शिंदे, कृषी विस्तार अधिकारी सचिन चव्हाण, सुरेश राठोड, सरपंच उमेश भगत, ग्रामविकास अधिकारी सुवर्णा घोडके, ग्रामपंचायत पदाधिकारी आदी उपस्थित होते. शासनाच्या ग्रामविकास विभागाने गावे विकासात्मक समृद्ध होण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची स्पर्धात्मक घोषणा केली. यामध्ये राज्यातील असंख्य ग्रामपंचायतीने सहभाग घेतला. तर अनेक ग्रामपंचायतीने विकासाबरोबर नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून इतर गावापुढे आदर्श ठेवला. नरोटेवाडी गावातील बचत गटातील महिलांनी सुरू केलेले गारमेंट उद्योग, शेतकऱ्यांसाठी ए. आय. प्रणाली, युवकासाठी जिम तर शासकीय इमारत सोयी सुविधा पाहून समाधान व्यक्त केले.

## संभाजी आरमारची आज शंभूशौर्य रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**



छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त सालाबादा प्रमाणे या वर्षी गुरूवार दि. १४ मे रोजी सकाळी १० वाजता संभाजी आरमारच्या वतीने शंभूशौर्य रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजी महाराजांनी केलेले कार्य हे प्रत्येक माणसं पर्यंत प्रत्येकांच्या घराघरात पोहोचावा या उद्देशाने शंभूराजांना मानवंदना देण्यासाठी संभाजी आरमार चे शेकडो मावळे माता बहिणी डोक्यावर भगवी टोपी हातात भगवा ध्वज घेऊन ढोल ताशाच्या गजरात या शंभू शौर्य रॅलीमध्ये सामील होणार आहेत. ही रॅली पांजरापोळ चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीस पुष्प अर्पण करून सुरुवात करण्यात येते आणि पुना नाका चौक येथे शंभू मूर्तीस पुष्प अर्पण करून या रॅलीचा समारोप होतो. तरी या शंभू शौर्य रॅली तमाम संभाजी आरमारचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच शिवशंभु प्रेमी मावळ्यांनी मोठ्या संख्येने आपल्या राजाला मानवंदना देण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी केले आहे.

# दोन हजार ७८४ कोटींच्या चार महामार्ग प्रकल्पांचे आज भूमिपूजन

## गडकरींच्या दौऱ्याची अक्कलकोटमध्ये तयारी



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१३ मे-**

अक्कलकोट तालुक्यासह सोलापूर जिल्ह्याच्या दळणवळण आणि औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या २७८४ कोटींच्या चार महामार्ग प्रकल्पांचे भूमिपूजन येत्या १४ मे रोजी अक्कलकोट येथे होणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते हा भूमिपूजन सोहळा पार पडणार असून विविध स्तरावर याच्या तयारीला सुरुवात झाल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.

या प्रकल्पांमध्ये सुरत-चेन्नई महामार्गाचा भाग असलेल्या नाशिक-अक्कलकोट महामार्गासह वळसंग-मोहोळ, वागदरी-अक्कलकोट आणि अक्कलकोट-तोळणूर या महत्त्वाच्या मार्गांचा समावेश आहे. हे महामार्ग पूर्ण झाल्यानंतर अक्कलकोट तालुका राष्ट्रीय स्तरावरील दळणवळण व्यवस्थेशी अधिक वेगाने जोडला जाणार असून व्यापार, उद्योग, पर्यटन आणि कृषी वाहतुकीला मोठी चालना मिळणार आहे.

सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड एक्सप्रेस वे हा देशातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक मानला जात आहे. गुजरातमधील सुरतपासून तामिळनाडूतील चेन्नईपर्यंतचा हा मार्ग महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशाला जोडणार आहे. या महामार्गामुळे मुंबई-पुणे मार्गावरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार असून प्रवासाचा वेळही लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. नाशिक-अक्कलकोट मार्गामुळे उत्तर महाराष्ट्र आणि दक्षिण महाराष्ट्रातील संपर्क अधिक गतिमान होणार आहे. तसेच वागदरी-अक्कलकोट आणि अक्कलकोट-तोळणूर मार्गामुळे कर्नाटक सीमावर्ती भागाशी जोडणी मजबूत होणार आहे. मोहोळ-वळसंग हा मार्ग तर सोलापूर जिल्ह्यासाठी बाह्यवळण रस्ता म्हणून महत्त्वाचा ठरणार असून शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पांमुळे अक्कलकोट परिसरातील धार्मिक पर्यटनालाही मोठी चालना मिळणार आहे. स्वामी समर्थ मंदिर येथे येणाऱ्या लाखो भाविकांना अधिक वेगवान आणि सुरक्षित प्रवास सुविधा उपलब्ध होणार आहेत. तसेच ग्रामीण भागातील कृषी मालाची वाहतूक, औद्योगिक गुंतवणूक आणि स्थानिक रोजगारनिर्मितीलाही गती मिळण्याची अपेक्षा आहे. या महामार्गांसाठी हजारो कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात



आला असून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे प्रकल्प मार्गी आहेत.भूमिपूजन सोहळ्यासाठी जिल्हा प्रशासन, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि स्थानिक यंत्रणांकडून तयारी सुरू असून मोठ्या प्रमाणावर नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

## ▶▶ महत्वाचे...




### डॉ. सुजाता घोळवे-घुगे यांना पीएचडी प्रदान

**सोलापूर, दि. १३ मे-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दहिटणे, उत्तर सोलापूर येथील विज्ञान शिक्षिका डॉ. सुजाता चंद्रकांत घोळवे घुगे मॅडम यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या वतीने डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. फॅन्टसी अॅड रिअलिटी इन द सिलेक्ट नोव्हेल्स ऑफ पीटर एस.बीगल :अ क्रिटीकल स्टडी या विषयावर संशोधन पूर्ण करून पी.एच.डी.संपादन केली आहे.या संशोधन कार्यासाठी डॉ.मनोहर जोशी, वालचंद कॉलेज सोलापूर यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. सुजाता चंद्रकांत घोळवे घुगे मॅडम यांनी एम. ए.,बी. एड.,डी. एड.,बी. एस.सी.,एल. एल. बी. व पी. एच. डी अशा विविध पदव्या प्राप्त केल्या असून त्या जिल्हा स्तरावर तज्ञ मार्गदर्शक म्हणून उत्तम कामगिरी करत आहेत. शिक्षणाधिकारी प्राथमिक कादर शेख, गटशिक्षणाधिकारी अविचल महाडिक साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी जमादार साहेब यांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.



### विविध गुन्ह्यात जप्त केलेल्या ४० दुचाकी मूळ मालकांना परत

**सदाशिवनगर, दि. १३ मे-**

माळशिरस पोलिसांनी विविध गुन्ह्यात जप्त केलेल्या चाळीस दुचाकी गाड्या मूळ मालकांना परत देण्यात आल्याची माहिती माळशिरस पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विकास दिंडुरे यांनी दिली. माळशिरस पोलिस ठाण्यात गेले अनेक वर्षापासून विविध गुन्ह्यात जप्त केलेल्या,हरवलेल्या दुचाकी गाड्या ठेवण्यात आल्या होत्या. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या निर्देशानुसार अकलूज चे उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांच्या मार्गदर्शनानुसार सदर गाड्या त्यांच्या मूळ मालकांना परत देण्याच्या सूचना करण्यात आल्या.या सूचनेअंतर्गत माळशिरस पोलीस ठाण्याच्या वतीने या दुचाकी मूळ मालकांना त्याच्या दुचाकी कागदपत्राची पडताळणी करून त्या गाड्या मूळ मालकांना परत करण्यात आल्या. ज्या गाड्यांचे नंबर बदलण्यात आले होते. त्याचा इंजिन व चेसी नंबर वरून आर टी ओ अधिकाऱ्यांशी संपर्क करून मालकांची नावे शोधली.तपासणी नंतर पोलीस निरीक्षक विकास दिंडुरे, एमसहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप गोसावी, सहाय्यक फौजदार राजेंद्र सरवदे यांच्या उपस्थितीत या गाड्या मूळ मालकांना परत देण्यात आल्या.

### मंगरुळे प्रशालेच्या दहावीतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**अक्कलकोट दि १३ मे-**

के.एल.ई संचलीत, मंगरुळे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, अक्कलकोट प्रशालेतील १० वी शालांत प्रमाणपत्र परीक्षा २०२५-२६ प्रशालेत व अक्कलकोट तालुक्यात प्रथम कुमार कृष्णा प्रकाश सुरवसे ९७.८०%, प्रशालेत व अक्कलकोट अ केंद्रात प्रथम शांभवी अजगुंडे ९६.४०%, प्रशालेत तृतीय क्रमांक विश्वेश घिवारे ९४.८०% संपादन करून या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केलेले आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य अॅड अनिल मंगरुळे पालक प्रकाश सुरवसे, रमणप्पा अजगुंडे , अॅड अनिल घिवारे, मुख्याध्यापक नंदाजी सरदार कदम यांच्या उपस्थितीत गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांचे के. एल.ई. संस्थेचे नूतन कार्याध्यक्ष अमित कोरे, शालेय समितीचे अध्यक्ष अनिल पट्टेद, सदस्य बसवराज पाटील, सदस्य अनिल मंगरुळे, मुख्याध्यापक नंदाजी कदम यांनी अभिनंदन केले.

### सिद्धेश्वर अकॉलेज ऑफ आर्किटेक्चरमध्ये नाटासाठी अधिकृत परीक्षा केंद्राची सुविधा

**सोलापूर, दि. १३ मे-**

कुमठा नाका येथील 'कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर' मान्यताप्राप्त श्री सिद्धेश्वर शिक्षण मंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर हे सोलापुरातील अधिकृत नाटा २०२६ परीक्षा (NT 2026) केंद्र म्हणून निश्चित करण्यात आले आहे. ४ एप्रिल ते १३ जून या कालावधीत प्रत्येक शुक्रवार व शनिवार ही परीक्षा आयोजित करण्यात येणार असून बी.आर्क. (B.rch.) प्रथम वर्ष प्रवेशासाठी ती अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. बी.आर्क. पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून गणित विषयासह बारावी विज्ञान शाखा उत्तीर्ण तसेच १०+३ डिप्लोमा शिक्षण पूर्ण केलेले विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र ठरणार आहेत. प्रवेशासाठी 'नाटा' (नॅशनल प्टिट्यूड टेस्ट इन आर्किटेक्चर) किंवा 'जेईई पेपर २ए' (JEE Paper) (architecture) ही परीक्षा आवश्यक आहे.

या परीक्षांद्वारे विद्यार्थ्यांच्या रेखाटन कौशल्य, निरीक्षणशक्ती, गणितीय क्षमता आणि कल्पनाशक्तीची चाचणी घेतली जाते. आर्किटेक्चर अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर खाजगी वास्तुविशारद, Interior Design, शहरी नियोजन, बांधकाम कंपन्या तसेच सरकारी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध करिअर संधी उपलब्ध होत असल्याने विद्यार्थ्यांचा या क्षेत्राकडे वाढता कल दिसून येत आहे. वेगाने होणारे शहरीकरण, आधुनिक वास्तुरचना आणि पर्यावरणपूरक बांधकामांची वाढती गरज यामुळे आर्किटेक्चर क्षेत्र विद्यार्थ्यांसाठी आकर्षक करिअर पर्याय म्हणून पुढे येत आहे. कला, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा संगम असलेल्या या क्षेत्रात सर्जनशीलता आणि तांत्रिक कौशल्यांना मोठी संधी उपलब्ध होत आहे.

## अन्यायग्रस्ताला न्याय नाकारल्याचा आरोप; संबंधितांची चौकशी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ मे-**

अन्यायग्रस्ताला न्याय न देता ज्यांच्या विरुद्ध तक्रार केली आहे त्यांना पाठीशी घातल्याचा आरोप करत संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर चौकशीअंती कारवाई करावी अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा तक्रारदार अंबाजी कोळी आणि राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष शाम क्षीरसागर यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

मौजे लिंबीचिचोळी येथील अंबाजी कोळी यांच्यावर झालेल्या मारहाण, धमक्या व प्राणघातक हल्ल्याच्या प्रकरणात पोलिसांनी तक्रार नोंदवण्यास टाळाटाळ केली, तसेच उलट पीडितांवरच खोटे गुन्हे दाखल केल्याचा आरोप अंबाजी कोळी यांनी केला आहे. वारंवार जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांकडे तक्रारी करूनही कारवाई न झाल्याने अखेर पोलीस महासंचालक आणि राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्याकडेही तक्रारी अर्ज दिला आहे. माहिती अधिकारांतर्गत मागितलेली माहितीही नाकारण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करावी अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा प्रदेश कार्याध्यक्ष शाम क्षिरसागर यांनी दिला आहे. या पत्रकार परिषदेस राजा सोनकांबळे, राजेंद्र पुरोहित उपस्थित होते.

## बंगळुरू-बिदर द्विसाप्ताहिक विशेष रेल्वे गाड्या कायमस्वरूपी धावणार



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ मे-**

प्रवाशांच्या मागणीनुसार, भारतीय रेल्वेने डचतढ बंगळुरू-बिदर या द्विसाप्ताहिक विशेष गाड्यांच्या सेवांना कायमस्वरूपी गाड्या म्हणून नियमित करण्याचा निर्णय घेतला आहे. या सेवा आता नियमित गाडी क्रमांकांसह चालवल्या जातील, ज्यामुळे प्रवाशांना वर्षभर खात्रीशीर संपर्क मिळेल आणि प्रवासाचे नियोजन करणे अधिक सुलभ होईल.

या रेल्वे सेवा नियमित केल्यामुळे कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील प्रमुख शहरे, तसेच महत्त्वाची व्यापारी, शैक्षणिक, तीर्थक्षेत्रे आणि आरोग्यसेवा केंद्रांदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा फायदा होईल. विशेषतः, सोलापूर विभागातील कलबुर्गी, शहाबाद आणि वाडी स्थानकांवरील प्रवाशांना बंगळुरू आणि इतर मध्यवर्ती स्थानकांपर्यंत पोहोचण्यासाठी या गाड्यांमुळे अधिक विश्वसनीय आणि आरामदायी रेल्वे संपर्क उपलब्ध होईल. ही सेवा 'कल्याण कर्नाटक' म्हणूनही ओळखल्या जाणाऱ्या उत्तर कर्नाटक आणि बंगळुरू दरम्यान प्रवास करणाऱ्या विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक प्रवासी, तीर्थयात्री आणि कुटुंबांच्या गरजा पूर्ण करेल अशी अपेक्षा आहे; तसेच यामुळे गुंटकल, रायचूर आणि धर्मावरम यांसारख्या महत्त्वाच्या जंक्शनपर्यंतची पोहोच देखील सुधारेल.

**सध्याची विशेष गाडी सेवा**

गाडी क्रमांक ०६५३९ एसएम व्हीटी बंगळुरू-बिदर द्विसाप्ताहिक विशेष, दि. १५.०५.२०२६ पासून गाडी क्रमांक १६५५९ SMVT बंगळुरू-बिदर द्विसाप्ताहिक या कायम स्वरूपी सेवेत रूपांतरित (नियमित) केली जाईल.

गाडी क्रमांक ०६५४० बिदर-एसएमव्हीटी बंगळुरू द्विसाप्ताहिक विशेष, दि. १६.०५.२०२६ पासून गाडी क्रमांक १६५६० बिदर-डचतढ बंगळुरू द्विसाप्ताहिक या कायमस्वरूपी सेवेत रूपांतरित (नियमित) केली जाईल.

गाडी क्रमांक १६५५९ एसएमव्हीटी बंगळुरू-बिदर द्विसाप्ताहिक ही गाडी दर शुक्रवार आणि रविवारी 'सर एम. विश्वेश्वरैया टर्मिनल बंगळुरू' येथून २१:१५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी १२:१५ वाजता बिदर येथे पोहोचेल.

- गाडी क्रमांक १६५६० बिदर-डचतढ बंगळुरू (द्विसाप्ताहिक) ही गाडी दर शनिवार आणि सोमवारी १४:०० वाजता बिदरहून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ०४:०० वाजता सर एम. विश्वेश्वरैया टर्मिनल, बंगळुरू येथे पोहोचेल. हुमनाबाद, कलबुर्गी, शहाबाद, वाडी, यादगीर, कृष्णा, रायचूर, मंत्रालयम रोड, आदोनी, गुंतकल, अनंतपूर, धर्मावरम, हिंदुपूर आणि येलहंका अशे या रेल्वे गाड्यांचे थांबे असतील तर फस्ट एसी टू टायर, सेकंड एसी थ्री टायर, ११ स्लीपर क्लास, ४ जनरल सेकंड क्लास आणि २ लगेज कम ब्रेक व्हॅन्स. एकूण २० डबे अशी रचना असेल.

## प्रचंडे हायस्कूलचे दहावी परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ मे-**

नागणसूर (ता. अक्कलकोट) येथील एच. जी. प्रचंडे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचा दहावीचा निकाल ८१.१७ टक्के लागला आहे. ८५ पैकी ६९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले, त्यापैकी सात विद्यार्थी डिस्टिंक्शन, १७ विद्यार्थी प्रथम श्रेणी, २४ विद्यार्थी द्वितीय श्रेणी, तर २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले, यामध्ये सौम्या सोलापूरे ९३.२०%, संध्या सोलापूरे ८७.६० टक्के, दानेश्वरी नरूने ८७.२०% घेऊन प्रशालेत अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. मराठी माध्यमात कुमारी सौम्या संजय सोलापुरे ९३.२० टक्के घेऊन प्रथम, संध्या सोलापुरे ८७.६० टक्के घेऊन द्वितीय, प्रतीक्षा मोती ८५.८० टक्के घेऊन तृतीय आली. कन्नड माध्यममध्ये दानेश्वरी नरूने ८७.२० टक्के घेऊन प्रथम, काशीबाई मनुरे ८५.२० टक्के घेऊन द्वितीय, सौंदर्य दरगोंडा ६९.२० टक्के घेऊन तृतीय आली. या यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या मार्गदर्शक शिक्षकांचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, शिक्षण विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी, शिक्षण विस्तार अधिकारी लक्कप्पा पुजारी, केंद्रप्रमुख इराप्पा गजा, प्राचार्य शंकर व्हनमाने यांनी अभिनंदन केले आहे.

## विवाह प्रमाणपत्रावर बारकोड नसल्याने नागरिकांची गैरसोय

### नवीन बारकोडयुक्त प्रमाणपत्राची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

विवाह नोंदणी प्रमाणपत्रावर बारकोड नसल्यामुळे अनेक नागरिकांना आधार कार्ड, बँकिंग सेवा तसेच विविध शासकीय कामकाज करताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब समोर आली आहे. विशेषतः ऑनलाईन पडताळणी प्रक्रियेत बारकोड नसलेल्या प्रमाणपत्रांना मान्यता मिळण्यात अडथळे निर्माण होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

विवाह नोंदणी अधिकारी डी. एस. पटणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, २०२५ पासून विवाह नोंदणी प्रमाणपत्रावर बारकोड प्रणाली लागू करण्यात आली आहे. त्यामुळे नव्याने दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्रांवर बारकोडची सुविधा उपलब्ध होत आहे.

मात्र, २०२४ पूर्वी विवाह नोंदणी झालेल्या नागरिकांच्या प्रमाणपत्रांवर



बारकोड नसल्याने त्यांना विविध शासकीय आणि खासगी सेवांमध्ये अडचणी येत आहेत.

विशेषतः आधार कार्ड अपडेट करताना, शासकीय योजनांचा लाभ घेताना, बँक खात्यांशी संबंधित प्रक्रिया पूर्ण करताना तसेच इतर महत्त्वाच्या कागदपत्रांच्या ऑनलाईन पडताळणीवेळी बारकोड नसलेले विवाह प्रमाणपत्र ग्राह्य धरले जात नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

परिणामी नागरिकांना वारंवार शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागत असून वेळ आणि आर्थिक खर्चही सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर २०२४ पूर्वी जारी करण्यात आलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्रांनाही बारकोड प्रणाली लागू करून संबंधित नागरिकांना नवीन बारकोडयुक्त प्रमाणपत्र उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

## मोची समाज सेवा मंडळातर्फे आज सामुदायिक विवाह सोहळा

**सोलापूर, दि. १३ मे-**

येथील श्री जांबमुनी मोची समाज सेवा मंडळ (लष्कर) सोलापूर यांच्यातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही येत्या १४ मे रोजी दुपारी साडेबारा वाजता बापूजी नगरातील मारुती मंदिरासमोरच्या पटांगणात सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंडळातर्फे देण्यात आली. या सोहळ्यात माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार प्रणिती शिंदे, खासदार प्रा. डॉ. ज्योती वाघमारे तसेच सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख, देवेंद्र कोठे हे सर्व आमदार त्याचबरोबर माजी आमदार नरसय्या आडम, प्रकाश यलगुलवार आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या विवाह सोहळ्याचे ३२ वे वर्षे आहे.

## शनि जन्मोत्सव, शनि अमावस्येचा दुर्मिळ योग



### गौडगांवच्या श्री मारुती मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**

शनिवार, दि. १६ मे रोजी श्री शनैश्वर जन्मोत्सव आणि शनि अमावस्येनिमित्त गौडगांव येथील श्री जागृत मारुती मंदिरात विशेष धार्मिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. अनेक वर्षांनंतर आलेला हा त्रिवेणी योग भाविकांसाठी विशेष पर्वणी ठरणार असून, यानिमित्त विविध विधी संपन्न होणार आहेत.

या दुर्मिळ योगाचे औचित्य साधून मंदिर समितीच्या वतीने पहाटेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने पुढील विधी पार पडणार आहेत. अभिषेक व महारुद्राभिषेक, श्री मारुतीराया आणि शनिदेवांना जलाभिषेक व दुग्धाभिषेक केला जाईल. तसेच नवग्रह शांती पूजा, शनि पूजा आणि गजलक्ष्मी पूजन पार पडेल. भाविकांच्या व परिसराच्या सुख-समृद्धीसाठी मंदिरात विशेष यज्ञ व होम-हवन करण्यात येणार आहे.

दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी गौडगांव मारुती अन्नछत्र मंडळाच्या वतीने दिवसभर अखंड अन्नदान सेवा सुरू राहणार आहे. दर्शनानंतर प्रत्येक भाविकाला महाप्रसादाचा लाभ घेता येईल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. ज्या भाविकांना या विशेष अभिषेक पूजेमध्ये आणि महाप्रसाद सेवेमध्ये आपले योगदान द्यायचे असेल किंवा सहभाग नोंदवायचा असेल, त्यांनी त्वरित मंदिर समितीशी संपर्क साधावा, असे आवाहन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

मिथुन कलमानी आणि मित्र मंडळ, खजुर्गी यांच्यावतीने शनि जन्मोत्सव निमित्त महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच दुपारी १२ वाजता महाआरती व गुलाल कार्यक्रमाने जन्मोत्सव साजरा होईल, या सोहळ्याला मारुती भक्तांचे उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**– श्रीकांत खानापुरे,**
अध्यक्ष, श्री जागृत मारुती मंदिर



## सांगोल्यात सनातन संस्थेचे पाच दिवसीय शिबीर उत्साहात

### ४५ मुला-मुलींनी घेतला सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ मे-**

सनातन संस्थेच्या वतीने सांगोला शहरातील महादेव गल्ली येथील दत्त मंदिरात दि.८ ते १२ मे असे ५ दिवसीय सनातन संस्कार प्रशिक्षण वर्ग शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात शहरातील विविध वयोगटातील ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते. या शिबिरात आपली संस्कृती, परंपरा यांचे आपल्या जीवनात असलेले महत्व यावर भर देण्यात आला होता. सूर्यनमस्कार, व्यायाम, हिंदू संस्कृतीनुसार देवळात दर्शन कसे घ्यावे, थोरांचा आदर कसा करावा, अभ्यास कसा करावा, वाढदिवस संस्कृतीनुसार कसा साजरा करावा, कपाळावर टिळा लावण्याचे महत्व यासारख्या धर्माचरणाच्या गोष्टीचे लहान मुलांकडून प्रत्यक्ष कृती करून घेऊन त्याचे आध्यात्मिक महत्व स्पष्ट करण्यात आले. यावेळी विविध छोट्या-छोट्या आध्यात्मिक ज्ञान वाढविणाऱ्या स्पर्धा घेऊन त्यातून यशस्वी मुलांना बक्षीस देण्यात आली. मुलांनी घेतलेला सहभाग आणि त्यांनी आचरणात आणलेल्या कृती पाहून पालकांनीही या शिबिराचे खूप कौतुक केले. या उपक्रमासाठी दत्त मंदिर ट्रस्टचे लऊळकर कुटुंबीयांनी मोलाचे सहकार्य केले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पोपटराव देशमुख यांना चैतन्य हास्य योग मंडळातर्फे श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ मे-**



आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे वडील पोपटराव देशमुख यांच्या निधनाबद्दल सांगोला शहरातील चैतन्य हास्य योग मंडळाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पोपटराव देशमुख यांचे बालपण सांगोला येथे गेले होते. श्रद्धांजली सभेदरम्यान मंडळाच्या सदस्यांनी त्यांच्या बालपणातील आठवणींना उजाळा दिला. यावेळी डॉ. कृष्णा इंगोले, प्रा.राजेंद्र ठोंबरे, म.श.घोंगडे, गजानन दीक्षित, हेमंत तेली, जयंत तेली, भारत राऊत, इसाक काझी, अरविंद डोंबे, अशोक जाधव, चंद्रकांत जाधव, संतोष देशमुख, भागवत पैलवान, सुधीर दौंडे, जयसिंग खडतरे, सुभाष महिमकर, नारायण विसापूरे, प्रा.बाळासाहेब वाघमारे, भीमाशंकर पैलवान, इंजि.भारत शिवशरण, डॉ. मच्छिंद्र सोनलकर, अरुण कुलकर्णी, गंगाधर देशपांडे, सुधाकर म्हेत्रे, बाबुराव लाडे, बाळासाहेब पाटील उपस्थित होते.



### महत्त्वाचे...



### स्मार्ट मीटरविरोधात बहुजन मुक्ती पार्टीचे आंदोलन

**टेंभुर्णी, दि. १३ मे-**

आज बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर स्मार्ट मीटरविरोधात जोरदार आंदोलन करण्यात आले. आंदोलनात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी आरोप केला की, स्मार्ट मीटरच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक लूट केली जात आहे. तसेच त्यांनी भाजप सरकारवर टीका करत उद्योगपतीधार्जिण्या धोरणांमुळे जनतेचे नुकसान होत असल्याचा आरोप केला. महावितरणचे खाजगीकरण करण्याचा प्रयत्न सुरू असून, यामुळे नागरिकांवर आर्थिक बोजा वाढेल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी काही वक्त्यांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासंदर्भात शंका उपस्थित करत मतदान प्रक्रियेत अधिक पारदर्शकतेची मागणी केली. आंदोलनात योगेश शिदगणे सोलापूर लोकसभाध्यक्ष, गणेश मंदापुरे, हाटकर, गायकवाड तसेच महेंद्र सोनवणे माढा लोकसभाध्यक्ष यांनी विचार मांडले. स्मार्ट मीटर बसवण्याची प्रक्रिया तात्काळ थांबवण्यात यावी. अन्यथा भविष्यात अधिक तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. आंदोलनानंतर महसूल सहाय्यक जिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांना निवेदन सादर करण्यात आले.



### माळशिरस तालुक्यातील उड्डाणपूलाची कामे प्रलंबितच

**सदाशिवनगर, दि. १३ मे-**

माळशिरस तालुक्यात विविध कारणांनी चार उड्डाण पुल मंजूर केले आहेत. मात्र त्यातील दोन उड्डाणपुलांची कामे अद्याप प्रलंबितच आहेत. तालुक्यातून आळंदी ते पंढरपूर हा पालखी महामार्ग गेला आहे. नातेपुते, माळशिरस या ठिकाणी बायपास रोड केले आहेत. दोन्ही गावाला बायपास रस्त्यावरून शहरात जाण्यासाठी सर्विस रोड केले आहेत. वास्तविक पाहता या दोन्ही ठिकाणी अंडरपास अथवा ओव्हर ब्रिज होणे गरजेचे होते, परंतु ते न झाल्याने या तिन्ही ठिकाणी सातत्याने अपघात होऊन अनेकांचे जीव गेले आहेत. सततच्या अपघातानंतर नातेपुते, यादव पेट्रोल पंप, ६१ फाटा व वाडी कुरोली या चार ठिकाणी उड्डाणपूल मंजूर केल्याचे समजते. त्यापैकी नातेपुते व वाडी कुरोली या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूलांची कामे सुरू झाली आहेत. परंतु माळशिरस मधील यादव पेट्रोल पंप व ६१ फाटा या दोन्ही ठिकाणची कामे मंजूर असताना अद्यापही सुरू झालेली नाहीत. या दोन्ही ठिकाणी सातत्याने अपघात घडत आहेत याची गंभीर दखल घेऊन ही दोन्ही उड्डाण पुलाची कामे तातडीने सुरू करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## आ. उत्तम जानकर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नाला यश

**शिवपुरी व श्रीपूर मळा येथे एमआयडीसी सर्वेक्षणास सुरुवात**

**वेळापूर, दि, १३ मे-**

माळशिरस तालुक्यातील औद्योगिकीकरणाला चालना मिळण्याच्या उद्देशाने शिवपुरी मळा व श्रीपूर मळा येथे नवीन औद्योगिक वसाहत स्थापन करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) वतीने संबंधित क्षेत्राचा प्राथमिक सर्वे करण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांकडून प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, प्रादेशिक कार्यालय सोलापूर यांनी तहसीलदार माळशिरस यांना पत्र पाठवून प्रस्तावित जमिनींची माहिती मागविली आहे. पत्रामध्ये श्रीपूर मळा परिसरातील महाळुंग, बोरगाव, जांबूड तसेच शिवपुरी मळा परिसरातील गुरसाळे व दहिगाव या गावांतील शेती महामंडळाच्या जमिनीवर औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे म्हटले आहे.

आमदार उत्तम जानकर यांनी उद्योगमंत्र्यांकडे पाठपुरावा करून तालुक्यात एमआयडीसीबाबत मागणी लावून धरली होती. माळशिरस चेंबर ऑफ कॉमर्स अँन्ड इंडस्ट्रीज यांनीही संबंधित ठिकाणांची स्थळ पाहणीची मागणी केली होती.

प्रस्तावित एमआयडीसी अंतर्गत आयटी पार्क, अ‍ॅग्रीकल्चर पार्क, इंडस्ट्रियल हब तसेच लॉजिस्टिक पार्क विकसित होण्याची शक्यता आहे. तालुक्यात मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे उभे राहून युवकांना रोजगार मिळणार आहे. महामंडळाकडून तहसील प्रशासनास संबंधित जमिनींची प्रतवारी, बागायत-जिरायत माहिती, न्यायालयीन बाबी तसेच अतिक्रमणासंदर्भातील सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना आहेत.

अहवालानंतर पुढील भूसंपादन प्रक्रिया राबणार आहे. दरम्यान, आमदार जानकर यांच्या प्रयत्नांना यश मिळत असल्याची भावना तालुक्यात व्यक्त होत आहे.

# केंद्राच्या तीर्थक्षेत्र व पर्यटन सुचीत अक्कलकोटचा व्हावा समावेश

**भाविकांची मागणी; केंद्रीय मंत्री गडकरी यांनी घ्यावा पुढाकार**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ मे-**

श्री स्वामी समर्थांच्या लिलांनी पावन अक्कलकोट तीर्थक्षेत्राची ख्याती सातासमुद्रापलीकडे गेलेली आहे. तीर्थक्षेत्र केंद्राच्या तीर्थक्षेत्र व पर्यटन सूचीमध्ये येण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी लक्ष घालावे अशी मागणी स्वामीभक्त, पर्यटक, यात्रेकरु, तालुकावासियांमधून होत आहे.

अक्कलकोट तीर्थक्षेत्र महाराष्ट्रातील एक मॉडेल तीर्थक्षेत्र करण्याचे प्रयत्न आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी करीत आहेत. आमदार सचिन कल्याणशेट्टी याच्यावर अक्कलकोटवासीयांनी दुसऱ्यांदा पुन्हा विश्वास व्यक्त करून मोठ्या ताधिक्याने विजयी केले आहे. केंद्रात भाजपचे व महाराष्ट्रात महायुतीचे शासन विराजमान आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे स्वामी भक्त आहेत. यामुळे तीर्थक्षेत्र अक्कलकोट राज्यातील एक मॉडेल तीर्थक्षेत्र बनण्याबाबत अनुकुल स्थिती आहे.



अक्कलकोट तीर्थक्षेत्र महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी एक तीर्थक्षेत्र असून दिवसेंदिवस अक्कलकोटला येणाऱ्या भाविकांच्या संख्येत झपाटयाने वाढ होत आहे. अक्कलकोट तीर्थक्षेत्री महाराष्ट्रासह गुजरात, आंध्र, कर्नाटक, तेलंगणा, पश्चिम बंगाल आदी राज्यांसह विदेशातून पर्यटक येत आहेत. अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकासासाठी विविध विकास निधी वेळोवेळी दिला जातो.


भाविकांची संख्या पाहता व अनुषंगाने मुलभुत समस्या सार्वजनिक स्वच्छता, आरोग्य, रस्ते, वीज, पाणी, कुशल मनुष्य बळ आदींवरील खर्च पाहता नगर पालिकेला तारेवरची कसरत आहे. ही केवळ तुटपुंजी मलमपट्टी होत आहे. कायम स्वरूपी शाश्वत विकासकामांसाठी मोठा निधी व पॅकेज मिळणे गरजेचे आहे.

**सण, उत्सव, सुट्यांना गर्दीत मोठी वाढ**

श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी गुरु प्रतिपदा (१ लाख भाविक), दत्तजयंती उत्सव (३ लाख भाविक), स्वामी समर्थ प्रगट दिन व स्वामींचा पुण्यतिथी महोत्सव (२ लाख भाविक), श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ वर्धापन व गुरु पोर्णिमा उत्सव ( ५ लाख भाविक) अशी गर्दी होत असते. याशिवाय सलग सुट्या, दिवाळी सुट्टी, नाताळ सुट्टी, उन्हाळी सुट्टीत (पाच लाख भाविक) येतात.

**अन्यही क्षेत्रांना भाविकांची वाढतेय गर्दी**

स्वामींच्या दर्शनासह आशिया खंडातील प्रसिद्ध शस्त्र संग्रहालय, नवीन राजवाडा, जुना राजवाडा हा ऐतिहासिक ठेवा व शिवपुरी स्थान पाहण्यासाठीही पर्यटक वाढले आहेत. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने उभे केलेले धातूशिल्प शिवचरित्र दालन, गड किल्ले, शिवस्मारक व बालोद्यानमुळेही पर्यटकांची गर्दी वाढत आहे. तालक्यातील हैद्रा, बऱ्हाणपूर, शेख नुरोद्दीन दर्गा, जिंदावली बाबा शाहवली दर्गा आदी ठिकाणीही भाविकांची मोठी गर्दी असते. पुढील वीस वर्षाच्या नियोजनाच्या



दृष्टीने शहरातील मुख्य पालखी मार्गाचे रुंदीकरण, पाणीपुरवठा, सार्वजनिक प्रशासनगृह, शौचालय आदी मुलभुत सुविधाबाबत अधिक सुविधा आवश्यक आहेत.

**केंद्राच्या पर्यटन सुचीत समावेशाने मिळेल मोठा निधी**

अक्कलकोट तीर्थक्षेत्राचा अद्यापही मास्टरप्लान कार्यान्वित झाला नाही. राज्य शासनाकडून मिळणाऱ्या निधीवर मर्यादा येतात. अक्कलकोट विकासासाठी प्राधिकरण स्थापून मोठा विकास निधी मंजूर करण्यासाठी राज्याकडे निधीची कमतरता असते. त्यामुळे अक्कलकोट तीर्थक्षेत्राचा केंद्राच्या पर्यटन सुचीमध्ये अक्कलकोट तीर्थक्षेत्राचा समावेश केल्यास केंद्राकडून विविध विकास कामांसाठी अधिक मोठा निधी मिळवण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो.

## खडकलगाव येथे वीज पडून बैलाचा मृत्यू

**बार्शी तालुक्यात अवकाळी तडाखा**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ मे-**

बार्शी तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून वातावरणात मोठा बदल झाला आहे. सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने आज बुधवारी जोरदार हजेरी लावली आहे. दरम्यान खडकलगाव येथील गणपती कोळेकर यांच्या बैलाच्या अंगावर काम करत असताना अचानक अंगावर वीज पडल्याने बैल जागीच दगावला.

बार्शी तालुक्यात आज दुपारी साडेतीनच्या सुमारास अचानक ढग दाटून आले आणि वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. खडकलगाव शिवारात शेतकरी गणपती कोळेकर हे आपल्या शेतात कामात व्यस्त होते. यावेळी अचानक विजांचा कडकडाट सुरु झाला. कोळेकर यांच्या बैलावर वीज पडल्याने तो जागीच गतप्राण झाला. सुदैवाने या घटनेत कोळेकर बचावले असले, तरी बैल गेल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

या घटनेची माहिती मिळताच परिसरातील शेतकऱ्यांनी कोळेकर यांच्या शेताकडे धाव घेतली. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या या नुकसानीचा महसूल विभागाने तातडीने पंचनामा करावा आणि गणपती कोळेकर यांना शासनाकडून योग्य ती आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

हा अवकाळी पाऊस साधारणपणे तासभर कमी जास्त प्रमाणात पडत होता. यामुळे आंबा, द्राक्ष आदी फळपिकांचे व शेतात काढून ठेवलेल्या कडब्याचे नुकसान झाले आहे. दिवसभर उकाड्याने हैराण झालेल्यांना या पावसामुळे दिलासा मिळाला आहे.

## कामती येथे आज दहावीच्या गुणवंतांचा गौरव

**'दहावीनंतर पुढे काय? या विषयावर मार्गदर्शन शिबीर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मे-**


श्रीकृष्ण गुरुकुल शिक्षण संस्थेच्या वतीने इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आणि 'दहावीनंतर पुढे काय? या विषयावर विशेष मार्गदर्शन शिबिर होत आहे.

दहावीच्या परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा होणारा विशेष सन्मान हे ठळक आकर्षण आहे. ९०% ते १००% गुण: डायमंड ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक, ८०% ते ९०% गुण: गोल्ड ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक, ७०% ते ८०% गुण: सिल्वर ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक अशापद्धतीने गौरव केला जाणार आहे. विद्यार्थ्यांना करिअरची दिशा निवडण्याबाबत भौतिकशास्त्र-ऋषिकेश जवळगे (बी.ई. मेकॅ निकल), रसायनशास्त्र-निरंजन बनसुडे (एम. एस्सी. बी.एड.), जीवशास्त्र- अविनाश गायकवाड (एम.एस्सी. प्राणीशास्त्र), गणित - मोहम्मद अंसारी (बी.ई. मेकॅनिकल), इंग्रजी - गौरी त्रिभुवन (एम.ए. इंग्रजी) या मान्यवरांसोबतच शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राध्यापक प्रमोद आवताडे हे मार्गदर्शन करणार आहेत.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त पालक व विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा. वरील टक्केवारीच्या गटात बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह या सोहळ्याला उपस्थित राहून आपले प्रोत्साहन वाढवावे, असे आवाहन श्रीकृष्ण गुरुकुल शिक्षण संस्थेचे संस्थापक प्रा. प्रमोद आवताडे सर यांनी केले आहे.

**कार्यक्रमाची वेळ आणि ठिकाण**

एम. बी. चव्हाण गुरुकुल, कामती बुद्रुक, ता. मोहोळ, गुरुवार दि. १४ मे, सकाळी १०:०० वाजता हा सोहळा होणार आहे.



## राष्ट्रवादी पक्षाच्या माळशिरस, उत्तर सोलापूरच्या निरीक्षकपदी नागेश फाटे

**खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत निवडी जाहीर**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ मे-**

सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या सोलापूर जिल्ह्यात नूतन जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय पदाधिकारी निवडीसाठी तालुका निरीक्षकांच्या निवडी शनिवारी पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृह येथे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, माजी पालकमंत्री लक्ष्मणराव ढोबळे, जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, कार्याध्यक्ष रवींद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडल्या.

यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उद्योग, व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्यावर माळशिरस आणि उत्तर सोलापूर तालुक्याच्या निरीक्षक पदाची जबाबदारी देण्यात आली.

यावेळी विद्यार्थी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सागर पडगळ, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष दीपक वाडदेकर ,राज्य प्रवक्ते महादेव तळेकर, राज्य उपाध्यक्ष हरिदास रणदिवे, राज्य महिला उपाध्यक्ष कोमल ढोबळे, महिला जिल्हाध्यक्ष पल्लवी पाटील, मृदुला तळेकर, विनंती कुलकर्णी ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेख, जिल्हा उपाध्यक्ष सौदागर जाधव, युवती अध्यक्ष विश्रांती कुलकर्णी, पंढरपूर तालुका अध्यक्ष अतुल चव्हाण उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून सोलापूर जिल्ह्यात आपला दबदबा कायम ठेवून पुढील काळात पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यासाठी पक्षातील अनुभवी नेतेमंडळींना पक्ष निरीक्षक पदाची जबाबदारी घेण्यात आली आहे. पक्ष निरीक्षकाच्या माध्यमातून तालुकास्तरावर बैठका घेऊन पदाधिकाऱ्यांच्या निवडी केल्या जाणार आहेत.

## राज्यस्तरीय इंग्रजी व्याकरण परीक्षेत कुरुलच्या विद्यार्थिनीचा डंका

**विराज्ञी जाधव हिने पटकावली राज्यात पहिली रँक**

**तभा वृत्तसेवा,**
**कुरुल, दि. १३ मे-**



मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय इंग्रजी व्याकरण परीक्षेत मोहोळ तालुक्यातील कुरुलची कन्या विराज्ञी जाधव हिने थेट राज्यात पहिली रँक पटकावली. श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूल, मोहोळ या शाळेत इयत्ता आठवीत शिकणाऱ्या विराज्ञीने २०० पैकी २०० गुण मिळवत हे यश मिळवले आहे.

अभ्यासू वृत्ती, सातत्य आणि इंग्रजी भाषेतील गोडी यांच्या जोरावर विराज्ञीने हे यश मिळवले. शाळेतील सलमान मुल्ला, विद्याराणी पवार, रूपाली कोकाटे, पौर्णिमा सुरवसे, प्राजक्ता अरबळकर, मिलन ढेपे या शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचा पाठिंबा आणि तिची स्वतःची जिद्द या त्रिसूत्रीवर तिने हे स्वप्न साकारले. निकाल जाहीर होताच संपूर्ण शाळेत जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सुनील झाडे, व्यवस्थापिका धरती पाटील, मिलन ढेपे, मुख्याध्यापक वीणा कदम आणि शिक्षकांनी तिचे अभिनंदन केले.

तिच्या यशाबद्दल आमदार राजु खरे, राष्ट्रवादीचे नेते उमेश पाटील, राजमुद्रा प्रतिष्ठानचे नामदेव निकम, माऊली निकम, ग्रामपंचायत सदस्य आदींनी तिचे अभिनंदन केले.

**देशासाठी मोठे काम करणार**

यशामागे सततचा प्रयत्न आणि वेळेचे व्यवस्थापन आहे. हे यश फक्त सुरुवात आहे. इंग्रजीत प्रावीण्य मिळवून देशासाठी काहीतरी मोठं करायचं आहे.

– **विराज्ञी जाधव,** गुणवंत विद्यार्थिनी.



## बचत गटाच्या माध्यमातून गरुडझेप

**पंढरपूरच्या रणरागिणीची यशोगाथा; एकाच वेळी सांभाळतेय चार उद्योग**

**हलाखीच्या परिस्थितीवर मात करत कुटुंबाला दिला आर्थिक आधार**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ मे-**

जिद्द आणि चिकाटी असेल तर ग्रामीण भागातील महिला कोणत्याही संकटावर मात करून यशाचे शिखर गाठू शकतात, हे पंढरपूर तालुक्यातील खेडभाळवणी येथील मिनाक्षी साळुंखे यांनी कर्तृत्वातून सिद्ध केले आहे.

मिनाक्षी साळुंखे यांच्या या संघर्षाची सुरुवात २०१८ मध्ये झाली. बचत गट योजनेची माहिती मिळताच त्यांनी पुढाकार घेऊन १० महिलांना एकत्र केले आणि 'क्रांती स्वयंसहाय्यता समूह' स्थापन केला. गटाच्या माध्यमातून कर्ज काढून 'मिरची कांडप'चा व्यवसाय सुरू केला. व्यवसायातून मिळालेल्या उत्पन्नाचा योग्य विनियोग करत व्यवसायांचे जाळे विणले.

आज मिनाक्षी साळुंखे एक-दोन नव्हे, तर तब्बल चार उद्योग एकटीच्या जोरावर समर्थपणे सांभाळत आहेत. शुद्ध जल प्रकल्पातून गावाला स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवत आहेत. दर्जेदार मसाल्यांसाठी मिरची कांडप उद्योग उभारला. शेतीपूरक कामांसाठी लागणाऱ्या डिकोडा या आधुनिक यंत्राचाही त्या व्यवसाय करतात. ग्रामीण महिलांच्या गरजा ओळखून कपड्यांचे दालनही सुरु केले आहे.

**'एकता महिला मंच'च्या माध्यमातून समाजकार्य**

मिनाक्षी साळुंखे स्वतःच्या प्रगतीवर थांबल्या नाहीत, तर खेडभाळवणी परिसरातील इतर महिलांनाही संघटित करत आहेत. एकता महिला मंचच्या माध्यमातून महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांतून महिलांचे संघटनावर भर आहे. पतीलाही संसारात साथ दिली. मुलांच्या उच्च शिक्षणाची जबाबदारी चोख पार पाडली. परिस्थितीला धैर्याने भिडणारी सक्षम स्त्री म्हणून त्यांचा नावलौकीक आहे.

बचत गट आणि एकता महिला मंचामुळे मला एक नवी ओळख मिळाली. महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहून आपल्या हक्कासाठी लढायला हवे.

– **मिनाक्षी साळुंखे,**
उद्योजिका, खेडभाळवणी.